# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह

**मा. विशेष महासभा दि. १६/१०/२०१७**

आज सोमवार दि. १६/१०/२०१७ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा सकाळी ११.०० वाजता सभा सुचना क्र. ०२ दि. १०/१०/२०१६ रोजीच्या विषयपत्रिकेवर विचार विनिमय करणेकरिता महापालिका सभागृह, ३ रा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह येथे मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली भरली असता खालीलप्रमाणे सदस्य हजर होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | डिम्पल विनोद मेहता | महापौर |
| २) | चंद्रकांत सिताराम वैती | उपमहापौर |
| ३) | पाटील रोहिदास शंकर | सभागृह नेता |
| ४) | भोईर सुनिता शशिकांत | सदस्या |
| ५) | शाह रिटा सुभाष | सदस्या |
| ६) | तिवारी अशोक सूर्यदेव | सदस्य |
| ७) | पांडेय पंकज सूर्यमणि | सदस्य |
| ८) | गोहिल शानू जोरावर सिंह | सदस्या |
| ९) | कांगणे मीना यशवंत | सदस्या |
| १०) | सिंह मदन उदितनारायण | सदस्य |
| ११) | शेट्टी गणेश गोपाळ | सदस्य |
| १२) | ढवण निलम हरीश्चंद्र | सदस्या |
| १३) | कदम अर्चना अरुण | सदस्या |
| १४) | नलावडे दिनेश दगडु | सदस्य |
| १५) | भोईर गणेश गजानन | सदस्य |
| १६) | पाटील प्रभात प्रकाश | सदस्या |
| १७) | गुप्ता कुसुम संतोष | सदस्या |
| १८) | पाटील धनेश परशुराम | सदस्य |
| १९) | पाटील वंदना मंगेश | सदस्या |
| २०) | रावल मेघना दिपक | सदस्या |
| २१) | शाह राकेश रतिशचंद्र | सदस्य |
| २२) | सिंग श्रीप्रकाश जिलेदार | सदस्य |
| २३) | धृवकिशोर मन्साराम पाटील | सदस्य |
| २४) | जैन गीता भरत | सदस्या |
| २५) | जैन सुनिता रमेश | सदस्या |
| २६) | जैन राजेंद्र भवरलाल | सदस्य |
| २७) | रॉड्रीकस मोरस जोसेफ | सदस्य |
| २८) | भूप्ताणी रक्षा सतीश (शाह) | सदस्या |
| २९) | मोकाशी दिपाली आनंदराव | सदस्या |
| ३०) | व्यास रवि वासुदेव | सदस्य |
| ३१) | परेरा कॅटलीन एन्थोनी | सदस्या |
| ३२) | रकवी वैशाली गजेंद्र | सदस्य |
| ३३) | अग्रवाल सुशील गोपीकिशन | सदस्य |
| ३४) | खंडेलवाल सुरेश जगदीश | सदस्य |
| ३५) | परदेशी गिता हरीश | सदस्या |
| ३६) | पाटील नरेश तुकाराम | सदस्य |
| ३७) | सय्यद नुरजाहॉ नाझर हुसेन | सदस्या |
| ३८) | शेख अमजद गफार | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ३९) | पाटील जयंतीलाल गुरूनाथ | सदस्य |
| ४०) | घरत तारा विनायक | सदस्या |
| ४१) | पांडे स्नेहा शैलेश | सदस्या |
| ४२) | आमगावकर हरिश्चंद्र रामचंद्र | सदस्य |
| ४३) | शिर्के अनंत गेणू | सदस्य |
| ४४) | पाटील वंदना विकास | सदस्या |
| ४५) | पाटील संध्या प्रफुल्ल | सदस्या |
| ४६) | पाटील प्रविण मोरेश्वर | सदस्य |
| ४७) | डॉ. पाटील प्रिती जयप्रकाश | सदस्या |
| ४८) | शेट्टी अरविंद आनंद | सदस्य |
| ४९) | गेहलोत हसमुख मोहनलाल | सदस्य |
| ५०) | शिंदे रुपाली वसंत (मोदी) | सदस्या |
| ५१) | थेराडे संजय अनंत | सदस्य |
| ५२) | मुखर्जी अनिता बबलू | सदस्या |
| ५३) | हसनाळे ज्योत्सना जालींदर | सदस्या |
| ५४) | पारधी सुजाता यशवंत | सदस्या |
| ५५) | म्हात्रे सचिन केसरीनाथ | सदस्य |
| ५६) | यादव मिरादेवी रामलाल | सदस्या |
| ५७) | म्हात्रे मोहन गोपाळ | सदस्य |
| ५८) | सोनार सुरेखा प्रकाश | सदस्या |
| ५९) | भोईर विणा सुर्यकांत | सदस्या |
| ६०) | भोईर कमलेश यशवंत | सदस्य |
| ६१) | पाटील अनिता जयवंत | सदस्या |
| ६२) | म्हात्रे परशुराम पदमाकर | सदस्य |
| ६३) | भोईर भावना राजू | सदस्या |
| ६४) | भोईर राजू यशवंत | सदस्य |
| ६५) | मांजरेकर आनंद दत्ताराम | सदस्य |
| ६६) | अरोरा दीपिका पंकज | सदस्या |
| ६७) | बेलानी हेमा राजेश | सदस्या |
| ६८) | दळवी प्रशांत ज्ञानदेव | सदस्य |
| ६९) | गजरे दौलत तुकाराम | सदस्य |
| ७०) | नाईक विविता विवेक | सदस्या |
| ७१) | सोंस नीला बर्नाड | सदस्या |
| ७२) | राय विजयकुमार सिस्थन नारायण | सदस्य |
| ७३) | शेख रुबीना फिरोझ | सदस्या |
| ७४) | डिसा मर्लिन मर्विन | सदस्या |
| ७५) | सावंत अनिल दिवाकर | सदस्य |
| ७६) | मेहरा राजीव ओमप्रकाश | सदस्य |
| ७७) | परमार हेतल रतिलाल | सदस्या |
| ७८) | भट दीप्ती शेखर | सदस्या |
| ७९) | कासोदारिया अश्विन शामजीभाई | सदस्य |
| ८०) | जैन दिनेश तेजराज | सदस्य |
| ८१) | भावसार वंदना संजय | सदस्या |
| ८२) | शाह सीमाबेन कमलेश | सदस्या |
| ८३) | दुबे मनोज रामनारायण | सदस्य |
| ८४) | विराणी अनिल रावजीभाई | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ८५) | सपार उमा विश्वनाथ | सदस्या |
| ८६) | अहमद साराह अकरम | सदस्या |
| ८७) | इनामदार जुबेर अब्दुल्ला | सदस्य |
| ८८) | शेख अशरफ मोहम्मद इब्राहीम | सदस्य |
| ८९) | भोईर जयेश भानुदास | सदस्य |
| ९०) | म्हात्रे नयना गजानन | सदस्या |
| ९१) | भानुशाली वर्षा गिरधर | सदस्या |
| ९२) | म्हात्रे विनोद काशिनाथ | सदस्य |
| ९३) | गोविंद हेलन जॉर्जी | सदस्या |
| ९४) | बगाजी शर्मिला विन्सन्ट | सदस्या |
| ९५) | बांड्या एलायस दुमिंग | सदस्य |

गैरहजर सदस्य - निरंक

रजेचा अर्ज - निरंक

मा. महापौर :-

मिरा भाईंदर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०१७ नंतर पहिली महासभेकरिता महासभेत उपस्थित मा. उपमहापौर, मा. आयुक्त, मा. सभागृहनेते, सर्व पक्ष गटनेते, सन्मा. नवनिर्वाचित नगरसेवक / नगरसेविका निवडून आल्याबद्दल अभिनंदन तसेच अधिकारी, पत्रकार बंधू व प्रेक्षक कक्षामध्ये उपस्थित नागरीक, ज्येष्ठ नागरिक ह्या सर्वांचे मी आभार मानत आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेचे प्रथम नागरिक तथा महापौर म्हणून मला माझ्या भारतीय जनता पक्षाचे सर्व नगरसेवक तसेच पक्षाचे नेते महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस, आदरणीय राज्यमंत्री श्री. रवींद्रजी चव्हाण, खासदार श्री. कपीलजी पाटील, आदरणीय आमदार श्री. नरेंद्र मेहता यांचे अथक प्रयत्नांनी व आमदार श्री. संजयजी केळकर पक्षाचे कार्यकर्ते व मतदार यांचे आशिर्वादाने व प्रयत्नांने मी आज महापौर पदी विराजमान झाल्याबद्दल सर्वांचे आभारी आहे. तसेच राज्यामध्ये व देशामध्ये भाजपाचे सरकार बहुमत येत आहे. यामध्ये देशाचे पंतप्रधान आदरणीय श्री. नरेंद्रजी मोदी यांचा सिंहाचा वाटा आहे. त्यांचे देखील मी आभार मानते. माझे महापौर पदाच्या कारकिर्दित मिरा भाईंदर शहराचा विकास व सर्वसामान्य जनतेच्या समस्या सोडवण्याकामी मी नेहमी कटीबंध राहील. तसेच मिरा भाईंदर शहराचे सर्वांगीण विकास कार्याचे वाटचालीसाठी आपले अमूल्य सहकार्य व मार्गदर्शन मला लाभेल अशी आशा बाळगते. आपले सारखे लोकप्रतिनिधी सोबत आम्हाला लाभली ह्या बद्दल अतिशय आनंद वाटतो. आजच्या महासभेत बरेच महत्वाचे विषय आहेत जसे कर्मचाऱ्यांचे अनुदान, जेसल पार्क, संजय राष्ट्रीय उद्यानातून मनपा हद्दीत येणारे पावसाळ्याचे पाण्याबद्दल, अग्निशमन केंद्राबाबत, मार्केटबाबत मंजूरी देणेबाबत प्रस्ताव आहेत. बरेच नवनिर्वाचित सदस्यांची पहिली महासभा आहे ह्यांना सर्वांना शुभेच्छा! सर्व सदस्यांना परवानगी घेऊन सभागृहात बोलण्याची परवानगी दिली जाईल. सर्वांनी खेळीमेळीच्या वातावरणात व शांततेत सभा पार पाडावी मला सहकार्य करावे तसेच दि. १७ ऑक्टोबरपासून सुरु होत असलेली दिवाळी व नविन वर्षाच्या सणाचे सर्व नागरिकांना व भाईंदर वासियांना हार्दिक शुभेच्छा तसेच सर्व पक्षाच्या नेत्यांना सभागृहात आपले मनोगत व्यक्त करण्यासाठी पाच मिनिटांचा अवधी देत आहे. धन्यवाद.

रोहिदास पाटील :-

सन्मा. महापौर, उपमहापौर, आयुक्त, सन्मा. सभागृह. सभागृह नेते म्हणून अत्यंत आनंद होत आहे. पक्षाने सभागृहनेतेची जबाबदारी दिलेली आहे. मी अपेक्षा करतो ह्या सभागृहामध्ये सार्वत्रिक निवडणूकीत नवनिर्वाचित सर्व नगरसेवक निवडून आलेत. आपणा सर्वांना माहिती आहे मिरा भाईंदर विकासासाठी मिरा भाईंदर जनतेने विरोधी पक्षाच्या माध्यमातून ९५ सदस्यांनी हा सभागृह चालवलेला आहे. भारतीय जनता पार्टीला बहुमत मिळाले आहे. हे सभागृह चालवण्याकरिता सोप आहे आम्हास वाटते तरी सुध्दा ह्या सभागृहात जे जुने सदस्य आहेत त्यांना देखील अनुभव आहेत. जे नविन सदस्य आहेत त्यांच्यावर जबाबदारी आहे. नविन सदस्यांनी मग ते कोणत्याही पक्षाचे असू द्या, कोणत्याही धर्माचे असु द्या, कोणत्याही जातीचे असू द्या त्याही पेक्षा त्याचे शैक्षणिक दृष्ट्या त्यांचा कर्तव्य असणार ह्या सभागृहामध्ये प्रत्येक सदस्य सन्मानीत आहे. आपआपल्या पक्षाच्या निती नियमाप्रमाणे, रिवाजाप्रमाणे, शिस्तीप्रमाणे सर्व ९५ सदस्य पाच वर्षांचा कार्यकाल संपूर्ण नीट जावा अशी अपेक्षा करतो एक अपेक्षा करतो की, मिरा भाईंदर मधील आम जनतेने आपले सर्वांसाठी राजकीय दृष्ट्या ज्याच्याप्रमाणे अस्तित्व दिलेले आहे आपल्याला भारतीय जनता पार्टी, शिवसेना व कॉंग्रेस हे सर्व पक्ष मिरा भाईंदरचे विकासासाठी पक्षाचे सदस्य पाच वर्षे खेळीमेळीच्या वातावरणात सभा चालते. विकासाच्या कामासाठी कुठेही अडथळा करणार नाही. प्रत्येक सदस्याची जी वर्तणूक असेल ती ह्या सभागृहाची शान वाढवण्याची असेल ह्या मिरा भाईंदरचे कायदा, सुव्यवस्था नीट अबादीत राहिल ह्या पध्दतीने असेल अशी मी अपेक्षा करतो. आणि दिपावलीच्या शुभेच्छा देतो धन्यवाद.

जुबेर इनामदार :-

सार्वत्रिक निवडणूक झाल्यानंतर निवडून आलेल्या सर्व सन्मा. सदस्यांचा ह्या सभागृहामध्ये मी काँग्रेस लोकशाही आघाडीच्या वतीने अभिनंदन करतो. तसेच निवडून आलेले महापौर तसेच उपमहापौर यांनी आपापल्या जबाबदाऱ्या सांभाळल्या आहेत. मी त्यांचेही अभिनंदन करतो. महापालिकेची महासभा म्हणजे लर्न स्थान आहे. ह्या शहराची आणि आपण एकत्र सर्व येऊन तसेच सत्ताधारी पक्ष, विरोधी पक्ष आणि सर्वांनी एकत्र शहराच्या विकासाच्या हितामध्ये कामकाज केले पाहिजे हे आपले धोरण असते कुठलेही धोरणात्मक निर्णय घेताना सत्ताधाऱ्यांनी विरोधी पक्षाबरोबर सत्यता मंथन करावे कारण की धोरण शहराच्या हितामध्ये असणार आहे. त्याच्यामध्ये प्रत्येक जणांचा सहभाग असायला पाहिजे. जेणेकरुन ते काम शहराच्या हितामध्ये ठरेल आणि याच्यातून शहराच्या रहिवाशांना फायदा होईल. सभागृहामध्ये कामकाज चालत असताना महापौर मॅडम कोणत्याही एका पक्षाचे महापौर नाहीत. सन्मा. महापौर पहिले नागरिक ह्या शहराचे आहात. विरोधी पक्षाला ही चर्चा करण्याची संधी देण्यात यावी चर्चा झाली कुठला विषयावर तरच प्रशासन त्याच्यावर उत्तर देऊ शकतो. नाहीतर प्रशासनाला कधीच गरज वाटत नाही. कुठल्याही विषयावर त्या-त्या विषयाची चर्चा व्हावी. कारण त्यांना त्यांची समज अशी असते की सर्वगुणसंपन्न असतात ते सांगतील ते योग्य आहे मात्र लोक आपल्याला निवडून देतात. लोकशाही पध्दतीने आपण सगळे निवडून आलेलो आहोत इथे बरेच विषय असतात ते लोकांच्या निगडीत असतात. आणि ते लोकप्रतिनिधीनेच सोडवावे. लोकप्रतिनिधीच त्यांची भुमिका मांडू शकतात हे गृहित आहेत. आपण लोकशाही पध्दतीने निवडून आलात माझी अपेक्षा आपण ही त्याच पध्दतीने हा सभागृह चालवाल हीच अपेक्षा आपल्याकडून राखतो तसेच ह्या शहरवासियांना दिपावलीच्या शुभेच्छा. जय हिंद, जय महाराष्ट्र!

प्रविण पाटील :-

सर्वप्रथम महापौर मॅडम आपले मनापासून अभिनंदन करतो, उपमहापौर आपलेही अभिनंदन करतो. महापौरांनी आज मराठीतून सुरुवात केली त्याच्याबद्दल मी सभागृहाच्या वतीने अभिनंदन करतो. ह्यापुढेही अशीच अपेक्षा आहे की मराठीतून हे सभागृह चालावे त्याचप्रमाणे ह्या सभागृहामध्ये निवडून आलेले सदस्य आहेत त्यांना आपण एक समान संधी द्यावी. वेळोवेळी बोलण्याची संधी द्यावी. ही अपेक्षा करतो. त्याचप्रमाणे शिवसेना पक्षाच्या वतीने आपले व नवनिर्वाचित सर्व नगरसेवकांचे अभिनंदन करतो. धन्यवाद.

दिनेश नलावडे :-

महापौर मॅडम, सर्वप्रथम आज ह्या ठिकाणी महापौर मॅडम आणि उपमहापौर यांना आम्ही शिवसेना पक्षाच्या वतीने अभिनंदन करतो आणि आपण ज्या पध्दतीने ह्या ठिकाणी निवडून आलात त्याबद्दल सभागृहाच्या वतीने अभिनंदन करतो. मी आज ह्या ठिकाणी दिवाळीचा सण जवळ आलेला आहे आणि ज्या अपेक्षा ह्या शहरवासियांच्या कडून महापौर मॅडम, उपमहापौर साहेब आपल्याला एक सुचना अशी देऊ इच्छितो की दिवाळीचा सण जवळ आलेला आहे. आणि ह्या ठिकाणी ह्या शहरामध्ये पाण्याचा तुटवडा भासत आहे. सगळ्यांच्या पाण्याविषयी तक्रारी येत आहेत. कृपया करुन याच्यासाठी व्यवस्था करण्यात यावी. दिवाळीचा सण हा हिंदु धर्मियांचाच नव्हे तर सर्व धर्मियांचा लोक साजरा करतात. ह्या शहरामध्ये दिवाळीत कुठल्याही प्रकारचा त्रास होऊ नये. खास करुन महापौर, उपमहापौर साहेब आपण लक्ष द्यावे ही विनंती करतो. आणि ह्या सभागृहात जे ज्येष्ठ नगरसेवक आणि नवनिर्वाचित नगरसेवक सर्व पक्षाचे निवडून आलेले सर्व नगरसेवकांना शुभेच्छा देतो धन्यवाद. जय हिंद, जय महाराष्ट्र!

निलम ढवण :-

सार्वत्रिक निवडणूक २०१७ नंतरच्या पहिल्याच महासभेमध्ये सन्मा. महापौर मॅडम, सन्मा. उपमहापौर, सन्मा. सभागृहनेते, सन्मा. नगरसेवक, सर्व पालिकेतील सन्मा. सचिव साहेब आणि सर्व कर्मचारी ह्या सर्वांना मी मनापासून शुभेच्छा शिवसेना पक्षाच्या वतीने पुन्हा एकदा दिवाळी निमित्त शुभेच्छा देते. सर्वांचे अभिनंदन करते आणि महापौर मॅडम आपण ह्या शहराचे प्रथम नागरीक म्हणून आमचे सर्वांचे महापौर म्हणून आम्ही हीच अपेक्षा करतो की विरोधास विरोध न करता जे विषय असतील शहराच्या विकासाच्या दृष्टीने त्याकडे जास्त लक्ष देऊन ह्या सभागृहामध्ये मेजोरीटी गृहित धरुन कुठल्याही विषयावर निर्णय न घेता आपण विकासाच्या दृष्टीने आणि प्रत्येक सदस्याला न्याय द्यावा अशी मी आज अपेक्षा व्यक्त करते आणि आपल सर्वांना मन:पूर्वक शुभेच्छा देते. जय हिंद, जय महाराष्ट्र!

मा. महापौर :-

सचिव साहेबांनी सभेला सुरुवात करावी.

प्र. नगरसचिव :-

मिरा भाईंदर महानगपालिकेची मा. विशेष महासभा सोमवार दि. १६/१०/२०१७ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात महासभा सुचना क्र. ०२ मधील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. **प्रकरण क्र. ०३,** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम २० चे तरतुदीनुसार स्थायी समिती गठीत करणेबाबत.

जुबेर इनामदार :-

महापौर मॅडम, मला एक शंका आहे. ह्या शहराच्या विकासामध्ये पहिल्यांदा असे झाले आहे. दुसरी सभा ही कामकाजाची पहिली सभा नव्हे. दुसरी सभा कामकाजाची दुसरी सभा सर्वसाधारण काय सभाचा विशेष कामासाठी सर्वसाधारण सभा लागली पाहिजे होती. ह्याची आधी लावता आली पाहिजे होती तुम्हाला. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम त्याच्यात स्पष्ट आदेश त्याच्यामध्ये आहे पहिली सभा प्रत्येक महिन्याच्या २० तारखेच्या आत एक सर्वसाधारण सभा आयोजित केली पाहिजे.

ध्रुवकिशोर पाटील :-

जुबेरजी आपल्याला माहिती आहे प्रत्येक महिन्यात सभा घ्यायचा अधिकार महापौरांचा आहे आणि घेतली आहे.

(सभागृहात गोंधळ)

जुबेर इनामदार :-

सचिव महोदयांनी ह्यावर उत्तर द्या.

प्रशांत दळवी :-

महापौर मॅडम आपल्या परवानगीने बोलतो आताच यांनी सर्व सहकारी नगरसेवकांनी निर्णय केला की ही सभा खेळीमेळीच्या वातावरणात झाली पाहिजे. सर्वांना बोलायची संधी द्या. महापौर आपण संधी देत आहात. अशाप्रकारे आरडाओरड करण हे सभागृहाचे वर्तन नाही ना.

निलम ढवण :-

महापौर मॅडम, सन्मा. आमचे सहकारी हे जे सांगत आहेत वातावरण बिघडत आहे. प्रश्न फक्त असा विचारला होता की विशेष सभा का लावण्यात आली. महासभा लावण्याचा अधिकार आपल्याला आहे आणि तो प्रश्न फक्त आपल्याला विचारला आहे. हे मला माहित आहे. महापौर म्हणून सुज्ञ आहात तुम्ही त्याचे उत्तर तुम्ही देणारच वादाला सुरुवात कशाला करायची.

मा. उपमहापौर :-

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो, आपल्याला सर्वांना ज्ञात आहे की निवडणूकीनंतर आपल्या सर्व पक्षाच्या गटाची नोंदणी ही कोकण आयुक्तांकडे करायची असते आणि आम्हाला अधिक उत्साह होता की सिरिट मेजोरेटी मिरा भाईंदर वासियांनी आपल्याला दिलेली आहे. त्यावेळेला मिरा भाईंदर वासियांसाठी लवकरात लवकर कामाला सुरुवात करावी परंतु काही कारणास्तव कोकण आयुक्तांकडून त्वरीत संख्याबळ मिळण्याबाबत आपल्याला उशीर झाला. आपल्याकडे उर्वरीत संख्याबळ प्राप्त झाल्याबरोबर आपल्या सर्व सानुग्रह अनुदानाचा एक विषय होता तो विषयपत्रिकेवर तुम्ही पाहिला असेल ते अत्यंत महत्वाचे विषय म्हणजे ह्या पावसाळा कालपर्यंत आपण पाहिलात. दिवाळीत सुध्दा पाऊस पडतो आणि तो एक महत्वाचा विषय होता. हे महत्वाचे विषय लावायचे म्हणून उर्वरित संख्याबळ मिळाल्याबरोबर आपल्याकडे त्या दिवसाची पुर्तता नव्हती म्हणून महापौरांनी त्यांच्या अधिकाराविषयी महासभा लावलेली आहे. हा त्यांचा अधिकार आहे.

जुबेर इनामदार :-

मी हा प्रश्न सचिवांना विचारला होता. मला सचिवांनी याच्याविषयी माहिती द्यावी. त्याला कारण असे आहे सर्व काही आईच्या पोटातून शिकून येत नाही. महापौर, सर्व नगरसेवक सभागृहामध्ये होते. महत्वाची जबाबदारी होती की त्याला व्यवस्थित न्याय दिला पाहिजे होता. सर्वसाधारण सभा भरवता आली असती त्वरीत संख्या नाही आली. १० तारखेला आपल्याकडे प्राप्त झालेली आहे. उर्वरीत संख्या नाही आली तरी ही सर्वसाधारण सभा बोलवण्यात आली असती कारण पहिली सभा बोलवण्याचा अधिकार फक्त आयुक्तांना आहे. आणि दुसरी सभा बोलवण्याचा अधिकार महापौरांचा होता आणि सर्वसाधारण सभा लागली असती ह्या शहरावर निगडीत विषयावर चर्चा झाली असती. प्रश्नोत्तर तास असता, लक्षवेधी लागली असती. बरेच काही विषय शहराला निगडीत होते. बऱ्याच विषयावर चर्चा करायची होती आणि चर्चा करण्यासाठी संधी मिळाली असती.

मा. उपमहापौर :-

विशेष समित्या ह्या महापालिकेचे कामकाज करण्यासाठीच विशेष समित्यांची गरज आहे. त्यासाठी स्थायी समिती अस्तित्वात येणे फार महत्वाचे आहे. सर्व समित्या अस्तित्वात येणे फार महत्वाचे आहे. आणि ह्या समित्या लवकर आपल्याकडे गठीत करता याव्यात म्हणून आपल्याला ह्या उर्वरीत संख्याबळाची गरज होती. जुबेर साहेब आता आपण विराम घ्यावा.

जुबेर इनामदार :-

सचिव महोदय ती वैज्ञानिक समिती आहे. ती आम्हाला मान्य आहे. ती झालीच पाहिजे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ त्याच्यात महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम पूर्वी हा संख्याबळाचा विषय गटाचा नव्हता. तेव्हा पासून हे निरंक आहे. त्या काळामध्ये पहिल्या सभेमध्येच सोळा सदस्यांची नियुक्ती हा विषय असायचा. ही दुसरी सभा तुम्ही याला नाकारुन चालणार दुसरी सभा आहे म्हणून तुम्ही नोटिस पाठवली मला. नोटिस क्रमांक दोन आहे ह्याचा अर्थ सभागृहात दुसऱ्यांदा आहे म्हणजे याचे आधी

सभा बोलवता आली असती हे तुम्ही चुकलात हे तुम्ही मान्य करा. चांगले ज्ञान सचिव महोदय तुम्ही महापौरांना दिला पाहिजे. झाली चूक ती आम्ही तुमची क्षमा करतो.

मा. उपमहापौर :-

विषय काय आहे आणि तुम्ही काय बोलता.

जुबेर इनामदार :-

महापौरांना उत्तर देऊ द्या.

मा. उपमहापौर :-

महापौरांच्या मान्यतेने बोलतो महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २० चे तरतुदीनुसार स्थायी समिती गठीत करण्याचा अधिकार ह्या सभेत आहे. पहिली महासभा महापौरांचा अधिकार असतो.

जुबेर इनामदार :-

स्थायी समिती पालिका सदस्य महानगरपालिकेने सार्वत्रिक निवडणूकी संदर्भातल्या पहिल्या सभेत आपल्या पालिका सदस्यांपैकी सोळा व्यक्तींची स्थायी समिती सदस्य म्हणून नेमणूक केली पाहिजे. पहिला सभा आटोपली. ही दुसरी सभा सचिव महोदयांनी उत्तर द्यावे.

प्र. नगरसचिव :-

पहिले तुम्ही सांगता ज्याप्रमाणे पहिली सभा ही मा. कोकण आयुक्तांचा अधिकार आहे. त्यानुसार पहिली सभा जी झालेली होती ती विशेष फक्त महापौर आणि उपमहापौरांची निवडणूकीची झालेली होती ती सभा म्हणून ॲक्च्युअली होत नाही ती निवडणूक म्हणूनच गणली जाते. त्याच्यानंतर आज जी आपण आयोजित केलेली ही पहिली सभा सदस्यांची आहे आणि ह्या पहिल्या सभेमध्ये कलम १९,२० नुसार स्थायी समितीचे सदस्य गठीत होणे आवश्यक आहे आणि ह्या कारणास्तव आपण ही पहिली सभा गटाचे संख्याबळ जेव्हा आपल्याला १० तारखेला प्राप्त झाला त्याच दिवशी संध्याकाळी हा अजेंडा काढला त्याच्यानंतर आपल्याकडे सात दिवस पूर्ण मुदत नसल्यामुळे दिवाळीच्या आधी हे विषय अपेक्षित असल्याकारणाने मा. महापौरांनी विशेष महासभेचे आयोजन केलेले आहे. प्रकरण क्र. ०३, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम २० चे तरतुदीनुसार स्थायी समिती गठीत करणेबाबत. स्थायी समिती सदस्य गठीत करण्यासाठी दिलेल्या संख्याबळाचे आपले सदस्याचे नाव द्यायचे आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम २० चे तरतुदीनुसार स्थायी समिती गठीत करण्यासाठी भारतीय जनता पक्षाचे गटनेता श्री. हसमुख गेहलोत यांनी जी सदस्यांची नावे दिलेली आहेत ती वाचून दाखवतो. १ श्री. हसमुख एम. गेहलोत २ श्री. पाटील ध्रुवकिशोर मन्साराम ३ श्री. रवि वासुदेव व्यास ४ श्रीम. यादव मिरादेवी रामलाल ५ श्री. तिवारी अशोक सुर्यदेव ६ श्री. दळवी प्रशांत ज्ञानदेव ७ श्रीम. रावल मेघना दिपक ८ श्री. खंडेलवाल सुरेश जगदीश ९ श्रीम. विराणी अनिल रावजीभाई १० श्री. म्हात्रे मोहन गोपाळ त्याच्यानंतर गटनेता शिवसेनेचे श्री. हरिश्चंद्र आमगावकर यांनी जी नावे दिली आहेत ती वाचून दाखवतो. १. श्रीम. अनिता पाटील २. श्रीम. दिप्ती भट्ट ३. श्री. वंदना विकास पाटील, ४. श्रीम. तारा विनायक घरत. गटनेता श्री. जुबेर इनामदार, कॉंग्रेस पक्ष आघाडी यांनी नावे दिलेली आहे ती वाचून दाखवितो १. श्रीम. नुरजहॉं नझर हुसेन २. श्री. जुबेर इनामदार ही नावे मी मा. महापौरां समोर ठेवतो.

मा. महापौर :-

गटनेत्यांनी दिलेली नावे सचिवांनी वाचलेले आहेत ती मंजूर आहेत. श्री. जुबेर इनामदार व श्री. हरिश्चंद्र आमगावकर ह्यांनी दिलेले नाव पण मंजूर आहेत.

प्रकरण क्र. ०३ :-

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम २० चे तरतुदीनुसार स्थायी समिती गठीत करणेबाबत.

ठराव क्र. ०१ :-

मिरा भाईंदर महानगरपालिका सार्व. निवडणूक २०१७ मध्ये एकूण ९५ नवनिर्वाचित पालिका सदस्य निवडून आलेले आहेत. महानगरपालिकेच्या स्थायी समितीवर १६ सदस्यांची नियुक्ती मान्यताप्राप्त पक्षाचे किंवा नोंदणीकृत पक्षाचे तौलनिक पक्षबळ विचारात घेउन महानगरपालिकेतील अशा पक्षाच्या किंवा गटाच्या संख्याबळावर स्थायी समितीमध्ये नामनिर्देशन करण्याबाबतची तरतुद आहे.

महानगरपालिकेच्या नवनिर्वाचित सदस्यांनी मा. विभागीय आयुक्त सो. कोकण विभाग यांचे कार्यालयात नोंदणी करून गट/आघाडी/फ्रंट तयार केल्याप्रमाणे तौलनिक पद्धतीनुसार गटनिहाय स्थायी समितीवर खालीलप्रमाणे सदस्य संख्या प्रस्तावित होती.

१. भारतीय जनता पार्टी - ६१
२. शिवसेना - २२
३. कॉंग्रेस लोकशाही आघाडी - १२

याप्रमाणे स्थायी समितीवर खालील १६ सदस्यांची नियुक्ती करण्यात येत आहे.

| अ.क्र | सदस्यांचे नाव | फ्रंट / आघाडी |
|---|---|---|
| १. | श्री. गेहलोत हसमुख मोहनलाल | भारतीय जनता पार्टी |

| | | |
|---|---|---|
| २. | श्री. पाटील ध्रुवकिशोर मन्साराम | भारतीय जनता पार्टी |
| ३. | श्री. व्यास रवि वासुदेव | भारतीय जनता पार्टी |
| ४. | श्रीम. यादव मीरादेवी रामलाल | भारतीय जनता पार्टी |
| ५. | श्री. तिवारी अशोक सुर्यदेव | भारतीय जनता पार्टी |
| ६. | श्री. दळवी प्रशांत ज्ञानदेव | भारतीय जनता पार्टी |
| ७. | श्रीम. रावल मेघना दिपक | भारतीय जनता पार्टी |
| ८. | श्री. खंडेलवाल सुरेश जगदीश | भारतीय जनता पार्टी |
| ९. | श्री. विरानी अनिल रावजीभाई | भारतीय जनता पार्टी |
| १०. | श्री. म्हात्रे मोहन गोपाळ | भारतीय जनता पार्टी |
| ११. | श्रीम. अनिता पाटील | शिवसेना |
| १२. | श्रीम. दिप्ती भट्ट | शिवसेना |
| १३. | श्रीम. वंदना विकास पाटील | शिवसेना |
| १४. | श्रीम. तारा विनायक घरत | शिवसेना |
| १५. | श्रीम. नुरजहॉ नझर हुसैन | कॉंग्रेस लोकशाही आघाडी |
| १६. | श्री. इनामदार जुबेर | कॉंग्रेस लोकशाही आघाडी |

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

जुबेर इनामदार :-

अधिकार सभागृहाचा आहे पण ठराव करावा लागेल.

रिटा शाह :-

महिला बालकल्याण समिती अंतर्गत १५ सदस्य घ्यायचे अशी मी सुचना किंवा ठराव मांडत आहे. आणि सदर कमिटीचे सदस्य एका वर्षासाठी राहणार.

प्र. नगरसचिव :-

**प्रकरण क्र. ०४,** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम ३० (१) चे तरतुदीनुसार महिला व बालकल्याण समिती गठीत करणेबाबत. **प्रकरण ४** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २०-१ चे तरतूदीनुसार महिला व बालकल्याण समिती गठीत करण्याबाबत विषयावरती ठराव झालेला आहे. दुसर सदस्य निवडून देऊन त्यांची मुदत ही एक वर्षाची राहील त्या अनुषंगाने १५ सदस्याकरिता भारतीय जनता पार्टीला १० सदस्य प्रस्तावित आहेत आणि शिवसेनेला तीन आहेत आणि कॉंग्रेस पक्ष आघाडीला दोन आहेत. त्यानुसार श्री. हसमुख गेहलोत, गटनेता, भारतीय जनता पार्टी यांनी १० नाव दिलेली आहेत. १. श्रीम. शानु गोहिल २. श्रीम. हसनाळे ज्योत्सना जालींदर ३. श्रीम. भावसार वंदना संजय ४. श्रीम. भोईर सुनिता शशिकांत ५. श्रीम. शाह सिमा कमलेश ६. श्रीम. सोनार सुरेखा प्रकाश ७. श्रीम. म्हात्रे नयना गजानन ८. श्रीम. वैशाली गजेंद्र रकवी ९. श्रीम. अरोरा दिपीका पंकज १०. श्रीम. रक्षा सतीश भूप्तानी (शाह) गटनेता श्री. हरिश्चंद्र आमगावकर शिवसेना गटनेता यांनी तीन नावे दिलेली आहेत. ती मी वाचुन दाखवतो. १. श्रीम. अर्चना अरुण कदम २. श्रीम. कुसुम गुप्ता ३. श्रीम. हेलन गोविंद जॉर्जी. गटनेता श्री. जुबेर इनामदार, कॉंग्रेस लोकशाही आघाडी यांनी दोन नावे दिलेली आहेत. ती मी वाचुन दाखवतो. १. श्रीम. शेख रुबीना फिरोज २. श्रीम. एहमद सारा अकरम ह्याप्रमाणे १५ नावे आलेली आहेत. ती मी मा. महापौरांकडे देतो.

मा. महापौर :-

मा. गटनेता हसमुख गेहलोतने दिलेली नावे मंजुर आहेत. मा. गटनेता श्री. हरिश्चंद्र आमगावकर त्यांनी दिलेली नावे मंजुर आहेत. मा. श्री. जुबेर इनामदार ह्यांनी दिलेली नावे पण मंजुर आहेत आणि ठराव देखील मंजुर आहे.

प्रकरण क्र. ०४ :-

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम ३० (१) चे तरतुदीनुसार महिला व बालकल्याण समिती गठीत करणेबाबत.

ठराव क्र. ०२ :-

मिरा भाईंदर महानगरपालिका सार्व. निवडणूक २०१७ मध्ये एकूण ९५ नवनिर्वाचित पालिका सदस्य निवडून आलेले आहेत. महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण समितीवर १५ सदस्यांची नियुक्ती मान्यताप्राप्त पक्षाचे किंवा नोंदणीकृत पक्षाचे तौलनिक पक्षबळ विचारात घेउन महानगरपालिकेतील अशा

पक्षाच्या किंवा गटाच्या संख्याबळावर महिला व बालकल्याण समितीमध्ये नामनिर्देशन करण्याबाबतची तरतुद आहे.

महानगरपालिकेच्या नवनिर्वाचित सदस्यांनी मा. विभागीय आयुक्त सो. कोकण विभाग यांचे कार्यालयात नोंदणी करून गट/आघाडी/फ्रंट तयार केल्याप्रमाणे तौलनिक पद्धतीनुसार गटनिहाय महिला व बालकल्याण समितीवर खालीलप्रमाणे सदस्य संख्या प्रस्तावित होती.

१. भारतीय जनता पार्टी - ६१
२. शिवसेना - २२
३. भारतीय राष्ट्रीय काँग्रेस - १२

याप्रमाणे महिला व बालकल्याण समितीवर खालील १५ सदस्यांची १ वर्षाकरीता नियुक्ती करण्यात येत आहे.

| अ.क्र | सदस्यांचे नाव | फ्रंट / आघाडी |
|---|---|---|
| १. | श्रीम. गोहिल शानु जोरावरसिंग | भारतीय जनता पार्टी |
| २. | श्रीम. हसनाळे ज्यैत्स्ना जालींदर | भारतीय जनता पार्टी |
| ३. | श्रीम. भावसार वंदना संजय | भारतीय जनता पार्टी |
| ४. | श्रीम. भोईर सुनिता शशिकांत | भारतीय जनता पार्टी |
| ५. | श्रीम. शाह सीमा कमलेश | भारतीय जनता पार्टी |
| ६. | श्रीम. सोनार सुरेखा प्रकाश | भारतीय जनता पार्टी |
| ७. | श्रीम. म्हात्रे नयना गजानन | भारतीय जनता पार्टी |
| ८. | श्रीम. रकवी वैशाली गजेंद्र | भारतीय जनता पार्टी |
| ९. | श्रीम. अरोरा दिपिका पंकज | भारतीय जनता पार्टी |
| १०. | श्रीम. भुप्तानी रक्षा सतीश (शाह) | भारतीय जनता पार्टी |
| ११. | श्रीम. अर्चना अरुण कदम | शिवसेना |
| १२. | श्रीम. कसुम गुप्ता | शिवसेना |
| १३. | श्रीम. हेलन जॉर्जी गोविंद | शिवसेना |
| १४. | श्रीम. शेख रुबीना फेरोज | काँग्रेस लैंकशाही आघाडी |
| १५. | श्रीम. अहमद साराह अकरम | काँग्रेस लैंकशाही आघाडी |

सुचक :- श्रीम. रिटा शाह अनुमोदन :- श्रीम. शानु गोहिल
ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्र. नगरसचिव :-

**प्रकरण क्र. ०५,** महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन (सुधारणा) अधिनियम १९७५ अन्वये वृक्ष प्राधिकरण समितीच्या सदस्य पदासाठी नियुक्ती करणे.

ध्रुवकिशोर पाटील :-

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ मधील प्रकरण २ नियम ३(१) अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिका वृक्षप्राधिकरण समितीवर १५ पालिका सदस्यांची नियुक्ती होणे आवश्यक आहे.

महानगरपालिकेच्या नवनिर्वाचित सदस्यांनी मा. विभागीय आयुक्त सो. कोकण विभाग यांचे कार्यालयात नोंदणी करून गट/आघाडी/फ्रंट तयार केल्याप्रमाणे तौलनिक पद्धतीनुसार गटनिहाय वृक्षप्राधिकरण समितीवर खालीलप्रमाणे सदस्य संख्या प्रस्तावित होती.

१. भारतीय जनता पार्टी - ६१
२. शिवसेना - २२
३. भारतीय राष्ट्रीय काँग्रेस - १२

याप्रमाणे वृक्षप्राधिकरण समितीवर खालील १५ सदस्यांची एक वर्षाच्या मुदतीकरिता नियुक्ती करण्यात येत आहे.

| अ.क्र | सदस्यांचे नाव | फ्रंट / आघाडी |
|---|---|---|
| १. | श्री. म्हात्रे विनोद काशीनाथ | भारतीय जनता पार्टी |
| २. | श्री. शेट्टी गणेश गोपाळ | भारतीय जनता पार्टी |
| ३. | श्री. म्हात्रे सचिन केसरीनाथ | भारतीय जनता पार्टी |
| ४. | डॉ. पाटील प्रिती जयप्रकाश | भारतीय जनता पार्टी |

| | | |
|---|---|---|
| ५. | श्रीम. सोंस नीला बर्नाड | भारतीय जनता पार्टी |
| ६. | श्रीम. कांगणे मीना यशवंत | भारतीय जनता पार्टी |
| ७. | श्री. दुबे मनोज रामनारायण | भारतीय जनता पार्टी |
| ८. | श्री. भोईर गणेश गजानन | भारतीय जनता पार्टी |
| ९. | श्रीम. पारधी सुजाता यशवंत | भारतीय जनता पार्टी |
| १०. | श्रीम. बेलानी हेमा राजेश | भारतीय जनता पार्टी |

**सुरेश खंडेलवाल :-**

**माझे अनुमोदन आहे.**

**प्र. नगरसचिव :-**

**वृक्ष प्राधिकरण समितीसाठी श्री. हसमुख गेहलोत, भारतीय जनता पार्टीचे गटनेता यांनी १० नावे दिलेली आहेत. ती मी वाचुन दाखवतो.** श्री. म्हात्रे विनोद काशीनाथ, श्री. शेट्टी गणेश गोपाळ, श्री. म्हात्रे सचिन केसरीनाथ, डॉ. पाटील प्रिती जयप्रकाश, श्रीम. सौंस नीला बर्नाड, श्रीम. कांगणे मीना यशवंत, श्री. दुबे मनोज रामनारायण, श्री. भोईर गणेश गजानन, श्रीम. पारधी सुजाता यशवंत, श्रीम. बेलानी हेमा राजेश. **श्री. हरिश्चंद्र आमगावकर, गटनेता, शिवसेना यांनी तीन नावे दिलेली आहेत.** श्री. कमलेश यशवंत भोईर , श्री. आनंद शिर्के , श्री. एलायस बांड्या **श्री. जुबेर इनामदार, गटनेता, काँग्रेस लोकशाही आघाडी यांनी दोन नावे दिलेली आहेत.** श्री. मेहरा राजीव ओमप्रकाश, श्री. शेख अमजद गफार. **ह्याप्रमाणे वृक्षप्राधिकरण समितीसाठी १५ सदस्यांची नावे आलेली आहेत.**

**प्रकरण क्र. ०५ :-**

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन (सुधारणा) अधिनियम १९७५ अन्वये वृक्ष प्राधिकरण समितीच्या सदस्य पदासाठी नियुक्ती करणे.

**ठराव क्र. ०३ :-**

**महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ मधील प्रकरण २ नियम ३(१) अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिका वृक्षप्राधिकरण समितीवर १५ पालिका सदस्यांची नियुक्ती होणे आवश्यक आहे.**

**महानगरपालिकेच्या नवनिर्वाचित सदस्यांनी मा. विभागीय आयुक्त सो. कोकण विभाग यांचे कार्यालयात नोंदणी करून गट/आघाडी/फ्रंट तयार केल्याप्रमाणे तौलनिक पद्धतीनुसार गटनिहाय वृक्षप्राधिकरण समितीवर खालीलप्रमाणे सदस्य संख्या प्रस्तावित होती.**

१. भारतीय जनता पार्टी - ६१
२. शिवसेना - २२
३. भारतीय राष्ट्रीय काँग्रेस - १२

**याप्रमाणे वृक्षप्राधिकरण समितीवर खालील १५ सदस्यांची एक वर्षाच्या मुदतीकरिता नियुक्ती करण्यात येत आहे.**

| अ.क्र | सदस्यांचे नाव | फ्रंट / आघाडी |
|---|---|---|
| १. | श्री. म्हात्रे विनोद काशीनाथ | भारतीय जनता पार्टी |
| २. | श्री. शेट्टी गणेश गोपाळ | भारतीय जनता पार्टी |
| ३. | श्री. म्हात्रे सचिन केसरीनाथ | भारतीय जनता पार्टी |
| ४. | डॉ. पाटील प्रिती जयप्रकाश | भारतीय जनता पार्टी |
| ५. | श्रीम. सोंस नीला बर्नाड | भारतीय जनता पार्टी |
| ६. | श्रीम. कांगणे मीना यशवंत | भारतीय जनता पार्टी |
| ७. | श्री. दुबे मनोज रामनारायण | भारतीय जनता पार्टी |
| ८. | श्री. भोईर गणेश गजानन | भारतीय जनता पार्टी |
| ९. | श्रीम. पारधी सुजाता यशवंत | भारतीय जनता पार्टी |
| १०. | श्रीम. बेलानी हेमा राजेश | भारतीय जनता पार्टी |
| ११. | श्री. कमलेश यशवंत भोईर | शिवसेना |
| १२. | श्री. अनंत शिर्के | शिवसेना |
| १३. | श्री. एलायस बांड्या | शिवसेना |
| १४. | श्री. मेहरा राजीव ओमप्रकाश | काँग्रेस लोकशाही आघाडी |
| १५. | श्री. शेख अमजद गफार | काँग्रेस लोकशाही आघाडी |

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील अनुमोदक :- श्री. सुरेश खंडेलवाल**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्र. नगरसचिव :-

**प्रकरण क्र. ०६**, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम २९ (अ) अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या हद्दीत सहा प्रभाग समित्यांची रचना करणेबाबत. (भौगोलिक रचनेस मान्यता देणे.)

ध्रुवकिशोर पाटील :-

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २९(अ) मधील तरतुदीनुसार महापालिकेच्या हद्दीत प्रशासकीय अधिकारांचे विकेंद्रीकरण व्हावे व लोकप्रतिनिधीत्व करणारे पदाधिकारी व नगरसेवक यांच्या लोकाभिमुख ध्येय धोरणानुसार प्रभागांचा विकास व्हावा म्हणून महानगरपालिकेने उपरोक्त कायदेशीर तरतुदीनुसार प्रभाग समित्या स्थापन करणे आवश्यक आहे.

कलम २९(अ) अन्वये प्रभाग समित्याची रचना करणेविषयी असलेल्या तरतुदीनुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेची सन २०११ च्या जनगणनेनुसार लोकसंख्या ८.१४ लाख असल्याने महानगरपालिका कार्यक्षेत्रात एकूण सहा प्रभाग समित्या स्थापन करणे आवश्यक आहे. सदर प्रभाग समिती रचना प्रस्तावित करताना प्रामुख्याने भौगोलिक रचना, नैसर्गिक हद्दी, मुख्य रस्ते ह्यांचा विचार करुन करण्यात आल्या आहेत. मिरा भाईंदर शहराचे पश्चिम रेल्वे उपनगरीय सेवेमुळे दोन भागात विभाजन झालेले आहे. भाईंदर (प.) भागात दोन प्रभाग समित्या व भाईंदर (पू.) व मिरारोड भागातील भौगोलिक क्षेत्र व नैसर्गिक हद्द यांचा विचार करुन चार प्रभाग समित्याची रचना प्रस्तावित करण्यात आलेली आहे. निवडणूक प्रभागाची हद्द आणि क्षेत्र संलग्नता विचारात घेऊन खालील प्रमाणे प्रभाग समित्या स्थापन करणेच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र. | प्रभाग समिती क्रमांक | प्रभाग समिती क्षेत्रात समाविष्ट निवडणूक प्रभाग | एकूण प्रभाग |
|---|---|---|---|
| १ | भाईंदर (प.) १ | ८, २३, २४ | ३ |
| २ | भाईंदर (प.) २ | १,६,७ | ३ |
| ३ | भाईंदर (पू.) ३ | २,३,४,५,११ | ५ |
| ४ | भाईंदर (पू.) ४ | ९,१०,१२,१३,१८ | ५ |
| ५ | मिरारोड (पू.) ५ | २०,२१,२२ | ३ |
| ६ | मिरारोड (पू.) ६ | १४,१५,१६,१७,१९ | ५ |
| एकूण | ६ | | २४ |

वरील प्रमाणे प्रभाग समित्यांच्या भौगोलिक रचनेस ही मा. महासभा मान्यता देत आहे.

अनिल विराणी :-

माझे अनुमोदन आहे.

जुबेर इनामदार :-

आमचा ठराव अहे. आयुक्त महोदय, आपण गोषवाऱ्यासहीत आपल्या स्वाक्षरीने भौगोलिक रचना ह्या शहराची तसेच प्रभाग रचना ज्याप्रकारे झाली होती. त्याप्रमाणे आपण भौगोलिक रचनेचा तक्ता पाठविलेला होता. त्याचा नकाशा पाठविलेला आहे. तो अतिशय योग्य अशा स्वरुपाचा आहे. कारण भौगोलिक रचना बदलताना रस्ता ओलांडला जात नाही. आपण एक योग्य गोषवारा प्रशासनाने प्रभाग समितीसाठी पाठविलेला होता. त्याच्यामध्ये झालेला बदल हा जो बदल करण्यांत आलेला आहे सत्ताधाऱ्याने जो ठराव मांडला. तो गोषवारा विपरीत आहे, विसंगत आहे. त्याला मान्यता मिळेल बहुमताने. मात्र हा अधिकार तुमचा आहे. आयुक्त महोदय माझी आपल्याला विनंती राहील आम्ही हा ठराव मांडणार प्रशासनाने दिलेला गोषवारा त्याचप्रमाणे रचना ठेवावी तशीच राखावी कारण भौगोलिक रचना ती योग्य आहे. आमची आपणांस विनंती आहे की कदाचित आमचा ठराव बहुमतांनी होत नाही मत कमी पडतील. प्रशासनात जी ताकद आहे जे हत्यार आहे ४५१ चा त्याला वापरुन आपण हा ठराव विखंडीत करायला पाठवा. कारण हा गोषवाऱ्याला विसंगत आहे. प्रशासनाने दिलेला गोषवाऱ्याला विसंगत असलेला ठराव हा तुमच्या अधिकारात असतो. आणि त्याचे परिपत्रक तत्कालीन आयुक्त हांगे साहेबांनी त्याचा वापर केला होता. तोच ठराव त्यांनी शासनाकडे पाठवून तो विखंडीत करुन घेतले होते. माझी आपणांस विनंती आहे त्याच धर्तीवर आपण ही कारवाई करावी. मी ठराव वाचतो.

अनिल सावंत :-

महापौर मॅडम, खेळीमेळीच्या वातावरणात पहिला उत्कृष्ठ नमुना सत्ताधारी पक्षाकडून ह्या शहराला बघायला मिळालेला आहे. आदरणीय महापौर साहेब त्यांनी आपल्या भाषणात मगाशी सांगितले होते की, प्रभाग समित्या बनणे गरजेचे आहे. लोकप्रतिनिधीला त्या प्रभाग समित्यांच्यामार्फत कामे करायला मिळणार आहेत. प्रशासनाने आयुक्ताने जो गोषवारा दिला. व्यवस्थित अभ्यास करुन चार्ट बनवून तो गोषवारा दिलेला

आहे. २९ (अ) नुसार भौगोलिक रचना लोकसंख्या यांचा विचार करुन तो गोषवारा दिलेला आहे. हे सत्तेचा माज काय असतो ह्या ठरावाने हे सिध्द केलेले आहे. ९ नंबर प्रभाग ४ नंबरमध्ये टाकायचे कारण त्यांचे तिथे सदस्य जास्त आहेत. ९ नंबरचा एरिया कुठपर्यंत येतो. ४ नंबर प्रभाग समिती कुठे आहे. कुठला नागरीक कुठे जाणार. प्रभाग समित्यांमध्ये फक्त नगरसेवक जात नाही. नागरीक जातात. ९ नंबर प्रभागातला जर जागरीक त्याला पाणी बील, त्याला लाईट बील, तुमचा प्रॉपर्टी टॅक्स जर करायचा असेल तर तो भाईंदर इस्टला जाऊन भरणार का? त्यावेळी तुमचे अधिकारी जागेवर नसणार? तसाच सभागृह नेत्यांनी ठराव वाचायचा असतो. एवढा कॉमनन्सेन्स पण नाही आहे. बहुमताने ठराव तुम्ही काहीही कराल. १९ नंबर रामनगरला टाकला १९ नंबर सुरु कुठून होतो. जुना पेट्रोल पम्प जुना पेट्रोल पम्प कुठे आला. रामनगर कुठे इथले नागरीक जाणार. कुठे त्या प्रभागामध्ये तुमचा बहुमताने म्हणून आयुक्तांवर विश्वास नाही आहे का? प्रशासनावर विश्वास नाही आहे का? मग इतर गोषवारे कशाला त्यांच्या सहीने घेता ह्या मिटींगमध्ये काही तरी ठराव करायचे आणि पूर्ण ५ वर्षामध्ये सभागृहनेत्याने सांगितलेले होते. विकासासाठी आपण एकत्र येऊन काम करुया. अशापध्दतीने काम करणार आहात का तुम्ही? असा ठराव करणार आहात? शहरातल्या नागरिकांनी तुम्हाला निवडून दिलेले आहे. नागरीकांचे बरेचशे प्रश्न प्रभाग समित्यांशी निगडीत असतात. प्रभाग समिती तुम्ही ५-५, ६-६ कि.मी. नेऊन ठेवली त्या प्रभागामध्ये. लोकसंख्येचा विचार केला नाही. सत्ताधारी पक्षाने केलेला पहिला ठराव हा कसा विखंडीत होतो आणि प्रभाग समित्या कशा अस्तित्वात येत नाहीत. याचे उदाहरण ह्या शहरातल्या नागरीकांना मिळेल.

ध्रुवकिशोर पाटील :-

मा. महापौर मॅडम सत्तेचा माज कसा असतो हे आम्ही तुमच्याकडून शिकलो.

अनिल सावंत :-

म्हणून अजुन तुमच्या लक्षात आहे.

ध्रुवकिशोर पाटील :-

महापौर मॅडम मागे पण ३१ नंबरचा प्रभाग ह्या लोकांनी रामनगरला टाकला होता.

अनिल सावंत :-

ह्या लोकांनी म्हणजे तुम्ही त्या वेळेला होता.

ध्रुवकिशोर पाटील :-

तुम्ही जे पेरल तस आम्ही उगवलेल आहे.

मा. महापौर :-

परवानगी शिवाय कोणी उभे राहू नये.

ध्रुवकिशोर पाटील :-

कोणी ठराव मांडायचा हे आम्ही ठरविणार. आणि आम्ही हा ठराव मांडलेला आहे. ते ठराव मांडत असतील तर मांडू द्या. नाहीतर आमचा ठराव पास करा अशी आमची विनंती आहे.

हरिश्चंद्र आमगावकर :-

मा. महापौर मॅडम १० नंबर प्रभाग मिरारोडला गोडदेव पासून मिरारोडला आमची ३ नंबर प्रभाग समिती होती ती आम्हाला ४ नंबरमध्ये टाकलेली आहे. आमचा जो १० नंबर प्रभाग आहे तो आम्हाला तलाव रोडच्या इकडे करुन घ्यायचे आहे. गोडदेव पासून मिरारोडला जाणार का? ध्रुवकिशोरजी सत्ता असल्यामुळे तुम्ही सांगणार तस का. सत्तेचा माज किती होता त्या वेळेला तुम्ही पण सत्तेवर होतात. तेव्हा तुम्ही ठरवले होते.

ध्रुवकिशोर पाटील :-

आमगावकर तुम्ही सुचना मांडा ना.

वर्षा भानुशाली :-

आमगावकर साहेब ४ नंबर तलाव रोडलाच आहे तुम्ही बघा.

मा. महापौर :-

सगळे मा. सभासद बसून जा.

प्रविण पाटील :-

महापौर मॅडम, आपल्या परवानगीने बोलतो प्रभाग समिती ही सर्वसामान्य नागरिकांची जस जुबेर इनामदारांनी सांगितले त्याचप्रमाणे ज्या नागरिकांच्या समस्या आहेत त्या सर्वसाधारण प्रभाग समितीमध्ये सोडविले जातात. त्याच्यामध्ये जाणुनबुजुन प्रभाग त्याच्यात टाकलेला आहे. तसाच आमचा १० नंबरचा प्रभाग हा भौगोलिक सिमा तोडून प्रभाग क्र. ४ मध्ये टाकलेला आहे. तुम्हाला विनंती आहे की तो पूर्वी ३ मध्ये होता. माझी आयुक्तांना विनंती आहे की ह्या प्रभाग रचनेची तुम्ही प्रत्यक्ष जागेवर जाऊन पाहणी करा नागरीकांना ज्या सुविधा मिळतात त्या कशा मिळतील. त्या बघा आणि नंतरच प्रभाग रचना घ्या. तोपर्यंत ह्या प्रभाग रचनेला आमचा आक्षेप राहील.

जयंतीलाल पाटील :-

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो आयुक्त साहेब तुमच्याकडे एक प्रश्न आहे हे जे प्रभाग समिती वॉर्ड केलेले आहेत ते कोणाच्या आदेशाने केलेले आहेत? सत्ताधाऱ्यांच्या हिशोबाने केलेले आहेत की आयुक्तांच्या हिशोबाने केलेले आहेत. नागरिकांच्या सुविधेसाठी केलेले आहेत की नाही. सत्ताधाऱ्यांनी असे

केलेल आहे. आता आमचा मोठा भाऊ भारतीय जनता पार्टीमध्ये आहे ते कुठल्या प्रकारे पारदर्शक करतात त्याच्यावर नजर आम्ही ठेवणार आहेतच. सर्व ठिकाणी यांची बोंबाबोंब आहे पारदर्शक करतो. पारदर्शक करतो कुठल्या प्रकारे पारदर्शक करतात हे लोक काय करतात. या लोकांचे वॉर्ड फोडलेले आहेत की शिवसेनेला कुठल्याही प्रकारचे कुठल्याही पक्षाला विरोधी पक्षाला, कुठलेही ऑफिस द्यायचे नाही आहे समिती द्यायचे नाही हे योग्य आहे का? आणि एवढच नाही आम्हाला वरुन कल्पना आलेली आहे. विरोधी पक्षनेता सुध्दा द्यायची इच्छा नाही यांची.

ध्रुवकिशोर पाटील :-

महापौर मॅडम ठराव झालेला आहे.

मा. महापौर :-

जुबेर इनामदार तुम्ही ठराव वाचा.

जयंतीलाल पाटील :-

आयुक्त महोदय तुम्ही या प्रश्नाचे उत्तर द्यावे. आयुक्त साहेब पत्रकार बंधु जनता सुध्दा तुमच्याकडे या प्रश्नाच्या उत्तराची वाट पाहत आहेत. याचा खुलासा करावा.

मा. महापौर :-

तुम्ही बसा ठराव वाचा.

जयंतीलाल पाटील :-

मा. महापौर मॅडम मी तुम्हाला प्रश्न केलेला नाही. मी आयुक्त साहेबांना केलेला आहे. आणि पत्रकार बंधुसुध्दा बघत आहेत की कुठल्या प्रकारे त्यांना प्रश्नाचे उत्तर हवे आहे.

तारा घरत :-

मा. महापौराच्या परवानगीने बोलते मा. आयुक्त साहेबांनी काही बोलायचे नाही अस ठरविलेले आहे का? १० नंबर प्रभाग हा ३ नंबर मध्येच गेला पाहिजे.

मा. महापौर :-

मा. सदस्य तुम्ही दोघ बसून जा आणि तुम्ही ठराव वाचा.

जयंतीलाल पाटील :-

साहेब मला उत्तर द्याव माझी एकच इच्छा आहे की तुम्ही उत्तर द्याव.

(सभागृहात गोंधळ)

निलम ढवण :-

मा. महापौर मॅडम हा गोषवारा प्रशासनातर्फे आलेला आहे. त्यामुळे आयुक्त साहेब त्याचे उत्तर देणे गरजेचे आहे आणि तुम्ही उत्तर दिल्याशिवाय आमचे समाधान होणार नाही.

(सभागृहात गोंधळ)

सुरेश खंडेलवाल :-

यह ठराव नही कर रहे है तो आप ठराव मंजुर करके अगला विषय लिजिए।

(सभागृहात गोंधळ)

सुरेश खंडेलवालः-

गोषवारा प्रशासनाने दिया है महासभामें विषय लाने की जरूरत नही है और महासभामे यह बदलाव हो रहा है आप अपना ठराव मांडीए...............

स्नेहा पांडे :-

हम सत्ताधारीयोसे जवाब नही मांग रहे है हम महापौर से जवाब नही मांग रहे है हम प्रशासनसे जबाब मांग रहे है ।

(सभागृहात गोंधळ)

मा. उपमहापौर :-

सर्व सदस्यांना विनंती करण्यात येत आहे की आपण आपल्या जागेवर बसून घ्याव ह्या सभागृहामध्ये आपण जे प्रश्न विचारलेले आहेत त्या प्रश्नांची उत्तरे आपल्याला मिळतील.

(सभागृहात गोंधळ)

निलम ढवण :-

मा. आयुक्त साहेब प्रशासनाचा विषय असल्यामुळे आयुक्त साहेब बोलतील त्यांना पण बोलू द्या.

मा. उपमहापौर :-

सर्वानी बसून घ्या हा सभागृहाचा अधिकार आहे.

निलम ढवण :-

सभागृहाचा अधिकार राहील तर काहीही कराल का?

जुबेर इनामदार :-

सभागृह चालवायचा अधिकार महापौरांचा आहे.

मा. महापौरः-

आप बैठ जाइए आप ठराव पढीए।

(सभागृहात गोंधळ)

निलम ढवणः-

मा. आयुक्त साहेब खुलासा देतील त्यानंतरच पुढचा ठराव वाचला जाईल. तो पर्यत आम्ही ठराव वाचू देणार नाही.

जुबेर इनामदार :-

सभागृहात शांतता झाल्याशिवाय ठराव वाचता येत नाही.

(सभागृहात गोंधळ)

मा. आयुक्त :-

मा. महापौराच्या सुचनेनुसार मी आयुक्त या नात्याने खुलासा करतो खुलासा असा की सर्वसाधारणपणे वॉर्ड रचना तयार केलेली आहे साधारणतः आपल्याला रोड जे त्याठिकाणी डिमार्केशन आहेत किंवा नॅशनल बॉन्ड्रीज आहेत तशी आपण वॉर्ड रचना तयार केलेली होती. सेम प्रिन्सिपल याठिकाणी वापरलेली आहे आणि त्याच्यात आणखी एक लोकसंख्या आणि क्षेत्रफळ, लोकसंख्या आणि क्षेत्रफळाच्या समन्वय करण्यासाठी ह्याठिकाणी प्रयत्न केलेला आहे. आणि हे करत असताना आता आपले सध्याचे जे वॉर्ड आहेत प्रभाग ऑफिसेस आहेत त्या ऑफिसेसला संलग्न सुध्दा त्याठिकाणी कस होईल हे याठिकाणी करण्याच्या प्रयत्न केलेला आहे. हे आपल्यासमोर मांडलेले आहे. हा आयुक्त या नात्याने किंवा प्रशासनाने दिलेला हा प्रस्ताव आहे.

स्नेहा पांडे :-

मा. आयुक्त साहेब तालाब रोड नजदीक पडेगा की मिरा रोड? कौनसी आपने सुविधा दे के किया है।

(सभागृहात गोंधळ)

मा. महापौर :-

जुबेर जी आप अपना ठराव पढीए।

स्नेहा पांडेः-

प्रभाग नंबर १० कहा आता है ४ नंबर में कैसे डाल रहे हो रोड क्रॉस बिच में कितना बडा रोड है।

मा. महापौर :-

आप अपना ठराव पढीए नही तो हम हमारा ठराव मंजुर कर देते है।

(सभागृहात गोंधळ)

जुबेर इनामदारः-

मा. आयुक्त महोदय योगायोगाने माझ्या या दप्तरीमध्ये तो परिपत्रक मला सापडला हांगे साहेबांनी स्वाक्षरी १/०९/२०१५ त्याच्यामधुन ओळ वाचून दाखवितो. महासभा स्थायी समिती यांच्यासमोर मंजुरीसाठी आयुक्तांनी पाठविलेला गोषवारानुसार जसाचा तसा ठराव न होता तसा ठराव स्थायी सुचना उपसुचना असल्यास असा ठरावाची अंमलबजावणी करावी किंवा तसेच आयुक्तांना विचारल्याशिवाय करू नका असे विभाग प्रमुखांना त्यांनी हा परिपत्रक पाठविण्याचा ते परिपत्रक तुम्ही रद्द केलेला नाही आयुक्त बदलले याचा अर्थ परिपत्रक किंवा आदेश बदलत नाही या परिपत्रकाच्या आधारावर हांगे साहेबांनी बरेच ठराव विखंडीत करून घेतले शासनाकडून......................

मा. महापौर :-

आप अपना ठराव पढीए।

जुबेर इनामदार :-

मा. आयुक्तांनी स्पष्ट केले त्यांनी गोषवारा पाठविलेला आहे तो योग्य आहे आणि ह्यांनी जे केल त्याच्यामध्ये त्यांची भुमिका स्पष्ट आहे. तो मी नव्हे. मिरा भाईंदर महानगरपालिका अधिनियमाचे कलम २९(३) मधील तरतुदीनुसार महापालिकेच्या हद्दीत प्रशासकीय अधिकारांचे विकेंद्रीकरण व्हावे व लोकप्रतिनिधीत्व करणारे पदाधिकारी व नगरसेवक यांच्या लोकाभिमुख ध्येय धोरणानुसार प्रभागांचा विकास व्हावा म्हणून महानगरपालिकेने उपरोक्त कायदेशीर तरतुदीनुसार प्रभाग समित्या स्थापन करणे आवश्यक आहे.

कलम २९(अ) अन्वये प्रभाग समित्याची रचना करणेविषयी असलेल्या तरतुदीनुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेची सन २०११ च्या जनगणनेनुसार लोकसंख्या ८,०९,३७८ इतकी असल्याने महानगरपालिका कार्यक्षेत्रात एकूण सहा प्रभाग समित्या स्थापन करणे आवश्यक आहे. सदर प्रभाग समिती रचना प्रस्तावित करताना प्रामुख्याने भौगोलिक रचना, नैसर्गिक हद्दी, मुख्य रस्ते ह्यांचा विचार करुन करण्यात आल्या आहेत. मिरा भाईंदर शहराचे पश्चिम रेल्वे उपनगरीय सेवेमुळे दोन भागात विभाजन झालेले आहे. भाईंदर (प.) भागात दोन प्रभाग समित्या व भाईंदर (पू.) व मिरारोड भागातील भौगोलिक क्षेत्र व नैसर्गिक हद्द यांचा विचार करुन चार प्रभाग समित्याची रचना प्रस्तावित करण्यात आलेली आहे. निवडणूक प्रभागाची हद्द आणि

क्षेत्र संलग्नता विचारात घेऊन खालील प्रमाणे प्रभाग समित्या स्थापन करणेच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र. | प्रभाग समिती क्रमांक | प्रभाग समिती क्षेत्रात समाविष्ट निवडणूक प्रभाग | एकूण प्रभाग |
|---|---|---|---|
| १ | भाईंदर (प.) १ | ८, २३ व २४ | ०३ |
| २ | भाईंदर (प.) २ | १,६ व ७ | ०३ |
| ३ | भाईंदर (पू.) ३ | २,३,४,५ व ११ | ०५ |
| ४ | भाईंदर (पू.) ४ | १०,१२,१३ व १८ | ०४ |
| ५ | मिरारोड (पू.) ५ | ९,१९,२०,२१ व २२ | ०५ |
| ६ | हायवे परिसर व मिरारोड (पू) ६ | १४,१५,१६ व १७ | ०४ |
| एकूण | ६ | २४ | २४ |

सबब वर नमूद केलेल्या प्रभाग समित्यांच्या भौगोलिक रचनेस मान्यता देण्यात यावी असा मी ठराव मांडत आहे.

हरिश्चंद्र आमगावकर :-

माझे अनुमोदन आहे.

मा. महापौर :-

सचिव साहेब दोन ठराव आलेले आहेत मतदान घ्या.

नगरसचिव :-

प्रकरण क्र. ६ करीता दोन ठराव आलेले आहेत पहिला ठराव सुचक ध्रुवकिशोर पाटील अनुमोदन अनिल विराणी. दुसरा ठराव सुचक जुबेर इनामदार अनुमोदन हरिश्चंद्र आमगावकर प्रथम मी दुसरा ठराव मतदानास टाकतो. सुचक जुबेर इनामदार यांच्या ठरावाच्या बाजूने असतील त्यांनी हात वर करायचे आहेत, जुबेर इनामदार ह्यांच्या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत, तटस्थ कोणी असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. सुचक ध्रुवकिशोर पाटील ह्यांच्या ठरावाच्या बाजूने असतील त्यांनी हात वर करायचे आहेत, ह्या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत, तटस्थ कोणी असतील त्यांनी हात वर करायचे आहेत.

मर्लिन डिसा :-

मा. महापौर मॅडम तुमच्या परवानगीने बोलते, मॅडम ठराव मंजूर करण्याच्या अगोदर सर मी पण तुम्हाला सांगते की जेव्हा प्रॉपर्टी टॅक्स भरण्याची वेळ येते हाऊस टॅक्सची वेळ येते सिनियर सिटीजन्स येतात लाईनमध्ये उन्हात उभे राहतात व्हेअर इन कन्व्हेनियन फॉर ऑल धिज सिटीझन सर एकदा परत तुम्ही विचार करून घ्या कधीतरी तुम्ही हे चेंजेस करा. जे एरियामध्ये जागा मिळाली की बसतात कमिटी तिथे स्थापन करा.

मा. महापौर :-

मतदान प्रक्रिया झालेली आहे. सुचक ध्रुवकिशोर पाटील ह्यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने ६० विरोधात ३४ तटस्थ ० इतकी मते पडलेली आहेत. श्री.ध्रुवकिशोर पाटील ह्यांनी मांडलेला ठराव बहूमताने मंजूर करण्यात येत आहे.

जुबेर इनामदार :-

मा. महापौर मॅडम आपल्या दालनामध्ये आज सकाळी एक पत्र महत्वाच्या विषयावर..................

मा. महापौर :-

तुम्ही बसून जा पुढचा विषय घ्या.

जुबेर इनामदार :-

मा. महापौर मॅडम मला फक्त याचे उत्तर पाहिजे हा अधिकार आहे माझा हा हरकतीचा मुद्दा आहे एका शास्त्राप्रमाणे हा हरकतीचा मुद्दा मांडतो. हा विषय तुम्हाला तुमच्या दालनामध्ये एक पत्र दिलेले आहे त्या पत्राच्या अनुषंगाने ह्या सभागृहामध्ये चर्चा व्हावी ही माझी विनंती आहे. आपल्याला चर्चा करा ज्वलंत विषय आहे. ह्या शहरामध्ये चालुस्तोवर चर्चा झाली पाहिजे. लोकदालनात निगडीत आहे. त्या विषयावर चर्चा झाली पाहिजे. मला वाटते सेनेच्याही गटनेत्यांनी तुम्हाला ते पत्र दिलेले आहे. आयुक्ताकडे पण आम्ही पत्र पाठविलेले आहे ते पत्र सचिवांना पण दिलेले आहे. त्याच्यावर चर्चा व्हावी ती संधी तुम्ही आम्हाला द्या अशी अपेक्षा तुमच्याकडून करतो.

मा. महापौर :-

नंतर शेवटला टाईम देऊ.

प्रकरण क्र. ०६ :-

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम २९ (अ) अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या हद्दीत सहा प्रभाग समित्यांची रचना करणेबाबत. (भौगोलिक रचनेस मान्यता देणे.)

ठराव क्र. ०४ :-

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २९(अ) मधील तरतुदीनुसार महापालिकेच्या हद्दीत प्रशासकीय अधिकारांचे विकेंद्रीकरण व्हावे व लोकप्रतिनिधीत्व करणारे पदाधिकारी व नगरसेवक यांच्या लोकाभिमुख ध्येय धोरणानुसार प्रभागांचा विकास व्हावा म्हणून महानगरपालिकेने उपरोक्त कायदेशीर तरतुदीनुसार प्रभाग समित्या स्थापन करणे आवश्यक आहे.

कलम २९(अ) अन्वये प्रभाग समित्याची रचना करणेविषयी असलेल्या तरतुदीनुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेची सन २०११ च्या जनगणनेनुसार लोकसंख्या ८.१४ लाख असल्याने महानगरपालिका कार्यक्षेत्रात एकूण सहा प्रभाग समित्या स्थापन करणे आवश्यक आहे. सदर प्रभाग समिती रचना प्रस्तावित करताना प्रामुख्याने भौगोलिक रचना, नैसर्गिक हद्दी, मुख्य रस्ते ह्यांचा विचार करुन करण्यात आल्या आहेत. मिरा भाईंदर शहराचे पश्चिम रेल्वे उपनगरीय सेवेमुळे दोन भागात विभाजन झालेले आहे. भाईंदर (प.) भागात दोन प्रभाग समित्या व भाईंदर (पू.) व मिरारोड भागातील भौगोलिक क्षेत्र व नैसर्गिक हद्द यांचा विचार करुन चार प्रभाग समित्याची रचना प्रस्तावित करण्यात आलेली आहे. निवडणूक प्रभागाची हद्द आणि क्षेत्र संलग्नता विचारात घेऊन खालील प्रमाणे प्रभाग समित्या स्थापन करणेच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र. | प्रभाग समिती क्रमांक | प्रभाग समिती क्षेत्रात समाविष्ट निवडणूक प्रभाग | एकूण प्रभाग |
|---|---|---|---|
| १ | भाईंदर (प.) १ | ८, २३, २४ | ३ |
| २ | भाईंदर (प.) २ | १,६,७ | ३ |
| ३ | भाईंदर (पू.) ३ | २,३,४,५,११ | ५ |
| ४ | भाईंदर (पू.) ४ | ९,१०,१२,१३,१८ | ५ |
| ५ | मिरारोड (पू.) ५ | २०,२१,२२ | ३ |
| ६ | मिरारोड (पू.) ६ | १४,१५,१६,१७,१९ | ५ |
| एकूण | ६ | | २४ |

वरील प्रमाणे प्रभाग समित्यांच्या भौगोलिक रचनेस ही मा. महासभा मान्यता देत आहे.

सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील अनुमोदक :- श्री. अनिल विराणी

| अ.क्र. | ठरावाच्या बाजुने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | भोईर सुनिता शशिकांत | १ | ढवण निलम हरीश्चंद्र | |
| २ | शाह रिटा सुभाष | २ | कदम अर्चना अरुण | |
| ३ | तिवारी अशोक सूर्यदेव | ३ | नलावडे दिनेश दगडु | |
| ४ | पांडेय पंकज सूर्यमणि | ४ | गुप्ता कुसुम संतोष | |
| ५ | पाटील रोहिदास शंकर | ५ | पाटील धनेश परशुराम | |
| ६ | गोहिल शानू जोरावर सिंह | ६ | परेरा कॅटलीन एन्थोनी | |
| ७ | कांगणे मीना यशवंत | ७ | परदेशी गिता हरीश | |
| ८ | सिंह मदन उदितनारायण | ८ | पाटील नरेश तुकाराम | |
| ९ | शेट्टी गणेश गोपाळ | ९ | सय्यद नुरजाहॉ नाझर हुसेन | |
| १० | भोईर गणेश गजानन | १० | शेख अमजद गफार | |
| ११ | पाटील प्रभात प्रकाश | ११ | पाटील जयंतीलाल गुरूनाथ | |
| १२ | पाटील वंदना मंगेश | १२ | घरत तारा विनायक | |
| १३ | रावल मेघना दिपक | १३ | पांडे स्नेहा शैलेश | |
| १४ | शाह राकेश रतिशचंद्र | १४ | आमगावकर हरिश्चंद्र रामचंद्र | |
| १५ | सिंग श्रीप्रकाश जिलेदार | १५ | शिर्के अनंत गेणू | |
| १६ | पाटील धृवकिशोर मन्साराम | १६ | पाटील वंदना विकास | |
| १७ | जैन गीता भरत | १७ | पाटील संध्या प्रफुल्ल | |
| १८ | जैन सुनिता रमेश | १८ | पाटील प्रविण मोरेश्वर | |
| १९ | जैन राजेंद्र भवरलाल | १९ | भोईर कमलेश यशवंत | |
| २० | रॉड्रीक्स मोरस जोसेफ | २० | पाटील अनिता जयवंत | |
| २१ | भूप्ताणी रक्षा सतीश (शाह) | २१ | भोईर भावना राजू | |
| २२ | मोकाशी दिपाली आनंदराव | २२ | भोईर राजू यशवंत | |
| २३ | व्यास रवि वासुदेव | २३ | शेख रुबीना फिरोझ | |
| २४ | रकवी वैशाली गजेंद्र | २४ | डिसा मर्लिन मर्विन | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २५ | अग्रवाल सुशील गोपीकिशन | २५ | सावंत अनिल दिवाकर | |
| २६ | खंडेलवाल सुरेश जगदीश | २६ | मेहरा राजीव ओमप्रकाश | |
| २७ | डॉ. पाटील प्रिती जयप्रकाश | २७ | भट दीप्ती शेखर | |
| २८ | मेहता डिंपल विनोद | २८ | सपार उमा विश्वनाथ | |
| २९ | शेट्टी अरविंद आनंद | २९ | अहमद साराह अकरम | |
| ३० | गेहलोत हसमुख मोहनलाल | ३० | इनामदार जुबेर अब्दुल्ला | |
| ३१ | शिंदे रुपाली वसंत (मोदी) | ३१ | शेख अशरफ मोहम्मद इब्राहीम | |
| ३२ | थेराडे संजय अनंत | ३२ | गोविंद हेलन जॉर्जी | |
| ३३ | मुखर्जी अनिता बबलू | ३३ | बगाजी शर्मिला विन्सन्ट | |
| ३४ | वैती चंद्रकांत सिताराम | ३४ | बांड्या एलायस दुमिंग | |
| ३५ | हसनाळे ज्योत्सना जालींदर | | | |
| ३६ | पारधी सुजाता यशवंत | | | |
| ३७ | म्हात्रे सचिन केसरीनाथ | | | |
| ३८ | यादव मिरादेवी रामलाल | | | |
| ३९ | म्हात्रे मोहन गोपाळ | | | |
| ४० | सोनार सुरेखा प्रकाश | | | |
| ४१ | भोईर विणा सुर्यकांत | | | |
| ४२ | म्हात्रे परशुराम पदमाकर | | | |
| ४३ | मांजरेकर आनंद दत्ताराम | | | |
| ४४ | अरोरा दीपिका पंकज | | | |
| ४५ | बेलानी हेमा राजेश | | | |
| ४६ | दळवी प्रशांत ज्ञानदेव | | | |
| ४७ | गजरे दौलत तुकाराम | | | |
| ४८ | नाईक विविता विवेक | | | |
| ४९ | सोंस नीला बर्नाड | | | |
| ५० | राय विजयकुमार सिस्थन नारायण | | | |
| ५१ | परमार हेतल रतिलाल | | | |
| ५२ | कासोदारिया अश्विन शामजीभाई | | | |
| ५३ | जैन दिनेश तेजराज | | | |
| ५४ | भावसार वंदना संजय | | | |
| ५५ | शाह सीमाबेन कमलेश | | | |
| ५६ | दुबे मनोज रामनारायण | | | |
| ५७ | विराणी अनिल रावजीभाई | | | |
| ५८ | भोईर जयेश भानुदास | | | |
| ५९ | म्हात्रे नयना गजानन | | | |
| ६० | भानुशाली वर्षा गिरधर | | | |
| ६१ | म्हात्रे विनोद काशिनाथ | | | |

**ठराव बहुमताने मंजूर**

**सही /-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र. नगरसचिव :-**

**प्रकरण क्र. ७,** महानगरपालिका कर्मचाऱ्यांना दिवाळी सणा निमित्त सानुग्रह अनुदान देणेबाबत.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेतील आस्थापनेवरील स्थायी व अस्थायी अधिकारी/कर्मचारी यांना दरवर्षी दिवाळी सण कालावधीत सानुग्रह अनुदान देण्यात येते यावर्षी ही रयतराज कामगार संघटना, श्रमिक जनरल कामगार संघटना व महाराष्ट्र नवनिर्माण महापालिका कामगार कर्मचारी सेना यांसकडुन सानुग्रह अनुदानाची मागणी करण्यात आलेली आहे.

दि. ३१/१०/२००२ रोजी मा. मुख्यमंत्री यांचेकडे महानगरपालिका कामगार संघटना व सर्व महानगरपालिका आयुक्त यांचे समवेत झालेल्या बैठकीमध्ये, महानगरपालिकेने आर्थिक परिस्थितीचा विचार करुन, सानुग्रह अनुदान किती द्यावे या बाबतचा निर्णय महानगरपालिका स्तरावर घेण्यात यावा. अशा प्रकारचा निर्णय झाला होता. त्यानुसार नगरविकास विभागाचे पत्र क्र. जीईएन-१०९७/प्र.क्र.-२६७/ नवि-२४, दि.२७/११/२००२ रोजीच्या पत्रान्वये सर्व महानगरपालिकांना कळविण्यात आलेले आहे. आणि त्यानुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेतील अधिकारी/कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदान देणे बाबत मा. महासभेमार्फत योग्य निर्णय घेतला जातो.

सन-२०१६ मध्ये महानगरपालिका मा. महासभा दि. २१/१०/२०१६, ठराव क्र. ८९ अन्वये मंजूर करुन अदा करण्यात आलेल्या सानुग्रह अनुदान तपशील खालील प्रमाणे आहे :-

*महानगरपालिका आस्थापनेवरील कार्यरत अधिकारी/कर्मचारी करीता*

| अ.क्र. | कर्मचाऱ्यांचा तपशिल | कार्यरत अधिकारी/ कर्मचारी | सन २०१६-१७ या वर्षाकरीता मंजुर सानुग्रह अनुदानाची प्रत्येकी रक्कम रुपये | सानुग्रह अनुदानापोटी एकुण खर्चास मंजुरी दिलेली रक्कम |
|---|---|---|---|---|
| १. | महापालिका आस्थापनेवरील वर्ग-०२ ते वर्ग-०४ संवर्गातील कर्मचारी वर्ग | १५३१ | १६,०००/- | २,३५,५५,९९९/- |
| २. | संगणक चालक/लघुलेखक | ७१ | १४,०००/- | ९,६३,६६६/- |
| ३. | बालवाडी शिक्षिका (ठोक मानधनावरील कर्मचारी) | ०५ | ८,०००/- | ४०,०००/- |
| ४. | कुष्ठरोग तंत्रज्ञ, आय.सी.टी.सी. व आय.एन.टी.सी.टी. कर्मचारी, मलेरीया पर्यवेक्षक आर.व्ही.एस.के. पथक, राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान (ठोक मानधनावरील कर्मचारी) | ३५ | ७,५००/- | २,१२,८७५/- |
| ५. | लिंक वर्कर (ठोक मानधनावरील कर्मचारी) | १२७ | ८,०००/- | ८,४४,६५९ |
| ६. | सुवर्ण जयंती योजना विभागातील कर्मचारी (ठोक मानधनावरील कर्मचारी) | ०३ | ८,०००/- | २४,०००/- |
| ७. | स्व.इंदिरा गांधी रुग्णालयामधील कर्मचारी (ठोक मानधनावरील कर्मचारी) | १३ | ११,५००/- | १,४०,८७४/- |
| ८. | स्थानिक संस्था कर विभागातील ठोक मानधनावरील कार्यरत असलेले ऑडीट लिपीक | ०५ | ७,०००/- | ३५,०००/- |
| ९. | बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी (ठोक मानधनावरील कर्मचारी) | ३० | ७,५००/- | २,२०,३२५/- |
| १०. | कनिष्ठ अभियंता (ठोक मानधनावरील कर्मचारी) | ०७ | १२,०००/- | ८४,०००/- |
| ११. | सर्व शिक्षा अभियान अंतर्गत कार्यरत कर्मचारी | ०६ | ५,०००/- | ३०,०००/- |
| | एकुण | | | २,६१,५१,३९८/- |

*शिक्षण विभागातील कार्यरत शिक्षक वर्गाकरीता*

| अ.क्र. | कर्मचाऱ्यांचा तपशिल | शिक्षक वर्गाची संख्या | सन २०१६-१७ या वर्षाकरीता मंजुर सानुग्रह अनुदानाची प्रत्येकी रक्कम रुपये | सानुग्रह अनुदानापोटी एकुण खर्चास मंजुरी दिलेली रक्कम |
|---|---|---|---|---|
| १. | मिरा भाईंदर प्राथमिक शाळा शिक्षक वर्ग व सर्व शिक्षा अभियान अंतर्गत कार्यरत कर्मचारी | १९० | १६,०००/- | ३०,४०,०००/- |
| २. | सर्व शिक्षा अभियान अंतर्गत कार्यरत कर्मचारी | १६ | १४,०००/- | २,२४,०००/- |

| | | |
|---|---|---|
| एकुण | | ३२,६४,०००/- |

वरीलप्रमाणे महानगरपालिका आस्थापनेवरील अधिकारी/कर्मचारी यांना मागील वर्षी सानुग्रह अनुदान वाटपासाठी एकूण रु. २,६१,५१,३९८/- तसेच शिक्षण विभागातील कार्यरत शिक्षक वर्गाकरीता मागील वर्षी सानुग्रह अनुदान वाटपासाठी एकूण रु. ३२,६४,०००/- इतका खर्च मंजुर असुन त्याप्रमाणे सानुग्रह अनुदानाचे वाटप करण्यात आलेले आहे.

चालु वर्षासाठी कर्मचारी वर्ग व कामगार संघटनानी सानुग्रह अनुदानाची मागणी केलेली आहे.

महानगरपालिका आस्थापनेवरील दि. ३१/०३/२०१७ पर्यंत कार्यरत असलेले स्थायी व अस्थायी अधिकारी/कर्मचारी यांना मागील वर्षी मंजूर रक्कमेप्रमाणे सानुग्रह अनुदान द्यावयाचे झाल्यास, त्याचा अपेक्षित खर्च पुढील प्रमाणे आहे.

*महानगरपालिका आस्थापनेवरील कार्यरत अधिकारी /कर्मचारी करीता:-*

| अ.क्र. | कर्मचाऱ्यांचा तपशिल | कार्यरत अधिकारी/कर्मचारी | सन २०१६-१७ या वर्षाकरीता मंजुर सानुग्रह अनुदानाची प्रत्येकी रक्कम रुपये | सानुग्रह अनुदानापोटी एकुण खर्चास मंजुरी दिलेली रक्कम |
|---|---|---|---|---|
| १. | महापालिका आस्थापनेवरील वर्ग-०२ ते वर्ग-०४ संवर्गातील कर्मचारी वर्ग | १५०० | १६,०००/- | २,४०,००,०००/- |
| २. | संगणक चालक/लघुलेखक (ठोक मानधनावरील कर्मचारी) | ७१ | १४,०००/- | ९,९४,०००/- |
| ३. | बालवाडी शिक्षिका (ठोक मानधनावरील कर्मचारी) | ०५ | ८,०००/- | ४०,०००/- |
| ४. | कुष्ठरोग तंत्रज्ञ, आय.सी.टी.सी. कर्मचारी व आर.एन.टी.सी.पी. कर्मचारी, मलेरिया पर्यवेक्षक, आर.बी.एस.के. पथक, राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान (ठोक मानधनावरील कर्मचारी) | ७२ | ७,५००/- | ५,४०,०००/- |
| ५. | लिंक वर्कर (ठोक मानधनावरील कर्मचारी) | १२८ | ८,०००/- | १०,२४,०००/- |
| ६. | सर्व शिक्षा अभियान अंतर्गत कार्यरत कर्मचारी | ०६ | ५,०००/- | ३०,०००/- |
| ७. | स्व.इंदिरा गांधी रुग्णालयामधील कर्मचारी (ठोक मानधनावरील कर्मचारी) | १३ | ११,५००/- | १,४९,५००/- |
| ८. | भारतरत्न पंडीत भिमसेन जोशी रुग्णालय | २३ | ११,५००/- | २,६४,५००/- |
| ९. | स्थानिक संस्था कर विभागातील ठोक मानधनावरील कार्यरत असलेले ऑडीट लिपीक | ०५ | ७,०००/- | ३५,०००/- |
| १०. | बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी (ठोक मानधनावरील कर्मचारी) | ३० | ७,५००/- | २,२५,०००/- |
| ११. | कनिष्ठ अभियंता (ठोक मानधनावरील कर्मचारी) | ०७ | १२,०००/- | ८४,०००/- |
| १२. | राष्ट्रीय नागरी उपजिवीका अभियान | ०३ | ८,०००/- | २४,०००/- |
| एकुण | | १८६३ | | २,७४,१०,०००/- |

*शिक्षण विभागातील कार्यरत शिक्षक वर्गाकरीता*

| अ.क्र. | कर्मचाऱ्यांचा तपशिल | शिक्षक वर्गाची संख्या | सन २०१६-१७ या वर्षाकरीता मंजुर सानुग्रह अनुदानाची प्रत्येकी रक्कम रुपये | सानुग्रह अनुदानापोटी एकुण खर्चास मंजुरी दिलेली रक्कम |
|---|---|---|---|---|
| १. | मिरा भाईंदर प्राथमिक शाळा शिक्षक वर्ग | १८८ | १६,०००/- | ३०,०८,०००/- |
| २. | सर्व शिक्षा अभियान अंतर्गत कार्यरत | १८ | १४,०००/- | २,५२,०००/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | कर्मचारी | | | |
| एकुण | | २०६ | | ३२,६०,०००/- |

वरील प्रमाणे महानगरपालिकेतील आस्थापनेवरील कार्यरत अधिकारी/कर्मचाऱ्यांना गतवर्षीच्या मंजूर रक्कमानुसार सानुग्रह अनुदान देणेसाठी रुपये- २,७४,१०,०००/- (अक्षरी रुपये - दोन कोटी चौऱ्याहत्तर लाख दहा हजार मात्र) खर्च अपेक्षित आहे. आणि या वर्षीच्या मंजुर वार्षिक अंदाजपत्रकात रक्कम रु.३.०० कोटी तरतुद आहे.

तसेच शिक्षण मंडळाकडील कर्मचाऱ्यांसाठी रक्कम रु. ३२,६०,०००/- (अक्षरी रुपये- बत्तीस लाख साठ हजार मात्र) खर्च अपेक्षित आहे. आणि या वर्षीच्या मंजुर अंदाजपत्रकात रक्कम रु. ३५/- लाख इतकी तरतुद आहे.

सबब मागील वर्षी प्रमाणे मा. महासभेने मंजूर केलेल्या दराने सानुग्रह अनुदान यावर्षी सुध्दा देणेबाबत मंजूरी मिळणेसाठी, सदरचा विषय मा. महासभेच्या निर्णयास्तव सादर करणेत येत आहे.

ठराव :-

प्रशासनाने दिलेल्या गोषवाऱ्यातील तक्त्यामध्ये सुमारे १० ते १५ टक्के वाढ करुन किंवा सोबतच्या तक्त्यानुसार सानुग्रह अनुदान देण्यात यावे तसेच वर्ग-१ चे अधिकारी व पी.एम.वाय. चे कर्मचाऱ्यांना अनुदान देण्यात यावे. तसेच अंदाजपत्रकाच्या तरतुदीपेक्षा रक्कम जास्त होत असल्यास त्याचे पुर्नःविनीयोजनास हि सभा मंजुरी देत आहे असा मी ठराव मांडत आहे.

वर्षा भानुशाली :-

माझे अनुमोदन आहे.

प्रविण पाटील :-

मा. महापौराच्या परवानगीने बोलतो एक विषय असा आहे की प्रकरण क्र ७ मध्ये जो गोषवारा आहे त्याच्यामध्ये मिरा भाईदर कामगार सेनेचे पत्र आहे मागणीचे त्या गोषवारामध्ये कामगारसेनेचा पत्राचा उल्लेख नाही इतर संघटनेचा उल्लेख आहे. त्याच्यामध्ये पण मिरा भाईदर कामगार संघटनेचा उल्लेख नाही गोषवारामध्ये त्यांचे पत्र १२-०१-२०१७ चे पत्र आहे पहिल्या महिन्यातल.

मा. उपमहापौर :-

मा. महापौराच्या परवानगीने बोलतो माझ्याकडे मिरा भाईदर कामगार सेना, श्रमीक जनरल कामगार सेना, भारतीय जनता पार्टी आणि मिरा भाईदर महानगरपालिका प्राथमिक शिक्षक संघ अशा सर्व युनियनचे पत्र आले होते आणि मी त्या सर्व पत्राना माझ्या शिफारशी जोडून मा. महापौर मॅडमशी चर्चा केली होती. आणि प्रशासनाकडून जेव्हा गोषवारा येतो. त्यावेळेला त्याच्यामध्ये या युनियनची नावे समाविष्ठ नसतात परंतु प्रत्येक पत्राचा विचार करून हो सर्व मतांनी चांगला तोडगा काढलेला आहे.

प्रविण पाटील :-

माझा विषय तो नाही आहे गोषवारामध्ये इतर संघटनेचे नावे आहेत पण ह्या संघटनेचे नाव नाही तुम्ही बघा गोषवारा वाचून बघा.

मा. उपमहापौर :-

जर तसे असेल तर त्याच्यात नोंद करू कारण हे जे प्रकरण झाले त्या प्रकरणाला माझी पत्र जोडली होती. ते नाव त्याच्यामध्ये ॲड करून घेण्यात यावे.

निलम ढवण :-

मा. महापौर मॅडम त्याच्यात माझी एक सुचना आहे आपल्या सर्व कर्मचा-याना येथे दिवाळी बोनस संदर्भात याच्यात मेन्शन केलेले आहे परंतू ठेकेदारामार्फत देखील जे कामे करत आहेत संगणक चालक आहेत व इतर ही काही कर्मचारी म्हणून काम करत आहेत साफसफाई असू दे तर त्याचांही विचार करावा कारण तेही तेवढीच कामे करत आहेत आणि त्यांचे ही ह्या पालिकेसाठी आणि जनतेसाठी योगदान आहे. त्यामुहे दिवाळी बोनसमध्ये त्यांनाही प्रत्येकी ५-५ हजार दिवाळी बोनस देण्यात यावा अशी मी सुचना मांडत आहे.

अनिल सावंत :-

आमचा ठराव आहे सत्ता पक्षाने जो ठराव मांडला तो बरोबर नाही. १० ते १५ टक्के १० टक्के कोणाला आणि १५ टक्के कोणाला.

ध्रुवकिशोर पाटील :-

त्याच्यामध्ये लिहिलेले आहे.

अनिल सावंत :-

सर्व कर्मचाऱ्यांना समान न्याय मिळावा हा आमचा दृष्टीकोन आहे. त्या अनुषंगाने मी ठराव मांडतो.

मा. उपमहापौर :-

तो मोघम चार्ट नाही त्यांनी चार्ट दिला आणि त्याच्यामध्ये अमाऊन्ट.....................

अनिल सावंत :-

चार्ट सभागृहाला माहित नाही त्यांनी जो ठराव केला तो सभागृहाला माहित नाही १० ते १५ टक्के सांगितलेला आहे त्यानी..............

जुबेर इनामदार :-

आमचा ठराव झाला की सचिव साहेब दोन्ही ठराव वाचून दाखवा.

अनिल सावंत :-

पूर्ण वाचून दाखवा म्हणजे १५ टक्के कोणाला आहेत आणि १० टक्के कोणाला ते जरा कळू द्या.कर्मचा-यामध्ये भेदभाव करू नका.

ध्रुवकिशोर पाटील :-

गोषवाऱ्याचे वाचन केले.

अनिल सावंत :-

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील स्थावर व अस्थायी अधिकारी व कर्मचारी यांना दिवाळी सनानिमित्त सानुग्रह अनुदान देणेबाबत गोषवारा देण्यात आलेला आहे. सदर गोषवाऱ्यानुसार सानुग्रह अनुदान देण्यासाठी रुपये- २ करोड ७४ लाख १० हजार एवढा खर्च अपेक्षित आहे. गतवर्षीसुध्दा एवढेच अनुदान देण्यात आले होते. या वर्षीच्या मंजुर वार्षिक अंदाजपत्रकात ३ करोड रुपायांची तरतुद आहे.

तरी यावर्षीसाठी देण्यात येणाऱ्या अनुदानात १६ टक्के वाढ करुन सानुग्रह अनुदान महापालिकेतील आस्थापनेवरील कार्यरत अधिकारी / कर्मचाऱ्यांना देण्यात यावी. प्रत्येक अधिकारी व कर्मचारी यांना प्रस्तावित केलेल्या सानुग्रह अनुदानामधील १० टक्के वाढ करण्यात यावी.

तसेच शिक्षण मंडळाकडील कर्मचाऱ्यांसाठी रक्कम रु. ३२,६०,०००/- (रु. बत्तीस लाख साठ हजार मात्र) खर्च अपेक्षित आहे. यावर्षीच्या मंजूर अंदाजपत्रकात ३५ लाख एवढी तरतुद आहे. तरी रु. ३२,६०,०००/- मध्ये १६ टक्केची वाढ करुन रक्कम सानुग्रह अनुदानापोटी देण्यात यावी. प्रत्येक कर्मचाऱ्याला प्रस्तावित केलेल्या सानुग्रह अनुदानामध्ये १६ टक्केची वाढ करण्यात यावी असा मी ठराव मांडत आहे.

हरिश्चंद्र आमगावकर:-

माझे अनुमोदन आहे.

मा. महापौर :-

सचिव महोदय दोन ठराव झालेले आहेत मतदान करा.

प्र. नगरसचिव :-

प्रकरण क्र. ७ करिता दोन ठराव आलेले आहेत पहिला ठराव सुचक श्री. ध्रुवकिशोर पाटील अनुमोदक श्रीम. वर्षा भानुशाली दूसरा ठराव सुचक श्री. अनिल सावत अनुमोदक श्री. हरिश्चंद्र आमगावकर. प्रथम मी दुसरा ठराव सुचनेसह मतदानास टाकतो. सुचक श्री. अनिल सावंत ह्यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. ह्या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. सुचक श्री. ध्रुवकिशोर पाटील ह्यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने असतील त्यांनी हात वर करायचे आहेत, ह्या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत तटस्थ कोणी आहेत का?

निलम ढवण :-

मा. महापौर मॅडम मी जी सुचना मांडली होती.............

मा. महापौर :-

मतदानाची प्रक्रिया चालू आहे.

निलम ढवण :-

प्रक्रिया झाली तरी पण त्याही कर्मचा-याचा आपण विचार करावा अशी माझी विनंती आहे.

मा. महापौर :-

सुचक ध्रुवकिशोर पाटील ह्यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने ६१ विरोधात ३४ तटस्थ ० इतकी मते पडली आहेत. ध्रुवकिशोर पाटील ह्यांनी मांडलेला ठराव बहूमताने मंजूर करण्यात येत आहे.

प्रकरण क्र. ०७ :-

महानगरपालिका कर्मचाऱ्यांना दिवाळी सणा निमित्त सानुग्रह अनुदान देणेबाबत.

ठराव क्र. ०५ :-

मिरा भाईंदर महानगरपालिकेतील आस्थापनेवरील स्थायी व अस्थायी अधिकारी/कर्मचारी यांना दरवर्षी दिवाळी सण कालावधीत सानुग्रह अनुदान देण्यात येते यावर्षी ही रयतराज कामगार संघटना, श्रमिक जनरल कामगार संघटना व महाराष्ट्र नवनिर्माण महापालिका कामगार कर्मचारी सेना यांसकडुन सानुग्रह अनुदानाची मागणी करण्यात आलेली आहे.

दि. ३१/१०/२००२ रोजी मा. मुख्यमंत्री यांचेकडे महानगरपालिका कामगार संघटना व सर्व महानगरपालिका आयुक्त यांचे समवेत झालेल्या बैठकीमध्ये, महानगरपालिकेने आर्थिक परिस्थितीचा विचार करुन, सानुग्रह अनुदान किती द्यावे या बाबतचा निर्णय महानगरपालिका स्तरावर घेण्यात यावा. अशा प्रकारचा निर्णय झाला होता. त्यानुसार नगरविकास विभागाचे पत्र क्र. जीईएन-१०९७/प्र.क्र.-२६७/ नवि-२४, दि.२७/११/२००२ रोजीच्या पत्रान्वये सर्व महानगरपालिकांना कळविण्यात आलेले आहे. आणि त्यानुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेतील अधिकारी/कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदान देणे बाबत मा. महासभेमार्फत योग्य निर्णय घेतला जातो.

सन-२०१६ मध्ये महानगरपालिका मा. महासभा दि. २१/१०/२०१६, ठराव क्र. ८९ अन्वये मंजूर करुन अदा करण्यात आलेल्या सानुग्रह अनुदान तपशील खालील प्रमाणे आहे :-

*महानगरपालिका आस्थापनेवरील कार्यरत अधिकारी/कर्मचारी करीता*

| अ.क्र. | कर्मचाऱ्यांचा तपशिल | कार्यरत अधिकारी/ कर्मचारी | सन २०१६-१७ या वर्षाकरीता मंजुर सानुग्रह अनुदानाची प्रत्येकी रक्कम रुपये | सानुग्रह अनुदानापोटी एकुण खर्चास मंजुरी दिलेली रक्कम |
|---|---|---|---|---|
| १. | महापालिका आस्थापनेवरील वर्ग-०२ ते वर्ग-०४ संवर्गातील कर्मचारी वर्ग | १५३१ | १६,०००/- | २,३५,५५,९९९/- |
| २. | संगणक चालक/लघुलेखक | ७१ | १४,०००/- | ९,६३,६६६/- |
| ३. | बालवाडी शिक्षिका (ठोक मानधनावरील कर्मचारी) | ०५ | ८,०००/- | ४०,०००/- |
| ४. | कुष्ठरोग तंत्रज्ञ, आय.सी.टी.सी. व आय.एन.टी.सी.टी. कर्मचारी, मलेरीया पर्यवेक्षक आर.व्ही.एस.के. पथक, राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान (ठोक मानधनावरील कर्मचारी) | ३५ | ७,५००/- | २,१२,८७५/- |
| ५. | लिंक वर्कर (ठोक मानधनावरील कर्मचारी) | १२७ | ८,०००/- | ८,४४,६५९ |
| ६. | सुवर्ण जयंती योजना विभागातील कर्मचारी (ठोक मानधनावरील कर्मचारी) | ०३ | ८,०००/- | २४,०००/- |
| ७. | स्व.इंदिरा गांधी रुग्णालयामधील कर्मचारी (ठोक मानधनावरील कर्मचारी) | १३ | ११,५००/- | १,४०,८७४/- |
| ८. | स्थानिक संस्था कर विभागातील ठोक मानधनावरील कार्यरत असलेले ऑडीट लिपीक | ०५ | ७,०००/- | ३५,०००/- |
| ९. | बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी (ठोक मानधनावरील कर्मचारी) | ३० | ७,५००/- | २,२०,३२५/- |
| १०. | कनिष्ठ अभियंता (ठोक मानधनावरील कर्मचारी) | ०७ | १२,०००/- | ८४,०००/- |
| ११. | सर्व शिक्षा अभियान अंतर्गत कार्यरत कर्मचारी | ०६ | ५,०००/- | ३०,०००/- |
| एकुण | | | | २,६१,५१,३९८/- |

*शिक्षण विभागातील कार्यरत शिक्षक वर्गाकरीता*

| अ.क्र. | कर्मचाऱ्यांचा तपशिल | शिक्षक वर्गाची संख्या | सन २०१६-१७ या वर्षाकरीता मंजुर सानुग्रह अनुदानाची प्रत्येकी रक्कम रुपये | सानुग्रह अनुदानापोटी एकुण खर्चास मंजुरी दिलेली रक्कम |
|---|---|---|---|---|
| १. | मिरा भाईंदर प्राथमिक शाळा शिक्षक वर्ग व सर्व शिक्षा अभियान अंतर्गत कार्यरत कर्मचारी | १९० | १६,०००/- | ३०,४०,०००/- |
| २. | सर्व शिक्षा अभियान अंतर्गत कार्यरत कर्मचारी | १६ | १४,०००/- | २,२४,०००/- |
| एकुण | | | | ३२,६४,०००/- |

वरीलप्रमाणे महानगरपालिका आस्थापनेवरील अधिकारी/कर्मचारी यांना मागील वर्षी सानुग्रह अनुदान वाटपासाठी एकूण रु. २,६१,५१,३९८/- तसेच शिक्षण विभागातील कार्यरत शिक्षक वर्गाकरीता मागील वर्षी सानुग्रह अनुदान वाटपासाठी एकूण रु. ३२,६४,०००/- इतका खर्च मंजुर असुन त्याप्रमाणे सानुग्रह अनुदानाचे वाटप करण्यात आलेले आहे.

चालु वर्षासाठी कर्मचारी वर्ग व कामगार संघटनानी सानुग्रह अनुदानाची मागणी केलेली आहे.

महानगरपालिका आस्थापनेवरील दि. ३१/०३/२०१७ पर्यंत कार्यरत असलेले स्थायी व अस्थायी अधिकारी/कर्मचारी यांना मागील वर्षी मंजूर रक्कमेप्रमाणे सानुग्रह अनुदान द्यावयाचे झाल्यास, त्याचा अपेक्षित खर्च पुढील प्रमाणे आहे.

*महानगरपालिका आस्थापनेवरील कार्यरत अधिकारी /कर्मचारी करीता:-*

| अ.क्र. | कर्मचाऱ्यांचा तपशिल | कार्यरत अधिकारी/कर्मचारी | सन २०१६-१७ या वर्षाकरीता मंजुर सानुग्रह अनुदानाची प्रत्येकी रक्कम रुपये | सानुग्रह अनुदानापोटी एकुण खर्चास मंजुरी दिलेली रक्कम |
|---|---|---|---|---|
| १. | महापालिका आस्थापनेवरील वर्ग-०२ ते वर्ग-०४ संवर्गातील कर्मचारी वर्ग | १५०० | १६,०००/- | २,४०,००,०००/- |
| २. | संगणक चालक/लघुलेखक (ठोक मानधनावरील कर्मचारी) | ७१ | १४,०००/- | ९,९४,०००/- |
| ३. | बालवाडी शिक्षिका (ठोक मानधनावरील कर्मचारी) | ०५ | ८,०००/- | ४०,०००/- |
| ४. | कुष्ठरोग तंत्रज्ञ, आय.सी.टी.सी. कर्मचारी व आर.एन.टी.सी.पी. कर्मचारी, मलेरिया पर्यवेक्षक, आर.बी.एस.के. पथक, राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान (ठोक मानधनावरील कर्मचारी) | ७२ | ७,५००/- | ५,४०,०००/- |
| ५. | लिंक वर्कर (ठोक मानधनावरील कर्मचारी) | १२८ | ८,०००/- | १०,२४,०००/- |
| ६. | सर्व शिक्षा अभियान अंतर्गत कार्यरत कर्मचारी | ०६ | ५,०००/- | ३०,०००/- |
| ७. | स्व.इंदिरा गांधी रुग्णालयामधील कर्मचारी (ठोक मानधनावरील कर्मचारी) | १३ | ११,५००/- | १,४९,५००/- |
| ८. | भारतरत्न पंडीत भिमसेन जोशी रुग्णालय | २३ | ११,५००/- | २,६४,५००/- |
| ९. | स्थानिक संस्था कर विभागातील ठोक मानधनावरील कार्यरत असलेले ऑडीट लिपीक | ०५ | ७,०००/- | ३५,०००/- |
| १०. | बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी (ठोक मानधनावरील कर्मचारी) | ३० | ७,५००/- | २,२५,०००/- |
| ११. | कनिष्ठ अभियंता (ठोक मानधनावरील कर्मचारी) | ०७ | १२,०००/- | ८४,०००/- |
| १२. | राष्ट्रीय नागरी उपजिवीका अभियान | ०३ | ८,०००/- | २४,०००/- |
| | एकुण | १८६३ | | २,७४,१०,०००/- |

*शिक्षण विभागातील कार्यरत शिक्षक वर्गाकरीता*

| अ.क्र. | कर्मचाऱ्यांचा तपशिल | शिक्षक वर्गाची संख्या | सन २०१६-१७ या वर्षाकरीता मंजुर सानुग्रह अनुदानाची प्रत्येकी रक्कम रुपये | सानुग्रह अनुदानापोटी एकुण खर्चास मंजुरी दिलेली रक्कम |
|---|---|---|---|---|
| १. | मिरा भाईंदर प्राथमिक शाळा शिक्षक वर्ग | १८८ | १६,०००/- | ३०,०८,०००/- |
| २. | सर्व शिक्षा अभियान अंतर्गत कार्यरत कर्मचारी | १८ | १४,०००/- | २,५२,०००/- |
| | एकुण | २०६ | | ३२,६०,०००/- |

वरील प्रमाणे महानगरपालिकेतील आस्थापनेवरील कार्यरत अधिकारी/कर्मचाऱ्यांना गतवर्षीच्या मंजूर रक्कमानुसार सानुग्रह अनुदान देणेसाठी रुपये- २,७४,१०,०००/- (अक्षरी रुपये -

दोन कोटी चौऱ्याहत्तर लाख दहा हजार मात्र) खर्च अपेक्षित आहे. आणि या वर्षीच्या मंजुर वार्षिक अंदाजपत्रकात रक्कम रु.३.०० कोटी तरतुद आहे.

तसेच शिक्षण मंडळाकडील कर्मचाऱ्यांसाठी रक्कम रु. ३२,६०,०००/- (अक्षरी रुपये- बत्तीस लाख साठ हजार मात्र) खर्च अपेक्षित आहे. आणि या वर्षीच्या मंजुर अंदाजपत्रकात रक्कम रु. ३५/- लाख इतकी तरतुद आहे.

सबब मागील वर्षी प्रमाणे मा. महासभेने मंजूर केलेल्या दराने सानुग्रह अनुदान यावर्षी सुध्दा देणेबाबत मंजूरी मिळणेसाठी, सदरचा विषय मा. महासभेच्या निर्णयास्तव सादर करणेत येत आहे.

ठराव :-

प्रशासनाने दिलेल्या गोषवाऱ्यातील तक्त्यामध्ये सुमारे १० ते १५ टक्के वाढ करुन किंवा सोबतच्या तक्त्यानुसार सानुग्रह अनुदान देण्यात यावे तसेच वर्ग-१ चे अधिकारी व पी.एम.वाय. चे कर्मचाऱ्यांना अनुदान देण्यात यावे. तसेच अंदाजपत्रकाच्या तरतुदीपेक्षा रक्कम जास्त होत असल्यास त्याचे पुर्नःविनीयोजनास हि सभा मंजुरी देत आहे असा मी ठराव मांडत आहे.

**महानगरपालिका आस्थापनेवरील कार्यरत अधिकारी /कर्मचारी करीता**

| अ.क्र. | कर्मचाऱ्यांचा तपशिल | कार्यरत अधिकारी/कर्मचारी | सन २०१६-१७ या वर्षाकरीता मंजुर सानुग्रह अनुदानाची प्रत्येकी रक्कम रुपये | सानुग्रह अनुदानापोटी एकुण खर्चास मंजुरी दिलेली रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | महापालिका आस्थापनेवरील वर्ग-०१ ते वर्ग-०४ संवर्गातील कर्मचारी वर्ग | १५०० | २०००० | ३००००००० |
| २ | संगणक चालक/लघुलेखक<br>(ठोक मानधनावरील कर्मचारी) | ७१ | १५४०० | १०९३४०० |
| ३ | बालवाडी शिक्षिका<br>(ठोक मानधनावरील कर्मचारी) | ५ | ८८०० | ४४००० |
| ४ | कुष्ठरोग तंत्रज्ञ, आय.सी.टी.सी. कर्मचारी व आर.एन.टी.सी.पी. कर्मचारी, मलेरिया पर्यवेक्षक, आर.बी.एस.के. पथक, राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान (ठोक मानधनावरील कर्मचारी) | ७२ | ८२५० | ५९४००० |
| ५ | लिंक वर्कर (ठोक मानधनावरील कर्मचारी) | १२८ | ८८०० | ११२६४०० |
| ६ | सर्व शिक्षा अभियान अंतर्गत कार्यरत कर्मचारी | ६ | ५५०० | ३३००० |
| ७ | स्व.इंदिरा गांधी रुग्णालयामधील कर्मचारी (ठोक मानधनावरील कर्मचारी) | १३ | १२६५० | १६४४५० |
| ८ | भारतरत्न पंडीत भिमसेन जोशी रुग्णालय | २३ | १२६५० | २९०९५० |
| ९ | स्थानिक संस्था कर विभागातील ठोक मानधनावरील कार्यरत असलेले ऑडीट लिपीक | ५ | ७६०० | ३८५०० |
| १० | बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी (ठोक मानधनावरील कर्मचारी) | ३० | ८२५० | २४७५०० |
| ११ | कनिष्ठ अभियंता (ठोक मानधनावरील कर्मचारी) | ७ | १३२०० | ९३४०० |
| १२ | राष्ट्रीय नागरी उपजिवीका अभियान | ३ | ८८०० | २६४०० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १३ | मिरा भाईंदर प्राथमिक शाळा शिक्षक वर्ग | १८८ | १७६०० | ३३०८८०० |
| १४ | सर्व शिक्षा अभियान अंतर्गत कार्यरत कर्मचारी | १८ | १५४०० | २७७२०० |
| १५ | पी.एम.ए.वाय.योजनेतील कर्मचारी | | ८८०० | |
| **एकुण** | | **२०६९** | | **३७२१३०००/-** |

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील अनुमोदक :- श्रीम. वर्षा भानुशाली**

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | भोईर सुनिता शशिकांत | १ | ढवण निलम हरीशचंद्र | निरंक |
| २ | शाह रिटा सुभाष | २ | कदम अर्चना अरुण | |
| ३ | तिवारी अशोक सूर्यदेव | ३ | नलावडे दिनेश दगडु | |
| ४ | पांडेय पंकज सूर्यमणि | ४ | गुप्ता कुसुम संतोष | |
| ५ | पाटील रोहिदास शंकर | ५ | पाटील धनेश परशुराम | |
| ६ | गोहिल शानू जोरावर सिंह | ६ | परेरा कॅटलीन एन्थोनी | |
| ७ | कांगणे मीना यशवंत | ७ | परदेशी गिता हरीश | |
| ८ | सिंह मदन उदितनारायण | ८ | पाटील नरेश तुकाराम | |
| ९ | शेट्टी गणेश गोपाळ | ९ | सय्यद नुरजाहाँ नाझर हुसेन (मम्मी) | |
| १० | भोईर गणेश गजानन | १० | शेख अमजद गफार | |
| ११ | पाटील प्रभात प्रकाश | ११ | पाटील जयंतीलाल गुरूनाथ | |
| १२ | पाटील वंदना मंगेश | १२ | घरत तारा विनायक | |
| १३ | रावल मेघना दिपक | १३ | पांडे स्नेहा शैलेश | |
| १४ | शाह राकेश रतिशचंद्र | १४ | आमगावकर हरिश्चंद्र रामचंद्र | |
| १५ | सिंग श्रीप्रकाश जिलेदार (मुन्नासिंग) | १५ | शिर्के अनंत गेणू | |
| १६ | पाटील धृवकिशोर मन्साराम | १६ | पाटील वंदना विकास | |
| १७ | जैन गीता भरत | १७ | पाटील संध्या प्रफुल्ल | |
| १८ | जैन सुनिता रमेश | १८ | पाटील प्रविण मोरेश्वर | |
| १९ | जैन राजेंद्र भवरलाल | १९ | भोईर कमलेश यशवंत | |
| २० | रॉड्रीकस मोरस जोसेफ | २० | पाटील अनिता जयवंत | |
| २१ | भूप्ताणी रक्षा सतीश (शाह) | २१ | भोईर भावना राजू | |
| २२ | मोकाशी दिपाली आनंदराव | २२ | भोईर राजू यशवंत | |
| २३ | व्यास रवि वासुदेव | २३ | शेख रुबीना फिरोझ | |
| २४ | रकवी वैशाली गजेंद्र | २४ | डिसा मर्लिन मर्विन | |
| २५ | अग्रवाल सुशील गोपीकिशन | २५ | सावंत अनिल दिवाकर | |
| २६ | खंडेलवाल सुरेश जगदीश | २६ | मेहरा राजीव ओमप्रकाश | |
| २७ | डॉ. पाटील प्रिती जयप्रकाश | २७ | भट दीप्ती शेखर | |
| २८ | मेहता डिंपल विनोद | २८ | सपार उमा विश्वनाथ | |
| २९ | शेट्टी अरविंद आनंद | २९ | अहमद साराह अकरम | |
| ३० | गेहलोत हसमुख मोहनलाल | ३० | इनामदार जुबेर अब्दुल्ला | |
| ३१ | शिंदे रुपाली वसंत (मोदी) | ३१ | शेख अशरफ मोहम्मद इब्राहीम | |
| ३२ | थेराडे संजय अनंत | ३२ | गोविंद हेलन जॉर्जी | |
| ३३ | मुखर्जी अनिता बबलू | ३३ | बगाजी शर्मिला विन्सन्ट | |
| ३४ | वैती चंद्रकांत सिताराम | ३४ | बांड्या एलायस दुमिंग | |
| ३५ | हसनाळे ज्योत्सना जालींदर | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३६ | पारधी सुजाता यशवंत | | | |
| ३७ | म्हात्रे सचिन केसरीनाथ | | | |
| ३८ | यादव मिरादेवी   रामलाल | | | |
| ३९ | म्हात्रे मोहन गोपाळ | | | |
| ४० | सोनार सुरेखा प्रकाश | | | |
| ४१ | भोईर विणा सुर्यकांत | | | |
| ४२ | म्हात्रे परशुराम पदमाकर | | | |
| ४३ | मांजरेकर आनंद दत्ताराम | | | |
| ४४ | अरोरा दीपिका पंकज | | | |
| ४५ | बेलानी हेमा राजेश | | | |
| ४६ | दळवी प्रशांत ज्ञानदेव | | | |
| ४७ | गजरे दौलत तुकाराम | | | |
| ४८ | नाईक विविता विवेक | | | |
| ४९ | सोंस नीला बर्नाड | | | |
| ५० | राय विजयकुमार सिस्थन नारायण | | | |
| ५१ | परमार हेतल रतिलाल | | | |
| ५२ | कासोदारिया अश्विन शामजीभाई | | | |
| ५३ | जैन दिनेश तेजराज | | | |
| ५४ | भावसार वंदना संजय | | | |
| ५५ | शाह सीमाबेन कमलेश | | | |
| ५६ | दुबे मनोज रामनारायण | | | |
| ५७ | विराणी अनिल रावजीभाई | | | |
| ५८ | भोईर जयेश भानुदास | | | |
| ५९ | म्हात्रे नयना गजानन | | | |
| ६० | भानुशाली वर्षा गिरधर | | | |
| ६१ | म्हात्रे विनोद काशिनाथ | | | |

**ठराव बहुमताने मंजूर**

**सही /-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र. नगरसचिव :-**

**प्रकरण क्र. ८,** मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या पुर्व बाजुस असलेल्या संजय गांधी राष्ट्रीय उद्यान डोंगर पायथ्यावरुन वाहणाऱ्या पावसाळी पाण्याच्या निचऱ्यासाठी तज्ञ सल्लागार नेमणेबाबत.

**प्रभात पाटील :-**

मा. महापौर मॅडम एक चांगला विषय ह्या ठिकाणी आणला आहे जो आपल्याला प्रत्येक पावसाळ्यामध्ये त्रास देतो. याचे नियोजन झाले तर शहरामध्ये बरेचसे काही प्रभागामध्ये सुधारणा होऊ शकते. परंतू हो वर्षातला १२ महिण्यातला ४ महिने होणारा हा त्रास आहे पण तुम्हाला माहित आहे का नवघर गावात प्रत्येक अमावास्या पौर्णिमेला हा त्रास आहे प्रत्येक अमावस्या पौर्णिमेला नवघर सगळ बुडत असते आणि नवघर गावात जर ह्या भागाचा तुम्ही नियोजन करतात ४ महिण्यासाठी चांगली गोष्ट आहे लाईफ लाईन आपल्यासाठी उपयोगाचे आहे कारण तो नवघरच्या गावासाठी आणि त्याच्या पुढच्या वॉर्डात चढणाऱ्या पाण्यासाठी सुध्दा ह्या पध्दतीने आपण कराव असे तज्ञ आणि त्या पाण्याचा निचरा त्या लोकांची सुटका कशी करता येईल याचासुध्दा ह्या ठरावामध्ये समाविष्ठ करून ध्यावे त्या दिवशी मा. आमदार नवघरच्या नाक्यावर होते नवघरच्या गावातले बरेचसे लोक त्यांना भेटले ह्या संदर्भामध्ये तेव्हा माझी ह्या ठरावामध्ये सुचना टाका तुम्ही मेन्शन करा.....................

**स्नेहा पांडे :-**

मा. महापौर मॅडम मेरा एक प्रश्न है जब काका सभागृह नेता थे। तो उनके साथ कल्वर्ट के विषय लेके हम लोग कई बार गए थे यहा वहा काकाजीने साथ तो ओ कहा तक पोहचा और क्या पोहचा है और

सल्लागार हम नेमेंगे इसके लिए उसकी क्या कॉलिफिकेशन होनी चाहिए किस संस्था को दे रहे है क्या व्यक्तिगत दे रहे है कैसे क्या होगा इसका कही भी उल्लेख नही है तो हम नगरसेवको को मालूम तो होना चाहिए की किसको हम ला रहे है किसको नियुक्ती कर रहे है। इसकी जानकारी दिए बिना इस विषयमे इतना बडा विषय ला रहे है इसके पहले जब मै पहली बार नगरसेवक २००७ और १२ के बीच में बिल्डींग स्ट्रक्चरके लिए भी एक बार ऐसा ही कमिटीका गठन हूआ था तो किसी को भी बीना जानगारी दिए गठीत हो गया बादमे जब उसके मानधनकी बात आई उन लोगोने बडा मानधन का डिमांड किया उसके बाद महासभामे विषय आता है तो मै चाहती हूँ की इसबार कौनसी समितीको दे रहे है किसका गठण कर रहे है किसकी नियुक्ती कर रहे है उनको क्या मानधन रहेगा कैसे रहेगा किसी कंपनी को हम ठेके पर दे रहे है इन सब चिजोका खुलासा होने के बाद इसपर ठराव किया जाएगा।

प्रविण पाटील :-

मा. महापौर मॅडम आपल्या परवानगीने बोलतो प्रभात ताईने जो मुद्दा मांडला नवघर विभागामध्ये साधारणपणे काकाच्या एस एन कॉलेजचा नाला आणि चार्जर नाला हे समूद्राला दोन नाले मिळत आहेत तो चार्झर नाला त्याच्यापासून उलट प्रत्येक भरतीच्या वेळेला नवघर गावांत आणि गोडदेवच्या विभागामध्ये सगळ्या परिसरामध्ये भरपूर प्रमाणात पाणी येते. मा आयुक्तांनी या विभागाचा सर्व्हे केलेला होतो. त्याच्यानंतर आयुक्तांनी असे निवेदन दिले होते इरिगेशन डिपार्टमेन्टमार्फत जे दरवाजे बसविले जातात ते दरवाजे ते बसविणार होते आजपर्यत तसे कूठल्याही प्रकारची कारवाई झालेली नाही तुम्हाला विनंती आहे की हा जो विषय प्रभात ताईने मांडला त्याला अनुसरून जो तांत्रिक सल्लागार तुम्ही नेमत असाल तो सल्लागार तिथेही नेमून त्या विभागाचेही नियोजन करण्यात यावे अशी आपल्याला विनंती करतो.

दिनेश नलावडे :-

ह्याच विषयाला धरून मी ह्या ठिकाणी आपल्याला सुचित करतो, प्रभाग नं. ३ मध्ये सागर करण नाला खाडीला मिळतो तर त्याही ठिकाणी भरतीच्या वेळेस त्यावेळेला भरती येते त्या वेळेला सागर करण साईबाबानगर ह्या परिसरामध्ये संपूर्णपणे पाणी भरल जाते. आणि प्रत्येकाच्या घरामध्ये ते पाणी जात असते. तर ह्या बाबतीमध्ये देखील त्याठिकाणी तज्ञाना बरोबर घेऊन सागर करणचा नाल्याचे देखील आपण व्यवस्थित पणे पाण्याचा निचरा होईल अशा पध्दतीने त्याठिकाणी सुविधा करावी.

अनिल सावंत :-

मा. महापौर मॅडम विषय चांगला आणलेला आहे तज्ञ सल्लागार नेमत आहात नाला बांधण्यासाठी प्रशासनाने जो गोषवारा दिलेला आहे तो पूर्ण नाही वाचणार मी घोडबंदर हटकेश उद्योगनगर ह्या भागात मोठया प्रमाणावर गृहसंकूल लोकवस्ती झाल्याने सदर पावसाळी पाण्याचा निचरा नाल्यातून होणे गरजेचे आहे. हटकेश उद्योगनगर, घोडबंदर ह्याठिकाणी लोकवस्ती झाली मोठ मोठे संकुल आली आहेत. संकुलला परमीशन कोणी दिली संकूल बांधते वेळी त्याचा विचार का नाही केला गेला. ते नॅशनल पार्कवरून येणारे पाणी इथून जाणार आहे मग आज आपण जी तज्ञ समिती नेमत आहोत ती कोणत्यातरी एखाद्या बिझनेसच्या फायद्यासाठी नेमत आहोत का लोकांच्या पैशाच्या जीवावर याचा कूठे उल्लेख नाही आहे कशी झाली लोकवस्ती वाढली कशी परमीशन बिल्डींगला दिली कशी मोठमोठे टॉवर उभे राहत आहेत पाणी जाण्यासाठी निचरा होण्यासाठी काहीही नियोजन नाही आहे. यापूर्वी आयुक्त विक्रमकुमार ज्यावेळी होते त्यावेळी मुंबई महानगर पालिकेच्या अधिका-याशी चर्चा करून नॅशनल पार्कचा जो नाला आहे त्यामार्फत पाणी जावे असे नियोजन करण्यात आले होते आणि ही तज्ञ समिती जर नेमायची असेल तर शहरातील सर्व नाल्यांसाठी नेमा सर्वाना त्रास होतो.....................

सुरेश खण्डेलवालः-

मा. महापैार मॅडम मेरा निवेदन है की सभी सन्मा. सदस्योको ठराव मे क्या दिया है वो सुनतो लो ठराव बादमे आप बोलो यदी ठराव में कुछ आपको सुचना है तो सुचना दो।

सभागृहात गोंधळ

अनिल सावंत :-

खण्डेलवालजी आप ध्यान में रखो चर्चा होती है प्रशासनके गोषवारेके उपर ठरावके अंदर चर्चा नही होती है ठराव पास होता है यह जरा समझलो।

सुरेश खण्डेलवाल :-

आप जो सुझाव दे रहे हो वो सुझाव लिया पहला आप सुन लो एक बार हमारा तो पहिला विचार रखने दो। उसके बाद आप सुचना रखो।

मा. महापौर :-

काका तुम्ही ठराव वाचा. मी काकांना परवानगी दिलेली आहे. तुम्ही बसून जा.

जुबेर इनामदार :-

मला मान्य आहे ठराव वाचला पाहिजे मा. महापौर मॅडम प्रशासनाने जो गोषवारा दिलेला आहे............

मा. महापौर :-

मी काकांना परवानगी दिलेली आहे त्यानंतर तुम्ही बोला.

जुबेर इनामदार :

त्याच्यावर चर्चा होणार की नाही? प्रशासनाची नेमकी काय भुमिका आहे ती त्यांनी गोषवा-यामध्ये नमुद केलेली नाही आमचा प्रश्न प्रशासनाला आहे.

गीता जैन :-

जुबेर भाई मै यह बोलना चाहती हूॅ की आप अगर शांती से ठराव सुनले अगर आपकी जो मांग है जहा-जहा सल्लागार चाहिए वो सुनने के पहले आपको जो आरोप है की किसी बिल्डरके लिए यह किया गया उसका मुझे विरोध है यह पुरे मिरा भाईदर शहर के लिए किया गया है इस लिए आप यह आरोप मत लगाईए की किसी बिल्डर के लिए किया गया है। जब आप सुनेंगे तो उसके बाद बोलीए।

जुबेर इनामदार :-,

हम तो प्रशासनके गोषवारेके बारेमें बोल रहे है।

गीता जैन :-

मै इसलिए बोल रही हूॅ की प्रशासनने जो काम अधुरा किया है वो पूरा करने के लिए हम बैंठे है। प्रशासनने शायद अधुरा गोषवारा दिया होगा। तो उसमे जो कमी होगी उसे हमारे ठराव में पूरा करेंगे। आप पहले ठराव सुन लो।

रवी व्यास :-

जुबेर भाई शासन हमारा है इसलिऐ प्रशासन हम चलाते है आप ध्यान रखीएगा।

मा. महापौर :-

काका तुम्ही ठराव वाचा.

जुबेर इनामदार :-

ठराव झाल्यानंतर चर्चा करू दिली नाही तर तुम्ही राजीनामा देणार का?

गीता जैन :-

जुबेरजी आपको चर्चा करने दे या नही दे आप हमेशा उठ के बोलना चालू कर देते है।

जुबेर इनामदार :

जरूरी है आप गलतीया करेंगे हम सुधारने बैठे है।

रोहिदास पाटील :-

मा. महापौर मॅडम आता सर्वानी पाच मिनिटे ऐकून घ्या आजचा हा विषय आहे प्रकरण क्र. ८ सभागृहातल्या सर्व सन्मा. सदस्यांच्या तिव्र भावना आहेत त्यात दुमत असण्यासारखे असे कारण नाही एक पार्श्वभूमी लक्षात घ्या हा विषय आहे फक्त मिरा भाईदरसाठी किंवा मिरा भाईदरच्या एखाद्या संकूलासाठी किंवा मिरा भाईदरच्या एखाद्या कोपऱ्यातल्या ठिकाणातला हा विषय नाही तुम्ही सगळे सुशिक्षित आहात जगाच्या पाठीवर जे चाललेले वातावरणातला बदल आज जे काही तरी बोलले होते की देशात जपान म्हणा अमेरीका म्हणा, चायना म्हणा ज्याज्या ठिकाणी प्रगत देश म्हणतात तेही बुडायला लागले. सर्व देशांनी जे नियोजन केल ते पडणा-या पावसाचे केले पण अतिवृष्टीचे नाही केले आता नियतीचा खेळ असा झालेला आहे की समतोल बिघडलेला आहे. पावसाचे प्रमाण वाढलेले आहे आणि मिरा भाईदरची जर आता चर्चा करत असून ती मिरा भाईंदरची पार्श्वभूमी सर्व सभासदांना पत्रकारांना प्रेषक गृहातील लोकांना हे समजून घ्यायला लागेल दोन मिनिट त्याच्यावर नियोजन करावे लागेल. मिरा भाईदर हे शेती प्रधान गावं होत. काशीचा डोंगर मीराचा डोंगर पार्श्वभूमी नैसर्गिक पार्श्वभूमी आहे त्यावेळी ब्रिटीश काळ म्हणा किंवा लोकल बोर्डाच्या वतीने बनविलेला उघडया पाण्याचा निचरा होण्यासाठी बनविलेल्या उघाडया, पाण्याचा निचरा होण्यासाठी बनविलेल्या उघाड्या त्या एवढया क्षमतेच्या होत्या की अमूक वेळेला पाऊस पडला तर तो पडलेला पाऊस डोंगरातून इथपर्यंत पोहोचेपर्यंत नंतर पाऊस थांबायचा आणि उघाड्यातून पाणी निघून जायचे पण त्यानंतर शांतीनगर, आर एम पी पार्क ही जी मोठ मोठी संकूल उभी राहीली. जी पाणी भरण्याची जी एरिया होती ती पूर्ण संपली आता पूर्ण मिरा भाईदरच्या पूर्व एरियामध्ये कोणतीही अशी मोकळी जागा नाही की जिथे पाण्याचा साठवण होईल डोंगरातून आलेले पाणी हे कूठे थांबणारही नाही ज्या वेगाने ते पाणी येते त्याच वेगाने ते जिथे मिळेल त्या सम पातळीत पसरण्याचा प्रयत्न करते. आणि त्यावेळी मग तळमजल्यावरचे दुकाने घर फॅक्टरी जे काही असेल त्याच्यामध्ये एक फूट, दोन फूट, तीन फूट, चार फूट पाणी भरायला सूरूवात झालेली आहे. त्यामूळे हा विषय आपण आग्रहाने आणण्याचा प्रयत्न केला. महापौराना विनंती केली की हा विषय तातडीने घ्यायला पाहिजे. आणि सभागृहात एकमत होणे गरजेचे आहे. जसा विषय जी परिस्थीती आहे की ज्याप्रमाणे पाऊस होतो त्याप्रमाणात पावसाचा निचरा होण्यासाठी आपल्याकडे उघाड्या नाही आहेत त्या उघाड्या किती वाढवायच्या ह्या कामाची आवश्यकता असल्यामुळे सकाळी उठून ७.०० वाजता महापौराच्या व उपमहापौराच्या घरी गेलो तेव्हा ते जागेच होते मी उघाडी बघायला गेलो त्यांनी आपल्या उघाडीच्या वरच्या बाजूला ७ फूट पाणी उंच खाडी १५ फूट खाली जर त्या उघाडीची क्षमता मोठी असेल तर पाणी निघू शकेल जसजशी उघाडी जर ती मोठी असेल पाणी निघू शकेल. आमची आर एम पी पार्कची उघाडी आहे ती मोठी असेल पाणी निघू शकेल मिरा रोडचा जी जाफरी खाडीवरचा जो काठवर आहे. ब्रिटीश काळापासून तो बनलेला कलवर्ट आहे तो आपण दरवर्षी भांडतो. अनेक वर्षापासून कलवर्ट विषय चालवतोय एका विषयात आपल्याला यश आले. मिरारोड आणि भाईदर म्हणजे फाटक तिथे आपण कलवर्ट बनविला. आपल्याला सांगायला आनंद होत आहे की ह्या सभागृहाला किंवा ह्या गावाला की जो केबीन रोड जरासा जरी पाऊस झाला तरी एक –एक,दोन-दोन दिवस बूडून

**राहत होता तो केबीन रोड आता एवढया पावसात तिथे पाणी भरले नाही. कारण एवढच आहे की पाणी वाहून जायची क्षमता वाढविणे गरजेचे आहे. आणि त्यासाठी भले याच्यात शब्दप्रयोग कुठेतरी कमी जास्त असेल त्यामूळे कोणी प्रश्न विचारण्यात राग पण नाही शंका पण नाही अधिकारात विचारल पाहिजे. पण हेतू असा आहे की मिरा भाईदरमध्ये चेणा ते उत्तन ह्या क्षेत्रामध्ये होणा-या अतिवृष्टीच्या पाण्याचे नियोजन करण्यासाठी आपण सल्लागार समिती नेमण्याचा हा विषय आणलेला आहे आपण कधी कधी येतो तशी मला आवड आहे ह्या गोष्टीची अनेकांना ह्या विषयाची आवड असू शकेल. त्यांना अनुभव असू शकेल ते सांगू शकतील इकडे उघाडी बांधा तिकडे उघाडी बांधा की एक उघाडी बांधायची किंवा अनेक उघाडीचा आपण प्रस्ताव तयार करायचा आपल्या महापालिकेचा प्रश्न आहे फंडातून बनवायची की शासनाकडे मागवायची महाराष्ट्र शासनाकडे मागायची की आपण जनरल शासनाकडे मागायचा अशासाठी तो तांत्रिक दृष्ट्या परिपूर्ण प्रस्ताव व्हावा म्हणून हा सल्लागार आज आपल्या ह्या ठरावामध्ये आपण सल्लागार नेमण्याची आपण मंजूरी देत आहोत. कोणता आर्थिक अमूक एक सल्लागार अशासाठी आपण प्रस्ताव मागविणार म्हणून माझी विनंती आहे की सर्व सभासदांनी ह्या गोष्टींचा गांभीर्याने विचार करावा आणि मी जो आता ठराव मांडत आहे तो प्रस्तावित कामासाठी तसेच महापालिकेच्या विहीत कामासाठी अनुभवी तज्ञ सल्लागाराची नेमणूक करण्यासाठी मान्यता देण्यात येत आहे** मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीच्या पुर्वेस संजय गांधी राष्ट्रीय उद्यान (नॅशनल पार्क) असून सदर भागातील डोंगर दऱ्यातून वाहणारे पावसाचे पाणी मुख्यत: १) दहीसर चेक नाका २)मिरा गावठण, महाजनवाडी, ३) जरीमरी मंदीर, विठ्ठल मंदीर नाला, ४) लक्ष्मीबाग नाला ५) साई पॅलेस हॉटेल शेजारील नाल्यातून राष्ट्रीय महामार्ग क्र. ०८ ओलांडून मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातून घोडबंदर खाडीस मिळतो. राष्ट्रीय महामार्ग क्र. ०८ ते घोडबंदर, हटकेश उद्योग नगर हया भागात मोठया प्रमाणावर गृहनिर्माण संकुले, लोकवस्ती झाल्याने सदर पावसाळी पाण्याचा निचरा हा नाल्यातूनच होत असतो. त्यामुळे मोठया स्वरुपात पाऊस झाल्यास व भरती असल्यास मिरा गावठण, मिरागाव, मुन्शी कंपाऊण्ड, कृष्णस्थळ, काशिगाव,सिल्व्हर सरीता, लक्ष्मीबाग व हटकेश उद्योग नगर भाग जलमय होतो. त्यामुळे संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या पायथ्याशी येणाऱ्या पाण्याचे नियोजन करुन सदर पाणी शहरात येऊ न देणे, घोडबंदर भागात वाढीव कल्वर्ट बांधणे, जलमय होणाऱ्या भागाचा अभ्यास करुन कामांचे नियोजन करणे यासाठी अनुभवी तज्ञ सल्लागार नेमल्यास त्यांच्या मार्फत अभ्यास करुन आवश्यक नियोजन करणे कामाचा सविस्तर अहवाल तयार करुन महासभेपुढे सादर करता येईल. सदर कामासाठी होणारा खर्च गटारे / नाले बांधकाम करणे या लेखाशिर्षातून भागविता येईल. प्रथमत: अनुभवी तज्ञ सल्लागाराची नेमणूक करण्यासाठी मान्यता देण्याचा प्रस्ताव मा. आयुक्त यांच्यामार्फत सादर करण्यात आला आहे. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने खालील निर्णय ठरावाव्दारे घेण्यात येत आहे. **ठराव -** प्रस्तावित कामासाठी तसेच महानगरपालिकेच्या विविध कामांसाठी अनुभवी तज्ञ सल्लागाराची नेमणूक करण्यास मान्यता देण्यात येत आहे. सदर काम तातडीने होण्यासाठी शासनाच्या वन विभाग, जलसंपदा विभाग, महापालिकेचे आयुक्त, उपायुक्त (आरोग्य), उपआयुक्त (अन. बांधकाम नियंत्रण विभाग), शहर अभियंता, कार्यकारी अभियंता, बांधकाम व पाणी पुरवठा विभाग, मा. महापौर, उपमहापौर, सभागृह नेता यांची एक समिती नेमण्यात यावी व तज्ञ सल्लागार नेमून त्यांना शहरातील काही ठिकाणी भरतीच्या व पावसाळ्यात पाणी भरते त्यामध्ये नवघर येथील उघाडीतून अमावास्येच्या वेळी भरतीचे पाणी उलटे येते तसेच भाईंदर (प.) सुदामा नगर, मिरारोड जाफरी खाडी, बंदरवाडी येथील विजय पार्क व शहरातील इतर ठिकाणी पावसाळ्यात किंवा मोठ्या भरतीच्या वेळी पाणी भरणाऱ्या ठिकाणांचा अहवाल तयार करून लवकरात लवकर मा. महासभेपुढे निर्णयासाठी सादर करावा. **असा हा ठराव आहे. त्यामुळे हे काम आज एका दिवसात मंजूरी देतो आणि उद्यापासून सुरूवात होत आहे असे नाही याच्या अनेक उपसुचना आल्या तर त्याही स्वागतार्थ करता येईल याच्यात नुकसान काही नाही पण जुन पर्यत आपण करू. त्या मिरा भाईदरमधील नागरिकांना खरोखर सोयीचा झाल्या पाहिजेत असा प्रस्ताव आहे असा मी ठराव मांडत आहे.**

**ज्योत्सना हसनाळे :-**

**माझे अनुमोदन आहे.**

**निलम ढवण :-**

**हा जो विषय आहे अत्यंत चांगला विषय आहे. शहराच्या विकासाच्या दृष्टीने देखील चांगला असा विषय आहे. त्याला विरोध नाही आहे. परंतू आपल्या ह्या मिरा भाईदर शहराच्या खाडीच्या लगत जे मातीचे भराव होतात. काही जागा हडप करण्याच्या दृष्टीने असू दे किंवा त्याचे काही अनधिकृत करण्याच्या दृष्टीने असू दे खाडीच्या बाजूला जेव्हा जेव्हा भराव झाले आहेत त्यानंतर देखील हा पाण्याचा प्रवाह खाडीचा त्याखाली बिल्डींग आहेत. इमारती आहेत. त्या बिल्डींगमध्ये पाणी नेहमी भरत असते. माझ्याही बिल्डींगमध्ये जास्त पाऊस झाला तर पाणी भरत असते हे त्या साईटला जे मातीचे अनधिकृत भराव चाललेले असतात तर त्याकडे विशिष्ट प्रशासनाने लक्ष द्याव आणि सगळ माहिती असते परंतू तिथे कारवाई होत नाही मग हे प्रकल्प होऊ देतात परंतू अशा पध्दतीने जेव्हा जेव्हा निर्दशनास येते तेव्हा प्रशासनाने ह्या माती भराव करण्यावर त्वरीत कारवाई करावी अशी मी विनंती करते.**

**रिटा शहा :-**

**मा. महापौर मॅडम में आपकी परवानगीसे बोलना चाहती हूँ विषय बहोत अच्छा लाया है ठराव हो गया है पूरे मिरा भाईदरका आपने क्षेत्र का सोचा है। लेकीन जो जो  हमारे यहा खाडीया है जो नाले है नालेके उपर बहूत हमे यह ध्यान देना होगा की नालेके उपर जो इललिगल बांधकाम हूए है वो बांधकाम को**

हमे तोडना बहूत जरूरी रहेगा क्योकी नाले को बूझाके उसके उपर बांधकाम किए गये है। मै कोई नाले का उल्लेख नही करूंगी की उसके उपर बांधकाम हूए है हॉटेल हूए है घर हूए है उनको तोडना बहोत जरूरी है तभी हमारा यह विषय हमने मिरा भाईदर शहर का जो सोचा हूआ है क्षेत्र के लिए पाणी काही भी नही भरणा चाहिए। तभी यह हमारा विषय सफलता पूर्वक पार पडेगा ऐसी में आपको रिक्वेस्ट करती हूँ यह मेरी इसके अंदर सुचना है।

स्नेहा पांडे :-

मा. महापौर मॅडम विषय बहूत ही अच्छा है मिरा भाईदर के लिए हर जगहका पाणी निकलना चाहिए और थोडीसी बारीशमें मिरा भाईदर भरता है यह हम सभीने देखा है लेकीन कोई भी प्रोजेक्टस शुरू होने से पहले अगर प्री प्लानिंगसे शुरू होता है तो ही प्रोजेक्टस पूरा हो जाएगा। जल्द बाजीमे हम लोग प्रोजेक्ट शुरू कर देंगे और बादमें उसमे अडचण आए उसके पहले हम लोग प्री प्लॅन होके सभी सदस्योंके सामने विषय रखे क्या कैसा कुछ तो विचार होगा प्रशासन के मन में की यह कमीटी एक्स्पर्ट जो नेमने जाऐंगे एक्स्पर्ट की जो नियुक्ती होगी वह किस तरह से, उनकी क्या क्वालीफिकेशन है? कैसे हम मंगाने वाले है निविदा निकलेगी हम सदस्यो को उस वक्त पता नही होता है निविदा निकलता है टेंडर भरा जाता है पास हो जाता है। तो में ऐसा शासन की तरफ से प्रशासन की तरफ से खुलासा चाहती हूँ की किस तरह से एक्सपर्ट हम नियुक्त करेंगे उनकी क्या क्वालीफिकेशन होंगी। और हमारे मन मे क्या विचार है क्या प्लॅन है की कैसे कॉन्ट्रॅक्ट दिया जाएगा या उनको मंथली मानधन पे रखेंगे या किस तरह से होगा यह प्री प्लॅन के सिवा यह प्रोजेक्ट शुरु नही किया जाए। प्रोजेक्ट बहुत ही अच्छा है यह करना बहुत जरुरी है। लेकिन इसके लिए प्री प्लॅन विषय लेके और हम सभी सदस्यों को इसक जानकारी दिजीए।

अश्विन कासोदरिया :-

महापौर मॅडम बहुत ही अच्छा विषय है। प्रशासनने जो लेके आए है मॅडम में सिर्फ आपसे इतनी विनंती करुंगा की मेरी एक सुचना है। इसे इस ठराव के अंदर ॲड किया जाए। हम लोग कन्सल्टन्ट अपॉईंट करने वाले है। जो की बारीश के अंदर जो पानी आता है जिसके वजह से सारे एरिया के अंदर पानी भर जाता है तो नाले की जो व्यवस्था वगैरा सब होंगी अगर कन्सल्टन्ट को एकबार सुचना दे की हमारे मिरा भाईंदर शहर के अंदर जैसे की एक भी डॅम नही है तो ऐसा कोई लॅन्ड है क्या हमारे मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्र के अंदर जिसमें बारीश का जो पानी आता है उसको हम स्टोरेज कर सके अैर बारीश के बाद में आनेवाले जो भी महिने है उसके अंदर हम लोग उस पानी को युज कर सके ताकी पीने के पानी की और बाकी सारी जो भी हमारी प्रॉब्लेम्स है काफी सारी राहत मिलेगी। जैसे की आप सभी जानते है की नवी मुंबई के अंदर भी उनका एक सेपरेट डॅम है। हालाकी मिरा भाईंदर शहर की जॉग्रफी वहाँ से डिफरन्ट है। लेकिन फिर भी हम लोग जब कन्सल्टन्ट हम अपॉईंट कर रहे है तो क्यो ना उनसे उनके बारे में भी ओपीनियन लिया जाए। यह मेरी सुचना को आप ॲड कर दिजीए।

मा. महापौर :-

ठिक है।

दिप्ती भट्ट :-

महापौर मॅडम आमच्या मिरारोडला जे सेक्टर सगळे शांती नगरच्या खाली आहेत आणि नयानगर आणि शांती नगरचे पाणी जे अयप्पाच्या पुढे जाफरी खाडीमध्ये जाते तिथे पुनम सागरच्या पाटामध्ये वैशाली बिल्डींगच्या पाठी एवढा भराव करण्यांत आला आहे. ते अजुनपर्यंत लक्षात येत नाही. तर आपल्याला विनंती आहे की तसे जे भराव होतात त्याच्यामुळे लोकांना नाहक त्रास सोसावा लागतो. दोन दोन दिवसात लोक पाण्यात होते. सेक्टर ५ मध्ये ४ मध्ये असे आणि तसेच विरोधी पक्षनेता मला वाटत २००७ मध्ये वैती साहेब होते तेव्हा ते आम्हाला स्वतःला सगळ्यांना नगरसेवकांना घेऊन गेले आपल्या वेस्टर्न हॉटेलच्या पाठीमागे जो जाण्यासाठी नाला आणि त्याच्या समोरच्या बाजुला हॉटेलच्या बाजुला बदल झालेला आहे आपण बघितले असेल आणि वेस्टर्न हॉटेलच्या पाठी जे सी.आय. १-२ जे पार्ट आहेत. त्याच्यामध्ये त्या खाली पार्ट होत्या ते नाले मोठे होते एवढे पाणी पहिला पण साचते. तेव्हा एवढे भरत नव्हते. आता का भरते तर ते लक्षात घेण्यात यावे. आणि याची गॅरंटी देणार का? हे तुम्ही नेमत आहेत हे चांगले आहे. मी नाही बोलत नाही पण पैसे वेस्ट जाणार नाहीत की ते पाणी निघणार असे ते सांगणार कारण आपले अधिकारी पण तेवढे समक्ष आहेत तर त्यांचे क्वालिफिकेशन आणि ज्यांना नेमणार आहेत त्यांची ते काय आहेत आणि महानगरपालिका पब्लीकचा पैसा वाया न जावा म्हणून लक्षात घेण्यांत यावे कारण की साहेबांना पण माहित असेल वैती साहेबांना की आम्हाला पर्सनल घेऊन गेलेले व्हिजीट करायला. माझा पाय फ्रॅक्चर झाला तरी पण मी सगळे नाले व्हिजीट केले तेव्हा तुम्हाला माहित असेल आणि तुम्ही स्वतः बघितले असेल रिलायन्स चे जे बघितलेले आहे. आपल्या गावासाठी जाताना तिथे किती मोठेमोठे नाले होते. वेस्टर्नच्या पाठच्या भागामध्ये आज तिथे सगळ्या बिल्डींग झाल्या समोरच्या पार्टमध्ये बिल्डींग झाल्या. पुनम सागरमध्ये झालेल्या आहेत. सेंट झेवियरसाठी ते मोठा नाला होता. त्या नाल्याच्या अर्ध्या पार्टमध्ये बिल्डींगचा अर्धा पार्ट आलेला आहे आणि अर्धा नाला मॅंग्रोज कापुन बुजविण्यांत आलेला आहे. त्याला नोटिस पण गेलेली आहे. पण तशा लोकांवरती बिल्डरांवरती काही कारवाई होत नाही तर ते प्लिज लक्षात घेण्यात यावे. आपण चांगले करतोय पण चांगल करताना ते पण सगळे लक्षात घ्यावे.

मा. उपमहापौर :-

महापौरांच्या मान्यतेने बोलतो, खर तर ह्या विषयामध्ये म. आयुक्त गीते साहेबांचे मी अभिनंदन करु इच्छितो आपल्याला सर्वांना ह्यावेळी पावसाळ्याने किती प्रचंड त्रास दिलेला आहे याची कल्पना आहे. आणि दोन वेळेला सिल्वर सरिता परिसरात आणि त्यामुळे त्याच्या मागचा म्हणजे लक्ष्मी बाग असु दे, काशी गाव आणि हायवेच्या वरचा पट्टा, मुन्शी कम्पाऊंड, कृष्णस्थळ, विजय पार्क, सिल्वर पार्क ह्या संपूर्ण पट्टयाला फार मोठा फटका बसला. दोन वेळा म्हणजे २९ आणि ३० ऑगस्ट आणि १९ आणि २० सप्टेंबर ह्या दोन वेळेला खुप मोठा पाऊस झाला आणि कमीशनर साहेब पहिल्या वेळेला अक्षरशः बोटीतून गेले मी त्यांचे खुप कौतुक करतो की एवढी मोठी रिस्क त्यांनी घेतली आणि त्यानंतर दुसऱ्या वेळेला कमीशनर साहेब आमच्या सोबत फिरत होते. आणि त्यावेळेला असे लक्षात आले की एका ठिकाणी गाडी पार्क केली. २०-२५ मिनिटे आम्ही चर्चा केली चर्चेच्या दरम्यान पाऊस थांबला पण संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातुन येणारे मोठ्या प्रमाणात येणारे पाणी त्यावेळेला त्यांची गाडी तिथे पार्क केलेली गाडीपर्यंत पाणी आले. कमीशनर साहेबांना मी एवढेच सांगितले की लोकांना १५-२० मिनिटांच्या आतमध्ये इथे राहणाऱ्या लोकांच्या घरामध्ये कस पाणी जाते त्याचे उदाहरण आम्ही बघितले आणि कमीशनर साहेबांनी चर्चा केली आता ह्या सगळ्यांच्या भावना तीव्र अहेत. सगळ्यांनी सगळे प्रयत्न केलेले आहेत. कोणाला आपण कॉन्ट्रॅक्ट देत नाही मॅडम, आपण याच्यामध्ये अशी एक आमची चर्चा झाली होती कमिशनर साहेबांनी एक सुचना केली आहे की आपण तज्ञ समिती नेमुया तज्ञ समिती म्हणजे ती तुमच्या आमच्या पैकी नाही तुमच्या आमच्यापेक्षा जास्त ज्यांच्या ह्या क्षेत्राचा अभ्यास आहे. मोठ्या स्तरावरती समिती असणार. संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातुन उतरणारे पाणी कुठे डायव्हर्ट करता येईल का? त्याची कुठे साठवणूक करता येईल का? मिरा भाईंदरमध्ये जे नाले आहेत त्या नाल्यांची कॅपेसीटी आपल्याला वाढविता येईल का? त्यात मॅंग्रोजचा बऱ्याच प्रमाणात प्रश्न उपस्थित होतो आणि आपल्याला तिथे काही खोदकाम करता येत नाही किंवा नाले वाढवता येत नाही ही समिति असलेल्या त्या समितीच्या माध्यमातून आपल्याला त्यांची मत समजुन घ्यायची आहेत. आपल्याला ह्या समस्येतुन मार्ग काढायचा आहे हे नक्की. त्याच्यामुळे सध्या आपण कुठचा कॉन्ट्रॅक्ट टेंडर काढत नाही. तर त्यांच्या सुचना आपल्याला घ्यायच्या आहेत. आणि त्यानंतर आपल्याला त्याच्यावरती निर्णय घ्यायचा आहे. कमिशनर साहेब आजचा ह्या विषयाच्या माध्यमातून मी आपले खरच कौतुक करतो की आपण चांगली भुमिका घेतली होती. अगदी तीन दिवस पाण्यामध्ये त्या नाल्यात उतरले होते मी सांगितले कमिशनरची आम्हाला गरज आहे की उतरु नका नाल्यात हा विषय आपण आणलात. आपले अभिनंदन आणि सर्व सदस्यांचा महापौरांनी ह्या सुचनांचा सातत्याने विचार करावा अशी विनंती.

मर्लिन डिसा :-

महापौर मॅडम तुमच्या परवानगीने शांतीनगरला मिरारोडला, शांतीनगरच नव्हे तर शितलनगर पण एकदम लो लाईनमध्ये आहे. नेहमी तिथे पाणी साठते १० नंतर १५ नंतर पाऊस झाला की तिकडे लोकांच्या घरामध्ये पाणी जाते. तर ते पण जरा लक्षात घेऊन त्या स्नेहांजलीच्या तिकडे तो नाला आहे. मी आता काही दिवसांपासून चौकशी केली. तिथे टेंडरींग झालेले आहे पण माझी अशी रिक्वेस्ट आहे. तिथे अजुन एक नाला केला पाण्याचा निचरा करण्यासाठी कारण एकाच नाल्यावर प्रेशर येतो. नयानगर वरुन गिता आर्केड मेन रोडवरुन सगळ पाणी ह्या बाजुला येते. त्यामुळे शितलनगर ब्राऊन होते लो लाईन असल्यामुळे तर एक पॅरालाईन नाला जर आपण केला आणि पाण्याचा निचरा झाला तर ते बर होईल.

विनोद म्हात्रे :-

सन्मा. महापौर मॅडम प्रकरण क्र. ८ च्या हिशोबाने मी बोलतोय मगापासून चाललेला विषय मिरारोड, भाईंदर ईस्ट, वेस्ट परंतु आमचे गाव देखील ह्या पाण्याने त्रस्त व्हायला लागलेले आहेत. ह्या गावालगत समूद्र किनाऱ्यापासून मिठागृहापर्यंत इंग्रज काळापासून जवळ ५०-६० फुट रुंदीने नाले असायचे. मला वाटते नाले आता दिसायला नाहीसे झालेले आहेत. आता फक्त पाणी द्यायचा मार्ग फक्त ४ ते ५ फुट राहिलेला आहे. मॅंग्रोजमुळे हे नाले जवळ ५०-६० फुटचे बंद झालेले आहेत आणि आता पावसाचे जे पाणी आता पडत होत पावसाचे पाणी वाहून जाण्यासाठी जो नाला होता राई, मुर्धा, मोर्वा गावात ते पाणी वाहून जात नाही. मॅंग्रोजमुळे जर आज आमच्या गावातली ह्या तिन्ही गावातली परिस्थिती राई, मुर्धा, मोर्वा अमच्या गावच्या मागे असलेली शेत जमीन आज जवळ-जवळ एक हजार एकर जमीन पाण्याखाली आहे. पाणी वाहत जात नसल्यामुळे आणि भात शेती जो आलेला मुबलक भात हे पूर्ण सडलेले आहे. कुजलेले आहे. त्याच्यामुळे ह्यावर्षी आमच्या लोकांचे फार मोठे नुकसान झालेले आहे. तर नाले करताना आपण राई,मुर्धा, मोर्वा खाडीलगत जे नाले आहेत. त्याचा देखील आपण गांभिर्याने विचार करावा. तो देखील विषय आपण याच्यात घ्यावा.

गिता जैन :-

महापौर मॅडम, मुझे लगता है अभी हम सिर्फ कन्सल्टन्ट बुला रहे है। तो हम अपनी अपनी राय अभी नही देके जब कन्सल्टन्ट एकबार हो जाता है तब मैं आपसे रिक्वेस्ट करती हूँ सबकी समस्या तब सुनी जाए ताकी कन्सल्टन्ट यहाँ हम बैठे है। वह निर्णय नही लेनेवाले है। कौनसा नाला करना है, कौनसा नही। कन्सल्टन्ट आएगा तभी निर्णय होगा की क्या होनेवाला है। तो मुझे लगता है अपनी अपनी समस्या कन्सल्टन्ट बैठे हो तब सुनाई जाए अभी आप अगला विषय ले यह मेरी विनंती है।

अनिल सावंत :-

**महापौर मॅडम, तुम्ही सांगितले होते सुचना घेणार म्हणून तज्ञ समिती नेमणार आहेत. सभागृह नेत्यांनी चांगला ठराव मांडलेला आहे. याच्यामध्ये माझी फक्त एवढीच सुचना घ्या. इंद्रलोक, कनकीयाच्या परिसरामध्ये मोठ्या प्रमाणावर कांदळवने कापुन भरणी झालेली आहे. तहसिलदाराने त्यांच्यावर केसही दाखल झालेली आहे. तज्ञ समितीच्या कामामध्ये त्याचाही विचार करुन घेण्यात यावा.**

**प्रविण पाटील :-**

**ठरावाच्या अगोदर जी तज्ञ समिती नेमली आहे त्याच्यामध्ये फक्त महापौर, उपमहापौर, सभागृह नेत्यांचीच मागणी आहे. तर आपल्याला विनंती आहे की त्याच्यात विरोधी पक्षनेत्यांचे पण नाव असावे.**

**मा. उपमहापौर :-**

**समिती नेमायची आहे.**

**प्रविण पाटील :-**

**त्याच्यामध्ये त्यांचेही नाव ठरावामध्ये समाविष्ठ करण्यांत यावे. म्हणजे जेणेकरुन पारदर्शक दिसेल.**

**जुबेर इनामदार :-**

**महापौर मॅडम, फक्त एक सुचना आयुक्त उपस्थित आहेत म्हणून, साहेब बी.एस.यू.पी. योजना वैती साहेब तुम्ही त्याला डायरेक्ट इफेक्टस तुमच्याकडेच आहे. बी.एस.यू.पी. योजना त्याच्यासाठी आपण एक तज्ञ सल्लागार..........**

**मा. उपमहापौर :-**

**ऐकून घ्या विशेष महासभा आहे तुम्हाला सगळ्या विषयात बोलता येते मला माहिती आहे. आणि मी दोन वेळा उठलो तेव्हा तुम्ही जे बोललात त्याचे उत्तर मी तुम्हाला देणार आहे.**

**जुबेर इनामदार :-**

**काही हरकत नाही.**

**मा. उपमहापौर :-**

**आता ठराव मंजूर झाला. पुढचा ठराव वाचण्यांत यावा.**

**जुबेर इनामदार :-**

**काही हरकत नाही ठराव मंजूर झाला. महापौर बसलेले आहेत चर्चा करायला देतील. माझा विषय झालेला आहे आणि महापौर सभागृह चालवत आहेत.**

**मा. महापौर :-**

**तुम्ही बसून जा. पुढचा विषय घ्या.**

**प्रकरण क्र. ०८ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या पुर्व बाजुस असलेल्या संजय गांधी राष्ट्रीय उद्यान डोंगर पायथ्यावरुन वाहणाऱ्या पावसाळी पाण्याच्या निचऱ्यासाठी तज्ञ सल्लागार नेमणेबाबत.

**ठराव क्र. ०६ :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीच्या पुर्वेस संजय गांधी राष्ट्रीय उद्यान (नॅशनल पार्क) असून सदर भागातील डोंगर दऱ्यातून वाहणारे पावसाचे पाणी मुख्यत: १) दहीसर चेक नाका २)मिरा गावठण, महाजनवाडी, ३) जरीमरी मंदीर, विठ्ठल मंदीर नाला, ४) लक्ष्मीबाग नाला ५) साई पॅलेस हॉटेल शेजारील नाल्यातून राष्ट्रीय महामार्ग क्र. ०८ ओलांडून मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातून घोडबंदर खाडीस मिळतो.

राष्ट्रीय महामार्ग क्र. ०८ ते घोडबंदर, हटकेश उद्योग नगर हया भागात मोठया प्रमाणावर गृहनिर्माण संकुले, लोकवस्ती झाल्याने सदर पावसाळी पाण्याचा निचरा हा नाल्यातूनच होत असतो. त्यामुळे मोठया स्वरुपात पाऊस झाल्यास व भरती असल्यास मिरा गावठण, मिरागाव, मुन्शी कंपाऊण्ड, कृष्णस्थळ, काशिगाव,सिल्व्हर सरीता, लक्ष्मीबाग व हटकेश उद्योग नगर भाग जलमय होतो. त्यामुळे संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या पायथ्याशी येणाऱ्या पाण्याचे नियोजन करुन सदर पाणी शहरात येऊ न देणे, घोडबंदर भागात वाढीव कल्वर्ट बांधणे, जलमय होणाऱ्या भागाचा अभ्यास करुन कामांचे नियोजन करणे यासाठी अनुभवी तज्ञ सल्लागार नेमल्यास त्यांच्या मार्फत अभ्यास करुन आवश्यक नियोजन करणे कामाचा सविस्तर अहवाल तयार करुन महासभेपुढे सादर करता येईल. सदर कामासाठी होणारा खर्च गटारे / नाले बांधकाम करणे या लेखाशिर्षातून भागविता येईल. प्रथमत: अनुभवी तज्ञ सल्लागाराची नेमणूक करण्यासाठी मान्यता देण्याचा प्रस्ताव मा. आयुक्त यांच्यामार्फत सादर करण्यात आला आहे. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने खालील निर्णय ठरावाव्दारे घेण्यात येत आहे.

**<u>ठराव</u>**

प्रस्तावित कामासाठी तसेच महानगरपालिकेच्या विविध कामांसाठी अनुभवी तज्ञ सल्लागाराची नेमणूक करण्यास मान्यता देण्यात येत आहे. सदर काम तातडीने होण्यासाठी शासनाच्या वन विभाग, जलसंपदा विभाग, महापालिकेचे आयुक्त, उपायुक्त (आरोग्य), उपआयुक्त (अन. बांधकाम नियंत्रण विभाग), शहर अभियंता, कार्यकारी अभियंता, बांधकाम व पाणी पुरवठा विभाग, मा. महापौर, उपमहापौर, सभागृह नेता यांची एक समिती नेमण्यात यावी व तज्ञ सल्लागार नेमून त्यांना शहरातील काही ठिकाणी भरतीच्या व पावसाळ्यात पाणी भरते त्यामध्ये नवघर येथील उघाडीतून अमावास्येच्या वेळी भरतीचे पाणी उलटे येते तसेच भाईंदर (प.) सुदामा नगर, मिरारोड जाफरी खाडी, बंदरवाडी येथील विजय पार्क व शहरातील इतर ठिकाणी पावसाळ्यात किंवा मोठ्या भरतीच्या वेळी पाणी भरणाऱ्या ठिकाणांचा अहवाल तयार करून लवकरात लवकर मा. महासभेपुढे निर्णयासाठी सादर करावा.

**सुचक :- श्री. रोहिदास पाटील** **अनुमोदन :- श्रीम. ज्योत्स्ना हसनाळे**

सदर ठरावामध्ये ॲड. रवि व्यास यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये पावसाचे पाणी समुद्रामध्ये जावून वाया जात आहे. याकरीता मिरा भाईंदर क्षेत्रामध्ये पावसाच्या पाण्यास जमा करण्याकरीता धरण किंवा वॉटर रिझर्व्हर भविष्यात कोणत्याही जागी आपण बांधू शकतो याचा योग्य तो सर्व्हे , लॅन्ड, सॉईल टेस्ट करणेकरीता सल्लागार नेमून तपासणी करण्यात यावी जेणेकरुन भविष्यात पावसाचे पाणी लोकांना उपलब्ध करुन देता येईल व पाण्याची टंचाई दुर होईल.

**ठराव सुचनेसह सर्वानुमते मंजुर**

**सही /-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(सभागृहात गोंधळ)

प्र. नगरसचिव :-

**प्रकरण क्र. ९,** मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विविध विभागात ठेका पध्दतीने वाहन चालक पुरवठा करणे करिता वार्षिक निविदा मागविणेस आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत.

प्रभात पाटील :-

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मालकीची वाहने अत्यावश्यक सेवेत तसेच विविध विभागात उदा. अग्निशमन, पाणी पुरवठा, आरोग्य, वैद्यकिय आरोग्य विभाग, रुग्णवाहिका, शववाहिनी, व्हॅक्सीन व्हॅन, औषध टेम्पो आणि औषध लस वाहतूक वाहन इत्यादी वाहने दोन ते तीन पाळी मध्ये कार्यरत आहेत. सदर वाहनांवर स्थायी वाहन चालक यांची संख्या अपूरी असल्याने ठेका पध्दतीने वाहन चालक पूरवठा करणे आवश्यक आहे. सदर वाहनांवर आवश्यकतेनुसार ठेकेदाराकडून वाहन चालक / ऑपरेटर यांचा पुरवठा करण्यात येतो.

सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात अंदाज पत्रकिय तरतूदी नुसार ठेका पध्दतीने वाहन चालक पूरवठा करणे बाबत खालील प्रमाणे तरतूद करण्यात आलेली आहे.

| अ.क्र | लेखाशीर्ष | लेखा सांकेतांक | सन २०१७-१८ करिता अर्थ संकल्पिय तरतूद |
|---|---|---|---|
| १. | अस्थायी आस्थापना / ठेका वाहन चालक खर्च | २१२० | १.०० कोटी |
| २. | अग्नीशमन अस्थायी आस्थापना / सूरक्षा रक्षक / वाहन चालक | २१२०/२५७२ | २.०० कोटी |
| | एकूण | | ३.०० कोटी |

सदर वार्षिक निविदेकरिता अंदाजित रू. २.५ कोटी इतका खर्च अपेक्षित आहे. सदरचा खर्च सन २०१७-१८ या अर्थसंकल्पातील अस्थायी आस्थापना ठेका वाहन चालक व अग्नीशमन अस्थायी आस्थापना या लेखाशिर्षातून खर्च भागविता येईल.

ठराव :-

तरी महापालिकेच्या विविध विभागातील वाहनांवर ठेका पध्दतीने वाहन चालक / ऑपरेटर पूरवठा करणेकामी वार्षिक जाहिर ई-निविदा प्रसिध्द करुन दर मागविण्यास व त्याकामी येणा-या खर्चास ही सभा आर्थिक व प्रशासकिय मंजूरी देत आहे.

मदन सिंह :-

माझे अनुमोदन आहे.

निलम ढवण :-

महापौर मॅडम ह्या विषयावर मला बोलायचे आहे उपायुक्त म्हसाळ साहेब किंवा आयुक्त साहेब आपण ज्या ड्रायव्हरसाठी ठेका पध्दतीने निविदा काढण्यासाठी आर्थिक आणि प्रशासकीय मंजुरीसाठी आपण हा प्रस्ताव ठेवलेला आहे. सगळ्याच याच्यामध्ये निविदा काढत असताना पहिली महासभा किंवा स्थायी समितीची मंजुरी आपण घेतलेली आहे का? एक उदाहरण देते दि. ०४/०७/२०१७ रोजी मिरा भाईंदर मधील मिरा भाईंदर महापालिकेच्या विविध विभागाकरिता वेळोवेळी आवश्यक असणारे कनिष्ठ अभियंता व स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक ठेका पध्दतीने पुरवठा करणेबाबत. किमान वेतन कायद्यानुसार कार्यवाही याची आर्थिक आणि प्रशासकीय मंजुरी अगोदर घेतली होती का?

विजयकुमार म्हसाळ (उपायुक्त (मु.) :-

सन्मा. महापौर मॅडम यांच्या परवानगीने बोलतो की सर्व सन्मा. सदस्य यांनी जो मुद्दा उपस्थित केलेला आहे. ज्युनिअर इंजिनिअर्स याबाबतीमध्ये २५ लाख मर्यादेच्या तरतुदीच्या अधिन राहून मा.

आयुक्तांना अधिकार आहे. त्यांना प्रशासकीय वित्तीय त्यांच्या अधीन राहून केलेली आहे. त्याच्यानंतर स्थायी समितीला नंतर अगवत केले जाते.

निलम ढवण :-

पण कुठचीही परवनगी न घेता ही निविदा काढण्यात आली होती. आणि दुसरी गोष्ट याच्यात दोन निविदा काढल्या होत्या. परंतु पहिली निविदा देखील कॅन्सल न करता दुसरी निविदा काढण्यांत आलेली आहे.

विजयकुमार म्हसाळ (उपायुक्त (मु.) :-

विधी विभागाचे त्याच्यामध्ये अभिप्राय घेतलेले होते यापूर्वी निविदा काढलेली होती त्याच्यामध्ये कोर्टात जी काही हरकत होती तर त्याच्यानंतर त्याच्यावर कोर्टाचे काय निर्देश आहेत हे बघुन विधी विभागाचे अभिप्राय घेऊनच आपण ही निविदा काढलेली आहे. आणि याच्यामध्ये मा. आयुक्तांना जी २५ लाख मर्यादेचे जे अधिकार आहेत. प्रशासकीय मान्यतेची त्यामुळे पूर्व परवानगी स्थायी समितीची किंवा महासभेची घ्यायची त्याच्यामध्ये आवश्यकता नव्हती. त्याच्यानंतर आम्ही स्थायीला अवगत करणार आहोत. आपल्याकडे कामाचा लोड जास्त आहे. बाकीचे वेगवेगळी विकास कामे सुरु आहेत. आपला स्टाफ अपुरा आहे. याच्यातुन २४ पदे जे मंजूर आहेत त्या ठिकाणी १९ कार्यरत आहेत. ६ पदे रिक्त आहेत आणि ती पदोन्नती भरण्याची पदे आपल्याकडे फिगर क्रेडर नाही आहेत. ह्या सगळ्या गोष्टीचा हे करुन आपण ती साधारणतः १०-१० बांधकाम ज्युनिअर इंजिनिअरचे १० आणि सहाय्यक बांधकाम अभियंता अशा प्रकारे १०-१० काढलेली आहे.

निलम ढवण :-

पहिली निविदा काढली असताना.............

विजयकुमार म्हसाळ (उपायुक्त (मु.) :-

पहिली निविदा काढली होती त्याच्यामध्ये हरकत आलेली होती कोर्टामध्ये न्यायप्रविष्ठ प्रकरण झालेले होते.

निलम ढवण :-

अजुनही आहे.

विजयकुमार म्हसाळ (उपायुक्त (मु.) :-

त्याच्यामध्ये त्यांनी पुढची प्रोसेस करुन आता म्हटलेले आहे आता ती निविदा पुढची प्रोसेस करायला एक वर्ष लागले ते कोर्टाचे प्रकरण काही संपलेले नाही आणि आपल्याकडे विकास कामाला...........

निलम ढवण :-

साहेब कोर्टाची जी प्रोसिजर आहे ती माझ्या माहितीप्रमाणे ४ जण कोर्टात आहेत. परंतु बाकीचे जे गेलेले नाहीत कोर्टात.......

विजयकुमार म्हसाळ (उपायुक्त (मु.) :-

आपण जे चार जणांचे बोलत आहेत त्यांचे मॅटर वेगळे आहे.

निलम ढवण :-

कोर्टाची प्रोसिजर म्हणालात तर त्या चार यांच्यावर यांची ऑर्डर आहे कोर्टात बाकीचे जे नाहीत त्यांचा विषय काय?

विजयकुमार म्हसाळ (उपायुक्त (मु.) :-

विषय असा आहे ४ लोक जी कोर्टामध्ये आहेत औद्योगिक न्यायालयामध्ये ती बाब वेगळी आहे. आणि आपण वेगळ्या एका एजन्सीमार्फत जे मागितलेले आहे त्या बदलची न्यायप्रविष्ठचे प्रकरण वेगळे आहे. दोन्ही भिन्न प्रकरणे आहेत. जे लोक गेलेले आहेत ते यापूर्वी आपल्याकडे कार्यरत होते आणि नंतर औद्योगिक न्यायालयाच्या याच्याने त्यांनी स्थगिती घेतलेली आहे. तर ते मॅटर वेगळे आहे. त्याच्यामध्ये आपण त्यांना हे केलेले नाही. ती मॅटर तशीच ठेवलेली आहेत. जे आपण गुमान रिसर्च एजन्सीमार्फत आपण जे ज्युनिअर इंजिनिअर घेणार होतो तर त्याचे पण प्रकरण न्यायप्रविष्ठ झाले होते. ह्या वर्षभरापूर्वी आपण निविदा मागविलेली होती. त्याच्यामध्ये स्थगिती आली. मग नंतर आपण कोर्टाचे अभिप्राय घेतले विधी विभागाचे पण अभिप्राय घेतले. ते म्हणाले की ठिक आहे तुम्हाला जर कामाची आवश्यकता असेल तुम्ही ही निविदा काढू शकता. त्याप्रमाणे आपण फ्रेश निविदा काढलेली आहे. हे २५ लाख प्रशासकीय वित्तीय मान्यतेच्या अधिन राहून.

निलम ढवण :-

कामाचा लोढ एवढा असल्यामुळे त्यानंतर काढल्यानंतर पण त्यांची भरती किंवा अगोदरची आपण जाहिरात घेऊन काढतोय. आपल्या सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार जे पहिला पुर्ववत इथे इतके वर्ष ४-४, ५-५ वर्ष ज्यांनी कामे केलेली आहेत त्यांना प्रथम प्राधान्य देण्यांत यावे. असे माझ्या माहितीप्रमाणे सर्वोच्च न्यायालयाचा एक आदेश आहे. तो विधी मॅडमकडून घ्या. तुमच्याही निदर्शनास मी आणून दिलेला होता. आणि हे असताना देखील एका एका इंजिनिअरवर आपल्या ६-६ प्रभाग समित्या आहेत. त्या प्रभाग समित्यांमध्ये मुबलक इंजिनिअर नसल्यामुळे तिथली कामे देखील होत नाही आहेत. आणि गेले ४-४ वर्ष

त्यांनी काम केलेली आहेत. त्यांना डावलून त्यांना प्राधान्य न देता आपण डायरेक्ट बाहेरचे इंजिनिअर निविदा किंवा ॲड काढण्यासाठी त्याच्यामध्ये काय उद्देश आहे?

विजयकुमार म्हसाळ (उपायुक्त (मु.) :-

आपण यापूर्वी जे बोलला ते एका प्रकारे इन्डीव्युजल लोकांना आपण ऑर्डर दिलेल्या होत्या. त्यांची मुदतवाढ आपण स्थायीमध्ये किंवा ६-६ महिन्यांची मुदतवाढ घेत होतो............

निलम ढवण :-

एका जाहिरातीमध्ये एका वर्षाचे दिलेले आहे. दुसरी जाहिरात काढली त्याच्यामध्ये ६ महिन्याचे दिलेले आहे.

ध्रुवकिशोर पाटील :-

महापौर मॅडम हा विषय ड्रायव्हरचा ठेका पध्दतीने आहे. कनिष्ठ अभियंताचा नाही.

निलम ढवण :-

महासभा आर्थिक मंजुरी.

ध्रुवकिशोर पाटील :-

आपण त्यांच्या कॅबीनला जा त्यांना रिक्वेस्ट करा.......

निलम ढवण :-

फक्त मंजुरीचा विषय आहे. ध्रुवकिशोरजी आर्थिक प्रशासकीय मंजुरीचा विषय आहे.

(सभागृहात गोंधळ)

निलम ढवण :-

आर्थिक आणि प्रशासकीय तुम्हाला जी योग्य वाटतील त्यालाच...........

प्रभात पाटील :-

महासभेची हीच मंजुरी आहे. आणि तिच मंजुरी घेतलेली आहे.

निलम ढवण :-

मग मी तेच सांगत आहे मी त्याच धर्तीवर विचारत आहे. आपल्याला पाहिजे तेच विषय घेणार का तुम्ही.

ध्रुवकिशोर पाटील :-

१०० टक्के तोच विषय आहे मॅडम ही महासभा आहे. हा विषय ठेका पध्दतीचा आहे हा कनिष्ठ अभियंताचा विषय नाही आहे.

निलम ढवण :-

हा पण त्याच्यातच आहे. कनिष्ठ पण आणि ठेक्याचा पण विषय आहे.

ध्रुवकिशोर पाटील :-

महापौर मॅडम ठराव केलेला आहे............

निलम ढवण :-

म्हणजे तुम्हाला पोषक जे असेल ते ठराव सगळे आर्थिक आणि हे करुन घ्यायचे आणि बाकीचे मग असे काय आहेत. सर्व गोष्टी कायदेशीर करा. कायद्याला धरुन कायद्याच्या चौकटीत करा. ठराव करायचे मेजोरीटीने पास करायचे. लोकशाही काही तरी ठेवा ना अस चालत का? ध्रुवकिशोरजी जेव्हा तुम्ही ह्या बाजुने होता ना तेव्हा ह्या विषयावर चांगला आवाज करत होतात.

(सभागृहात गोंधळ)

मा. महापौर :-

सगळ्यांनी विषयावर बोला.

निलम ढवण :-

माझे म्हणणे तेच आहे जे तुम्ही ठराव कराल किंवा जे विषय घ्याल सर्वांना समान काहीतरी लावा ना. जे स्वतःला योग्य वाटेल ज्याच्या ३-३ शंका असेल मला माहिती नाही. मग त्यानुसार तुम्ही ते निर्णय घेता हे चुकीचे आहे. याचा जवाब आम्ही विचारायचा नाही का? म्हणजे बडबडत आहेत ते बडबडत आहेत आणि जे नाही आहेत ते आपल्याला पाहिजे तसे तुम्ही ठराव करुन घेणार मेजोरीटीवर अस चालत का?

मा. महापौर :

तुमचा ठराव आहे का?

निलम ढवण :-

पहिले प्राधान्य त्यानुसार साहेब त्यांना करण्यांत यावे. कोर्टात गेलेले आहेत ते राहू द्या बाकीचे जे आहेत त्यांना तुम्ही घ्या.

अनिल सावंत :-

दोन मिनिटे ह्या विषयावर बोलतो आणि माझा ठराव मांडतो. ठेकेदारांचा विषय आला की काही लोकांना ठराव पास करायची घाई असते. हा प्रशासनाने दिलेला गोषवारा आहे वाहन चालक. आणि ऑपरेटर यांचा खर्चाचा. मल प्रशासनाला एक विचारायचे आहे महापौर मॅडम प्रशासनाने जो गोषवारा

दिलेला आहे मॅडम मला फक्त एकच विचारायचे आहे तुम्ही झालेल्या खर्चासाठी मंजुरी घेत आहात की पुढील खर्चासाठी खर्च काही झाला आहे का म्हसाळ साहेब.

विजयकुमार म्हसाळ (उपायुक्त (मु.) :-

आता सन्मा. सभागृहासमोर जो विषय आहे प्रशासकीय वित्तीय मान्यतेचा त्याची जाहिर निविदा होईल आणि त्याच्यामार्फत आपण शासनाचा जसा जी.आर. आहे त्याच्यानुसार आपण हा प्रस्ताव.............

अनिल सावंत :-

हरकत नाही. ठिक आहे हरकत नाही मला तेच पाहिजे होते. महापौर मॅडम प्रशासनाने जो गोषवारा दिलेला आहे. आर्थिक आणि प्रशासकीय तरतूद ह्या हेडिंगखाली ३ करोड आहे २०१७-१८ मध्ये २०१७-१८ चे ७ महिने गेले ५ महिने फक्त शिल्लक राहिलेले आहेत. ह्या ५ महिन्यासाठी ३ करोड मधले २.५ करोड रु. लागणार आहेत. कसली मान्यता घेत आहेत? वर्षाला ३ करोड आणि ५ महिन्याला २.५ करोड. नक्की काय आहे. वर्षाला ३ करोड खर्च होत असेल तर ह्या ५ महिन्यात २.५ करोड कसे खर्च करणार तुम्ही? खर्च कमी व्हायला पाहिजे व मंजुरी कसली घेत आहोत?

विजयकुमार म्हसाळ (उपायुक्त (मु.) :-

याच्यामध्ये आपण जे बजेट तरतूद केलेली होती. आता आपल्या ज्या अत्यावश्यक गाड्या चालू आहेत त्याच्यासाठी जी चालक आहेत तर त्याच्या पगाराची तरतूद आपण ह्या लेखाशिर्ष ठेवलेले आहेत. त्याच्यामधूनच आतापर्यंत होत आलेले आहे. आणि मागच्या ठरावामध्ये मंजूर असे केले होते की पूढची निविदा मंजूर होईपर्यंत त्या एजन्सीला आता आपली जी एक्झीस्टींग एजन्सी आहे.

अनिल सावंत :-

मला तेच बोलायचे आहे सभागृहाची मान्यता घेतल्याशिवाय तुम्ही ह्या अर्थसंकल्पीय तरतूदीला खर्च केलात आणि आता ती तरतूद मंजूर करुन घेत आहेत. प्रशासनाने दिलेला गोषवारा सदोष आहे. तुम्ही ती माहिती का लपवली?

विजयकुमार म्हसाळ (उपायुक्त (मु.) :-

जे लेखाशिर्षातली तरतूद आहे ती ह्या फाईनान्शीअल इयर मधलीच आहे.

अनिल सावंत :-

आज तुम्ही मंजूरी घेणार म्हणजे पुढील काळासाठी घेणार की ह्याच महिन्यासाठी? ५ महिन्यामध्ये २.५ करोड खर्च करणार का? त्याचा डिटेल्स का नाही दिले? किती ऑपरेटर लागणार आहेत. कुठल्या डिपार्टमेंटला लागणार आहेत. सभागृहाची दिशाभूल का करता तुम्ही पूर्ण डिटेल द्या ना.

विजयकुमार म्हसाळ (उपायुक्त (मु.) :-

वार्षिक..........

अनिल सावंत :-

वार्षिकच म्हणतोय. वर्षातले ५ महिने शिल्लक आहेत ७ महिने गेले.

रवि व्यास :-

बाकी का अमाऊंट स्पिड ओव्हर हो जाएगा। उसमें क्या प्रॉब्लेम है बाकी का अमाऊंट स्पिड ओव्हर हो जाएगा।

अनिल सावंत :-

वह स्पिड ओव्हर नही होता है।

मा. महापौर :-

आपण ठराव वाचा.

अनिल सावंत :-

ठराव तर होईल. प्रशासन का गोषवारा प्रशासन को उत्तर देने दो ना।

जुबेर इनामदार :-

परिपूर्ण गोषवारा आला तर चर्चा कमी होईल.

मा. महापौर :-

मैंने आपको बोलने के लिए नही बोला।

जुबेर इनामदार :-

महापौर मॅडम, गटनेता आहे ह्या पक्षाचा अधिकार आहे माझा. सत्तेमध्ये भाग घेणे हा माझा अधिकार आहे.

मा. महापौर :

आप ठराव पढिए।

अनिल सावंत :-

मॅडम ठराव वाचतो विषय गंभीर अहे. आपकी मान्यता से ठराव पास होगा। प्रशासन दिशाभूल करत आहे. त्याच्यावर तुम्ही लक्ष द्या एवढीच माझी विंनती आहे.

नरेश पाटील :-

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मालकीच्या वाहनांवर ठेका पध्दतीने वाहन चालक पुरवठा करणेकामी प्रस्ताव शासनाने सादर केलेला आहे. सदर गोषवारा सदोष असून यामध्ये पालिकेच्या वाहनांची संख्या, स्थायी वाहन चालक यांची संख्या तसेच चालू आर्थिक वर्षात किती वाहन चालक/ऑपरेटर यांची आवश्यकता भासणार आहे. याची कोणतीही माहिती प्रशासनातर्फे देण्यात आलेली नाही. सन २०१७-१८ करीता अर्थसंकल्पिय तरतूद रु. ३ करोड आहे व प्रशासनाने उर्वरित काळासाठी रु. २.५ कोटी इतका खर्च प्रस्तावित केलेला आहे. चालू आर्थिक वर्षातील पाच महिने शिल्लक आहेत. मागील सात महिन्यांमध्ये वाहन चालकांचा किती खर्च करण्यात आला याची कोणतीही माहिती गोषवाऱ्यामध्ये देण्यात आलेली नाही.

तरी या विषयीची सविस्तर माहिती पुढील येणाऱ्या मा. महासभेमध्ये नविन प्रस्ताव सादर करावा असा मी ठराव मांडत आहे.

हरिश्चंद्र आमगावकर :-

माझे अनुमोदन आहे.

मा. महापौर :-

सचिव महोदय मतदान घ्या.

प्र. नगरसचिव :-

प्रकरण क्र. ०९ करिता दोन ठराव आलेले आहेत. पहिला ठराव सुचक श्रीम. प्रभात पाटील, अनुमोदक श्री. मदन सिंह, दुसरा ठराव सुचक श्री. नरेश पाटील, अनुमोदक श्री. हरिश्चंद्र आमगावकर. प्रथम दुसरा ठराव मी मतदानास टाकतो. सुचक श्री. नरेश पाटील यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने जे असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ कोणी असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. सुचक श्रीम. प्रभात पाटील यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने जे असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ कोणी असतील त्यांनी हात वर करायचे आहेत.

मा. महापौर :-

सुचक श्रीम. प्रभात पाटील यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने ६१, विरोधात ३४, तटस्थ ० इतकी मते पडलेली आहेत. श्रीम. प्रभात पाटील यांनी मांडलेला ठराव बहुमतांनी मंजूर करण्यांत येत आहे.

प्रकरण क्र. ०९ :-

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विविध विभागात ठेका पध्दतीने वाहन चालक पुरवठा करणे करिता वार्षिक निविदा मागविणेस आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत.

ठराव क्र. ०७ :-

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मालकीची वाहने अत्यावश्यक सेवेत तसेच विविध विभागात उदा. अग्निशमन, पाणी पुरवठा, आरोग्य, वैद्यकिय आरोग्य विभाग, रुग्णवाहिका, शववाहिनी, व्हॅक्सीन व्हॅन, औषध टेम्पो आणि औषध लस वाहतूक वाहन इत्यादी वाहने दोन ते तीन पाळी मध्ये कार्यरत आहेत. सदर वाहनांवर स्थायी वाहन चालक यांची संख्या अपूरी असल्याने ठेका पध्दतीने वाहन चालक पूरवठा करणे आवश्यक आहे. सदर वाहनांवर आवश्यकतेनुसार ठेकेदाराकडून वाहन चालक / ऑपरेटर यांचा पुरवठा करण्यात येतो.

सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात अंदाज पत्रकिय तरतूदी नुसार ठेका पध्दतीने वाहन चालक पूरवठा करणे बाबत खालील प्रमाणे तरतूद करण्यात आलेली आहे.

| अ.क्र | लेखाशीर्ष | लेखा सांकेतांक | सन २०१७-१८ करिता अर्थ संकल्पिय तरतूद |
|---|---|---|---|
| १. | अस्थायी आस्थापना / ठेका वाहन चालक खर्च | २१२० | १.०० कोटी |
| २. | अग्नीशमन अस्थायी आस्थापना / सूरक्षा रक्षक / वाहन चालक | २१२०/२५७२ | २.०० कोटी |
| एकूण | | | ३.०० कोटी |

सदर वार्षिक निविदेकरिता अंदाजित रू. २.५ कोटी इतका खर्च अपेक्षित आहे. सदरचा खर्च सन २०१७-१८ या अर्थसंकल्पातील अस्थायी आस्थापना ठेका वाहन चालक व अग्नीशमन अस्थायी आस्थापना या लेखाशिर्षातून खर्च भागविता येईल.

ठराव :-

तरी महापालिकेच्या विविध विभागातील वाहनांवर ठेका पध्दतीने वाहन चालक / ऑपरेटर पूरवठा करणेकामी वार्षिक जाहिर ई-निविदा प्रसिध्द करुन दर मागविण्यास व त्याकामी येणा-या खर्चास ही सभा आर्थिक व प्रशासकिय मंजूरी देत आहे.

सुचक :- सौ. प्रभात पाटील अनुमोदक :- श्री. मदन उदितनारायण सिंग

| अ.क. | ठरावाच्या बाजुने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | भोईर सुनिता शशिकांत | १ | ढवण निलम हरीश्चंद्र | |
| २ | शाह रिटा सुभाष | २ | कदम अर्चना अरुण | |
| ३ | तिवारी अशोक सूर्यदेव | ३ | नलावडे दिनेश दगडु | |
| ४ | पांडेय पंकज सूर्यमणि | ४ | गुप्ता कुसुम संतोष | |
| ५ | पाटील रोहिदास शंकर | ५ | पाटील धनेश परशुराम | |
| ६ | गोहिल शानू जोरावर सिंह | ६ | परेरा कॅटलीन एन्थोनी | |
| ७ | कांगणे मीना यशवंत | ७ | परदेशी गिता हरीश | |
| ८ | सिंह मदन उदितनारायण | ८ | पाटील नरेश तुकाराम | |
| ९ | शेट्टी गणेश गोपाळ | ९ | सय्यद नुरजाहाँ नाझर हुसेन | |
| १० | भोईर गणेश गजानन | १० | शेख अमजद गफार | |
| ११ | पाटील प्रभात प्रकाश | ११ | पाटील जयंतीलाल गुरूनाथ | |
| १२ | पाटील वंदना मंगेश | १२ | घरत तारा विनायक | |
| १३ | रावल मेघना दिपक | १३ | पांडे स्नेहा शैलेश | |
| १४ | शाह राकेश रतिशचंद्र | १४ | आमगावकर हरिश्चंद्र रामचंद्र | |
| १५ | सिंग श्रीप्रकाश जिलेदार | १५ | शिर्के अनंत गेणू | |
| १६ | पाटील धृवकिशोर मन्साराम | १६ | पाटील वंदना विकास | |
| १७ | जैन गीता भरत | १७ | पाटील संध्या प्रफुल्ल | |
| १८ | जैन सुनिता रमेश | १८ | पाटील प्रविण मोरेश्वर | |
| १९ | जैन राजेंद्र भवरलाल | १९ | भोईर कमलेश यशवंत | |
| २० | रॉड्रीकस मोरस जोसेफ | २० | पाटील अनिता जयवंत | |
| २१ | भूप्ताणी रक्षा सतीश (शाह) | २१ | भोईर भावना राजू | |
| २२ | मोकाशी दिपाली आनंदराव | २२ | भोईर राजू यशवंत | |
| २३ | व्यास रवि वासुदेव | २३ | शेख रुबीना फिरोझ | |
| २४ | रकवी वैशाली गजेंद्र | २४ | डिसा मर्लिन मर्विन | |
| २५ | अग्रवाल सुशील गोपीकिशन | २५ | सावंत अनिल दिवाकर | |
| २६ | खंडेलवाल सुरेश जगदीश | २६ | मेहरा राजीव ओमप्रकाश | |
| २७ | डॉ. पाटील प्रिती जयप्रकाश | २७ | भट दीप्ती शेखर | |
| २८ | मेहता डिंपल विनोद | २८ | सपार उमा विश्वनाथ | |
| २९ | शेट्टी अरविंद आनंद | २९ | अहमद साराह अकरम | |
| ३० | गेहलोत हसमुख मोहनलाल | ३० | इनामदार जुबेर अब्दुल्ला | |
| ३१ | शिंदे रुपाली वसंत (मोदी) | ३१ | शेख अशरफ मोहम्मद इब्राहीम | |
| ३२ | थेराडे संजय अनंत | ३२ | गोविंद हेलन जॉर्जी | |
| ३३ | मुखर्जी अनिता बबलू | ३३ | बगाजी शर्मिला विन्सन्ट | |
| ३४ | वैती चंद्रकांत सिताराम | ३४ | बांड्या एलायस दुमिंग | |
| ३५ | हसनाळे ज्योत्सना जालींदर | | | |
| ३६ | पारधी सुजाता यशवंत | | | |
| ३७ | म्हात्रे सचिन केसरीनाथ | | | |
| ३८ | यादव मिरादेवी रामलाल | | | |
| ३९ | म्हात्रे मोहन गोपाळ | | | |
| ४० | सोनार सुरेखा प्रकाश | | | |
| ४१ | भोईर विणा सुर्यकांत | | | |
| ४२ | म्हात्रे परशुराम पदमाकर | | | |
| ४३ | मांजरेकर आनंद दत्ताराम | | | |

| | | | |
|---|---|---|---|
| ४४ | अरोरा दीपिका पंकज | | |
| ४५ | बेलानी हेमा राजेश | | |
| ४६ | दळवी प्रशांत ज्ञानदेव | | |
| ४७ | गजरे दौलत तुकाराम | | |
| ४८ | नाईक विविता विवेक | | |
| ४९ | सौंस नीला बर्नाड | | |
| ५० | राय विजयकुमार सिस्थन नारायण | | |
| ५१ | परमार हेतल रतिलाल | | |
| ५२ | कासोदारिया अश्विन शामजीभाई | | |
| ५३ | जैन दिनेश तेजराज | | |
| ५४ | भावसार वंदना संजय | | |
| ५५ | शाह सीमाबेन कमलेश | | |
| ५६ | दुबे मनोज रामनारायण | | |
| ५७ | विराणी अनिल रावजीभाई | | |
| ५८ | भोईर जयेश भानुदास | | |
| ५९ | म्हात्रे नयना गजानन | | |
| ६० | भानुशाली वर्षा गिरधर | | |
| ६१ | म्हात्रे विनोद काशिनाथ | | |

**ठराव बहुमताने मंजूर**

**सही /-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र. नगरसचिव :-**

**प्रकरण क्र. १०,** मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत आयाजित करावयाचे भूमिपूजन उद्‌घाटन कार्यक्रमासाठी सुधारीत धोरण निश्चित करणेबाबत.

**रवि व्यास :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत पार पाडण्यात येणाऱ्या विविध विकास कामांचे भूमीपूजन, उद्‌घाटन समारेभ तसेच विविध कार्यक्रमाकरीता महानगरपालिकेने मा. महासभा दि.२०/०१/२००६ ठराव क्र. ७९ अन्वये धोरण निश्चित केले आहे. तसेच मा. स्थायी समिती सभा दि.११/०५/२००७ ठराव क्र. २५ अन्वये खालील प्रमाणे निर्णय घेण्यात आला आहे.

“मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या कोणत्याही कार्यक्रमाची निमंत्रण पत्रिका मा. महापौर यांचे मान्यतेनंतर छपाई करण्यात यावी. तसेच कोणत्याही कार्यक्रमाकरीता (महानगरपालिकेच्या निधीतील) मंडप, स्टेज, खुर्च्या, टेबल इ. व्यवस्थेकरीता महानगरपालिकेच्या निधीतून खर्च करण्यात येऊ नये. महानगरपालिकेमार्फत काही खास कार्यक्रम करावयाचे असल्यास मा. महापौर, उप महापौर, सभागृह नेता, विरोधी पक्ष नेता, सभापती, स्थायी समिती व गटनेत्यांची बैठक घेऊन तद्‌नंतर खर्चास मा. महासभेची रीतसर मान्यता घेऊन कार्यक्रम व खर्च करण्यात यावे.”

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, शासन परिपत्रक क्रमांकः- संकीर्ण २००७/प्र.क्र.९५/२००७/नवि-२० दि.१८ ऑगस्ट २००७ अन्वये नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या कार्यक्रम/ समारंभाच्या वेळी स्थानिक खासदार, आमदार यांना विश्वासात घेऊन ते कार्यक्रमास उपस्थित राहणार किंवा कसे याची संबंधितानी खातरजमा करून घ्यावी व समारंभाच्या निमंत्रण पत्रिकेत प्रमुख उपस्थितांच्या नावाचा उल्लेख असल्यास त्यामध्ये त्यांच्या नावाचा समावेश करावा व त्यांच्या दर्जानुरूप आसन व्यवस्था करण्याबाबत योग्य ती दक्षता घेऊन सदर सुचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याबाबत संचना आहेत. तसेच दि. २७ जुलै २०१५ रोजीचे देखिल परीपत्रक शासनाने जारी केले आहे. सोबत परीपत्रकाच्या प्रती जोडल्या आहेत.

तथापी मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभागातील विकास कामांची उद्‌घाटने, भूमीपूजने ही संबधित स्थानिक सन्माननीय नगरसेवकांमार्फत प्रशासनास अथवा सन्माननीय पदाधिकाऱ्यांना माहीती न देता व रितसर मान्यता न घेता परस्पर करण्यात येत असल्याचे निदर्शनास येत आहे. नामफलक देखिल

परस्पर तयार करून बसविण्यात येत आहेत. यामुळे सर्वत्र नाराजी व्यक्त होऊन तक्रारी होत असतात. तसेच याबाबत विधी मंडळात हक्क भंगाचे प्रस्ताव सादर झाले आहेत.

मा. महासभा दि.२०/०१/२००६ ठराव क्र. ७९ व मा. स्थायी समिती सभा दि.११/०५/२००७ ठराव क्र. २५, दि.१८/०७/२००७ रोजीचे शासन परिपत्रक विचारात घेऊन नव्याने धोरण निश्चित होऊन त्याची काटेकोरपणे अमंलबजावणी करणेसाठी मा. महासभा दि.२९/०९/२०१६ मध्ये प्रस्ताव ठेवला असता मा. महासभेने ठराव क्र. ७३ अन्वये धोरण निश्चित करण्यासाठी विषय फेर सादर करावा असा निर्णय घेतला आहे.

वरील वस्तुस्थिती व मा. महासभेचे धोरण, शासन परीपत्रक पहाता नव्याने धोरण निश्चित होणेस व त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करणेसाठी निर्णय घेण्यासाठी आयुक्त यांनी प्रस्ताव सादर केला आहे. सदर प्रस्तावाच्या अनुशंगाने खालील निर्णय ठरावाद्वारे घेण्यात येत आहेत.

<u>ठराव</u>

१) यापुर्वी निर्णय घेण्यात आलेल्या मा. महासभा दि.२०/०१/२००६ ठराव क्र.७९ व मा. स्थायी समिती सभा दि.११/०५/२००७ ठराव क्र.२५ रद्द करण्यात येत आहे.
२) रु.१.०० कोटी रकमेच्या वरील कामांची (कोणत्याही इमारती व वास्तू वगळून) भुमीपुजने व उद्‌घाटने मा. महापौर यांच्या मंजुरीने तसेच मा. महापौर यांच्याकडून पाहुण्यांची नावे व निमंत्रण पत्रिकेचा मजकुर अंतिम करुनच कार्यक्रम करण्याची दक्षता घेण्यात यावी. तसेच विशेष बाब म्हणून एखाद्या कार्यक्रमाचे उद्‌घाटन मा. महापौरांनी कळविल्यास ते काम त्यांच्या परवानगीशिवाय करु नये.
३) रु.५.०० कोटी रकमेच्या वरील कामाच्या कार्यक्रमासाठी मा. महापौर यांनी सुचविलेल्या पाहुण्यांना बोलविण्यात यावे, सदर कार्यक्रमामध्ये महानगरपालिकेचे पदाधिकारी, स्थानिक विधानसभा सदस्य, स्थानिक खासदार यांना निमंत्रित करण्यात यावे.
४) आमदार, खासदार निधीतील कामांची उद्‌घाटने, भुमीपुजन व नामफलक त्यांच्या शिफारसीनुसार तयार करण्यात यावेत. त्यावर मा. महापौराचे, आयुक्तांचे नाव असणे बंधनकारक राहील.
५) महानगरपालिकेच्या इतर कोणत्याही निधितील कामाच्या नामफलकावर मा. महापौर, मा.आयुक्त, स्थानिक प्रभाग समिती अध्यक्ष, सभागृह नेता, विरोधी पक्ष नेता, सभापती, स्थायी समिती विभागाचे अधिकारी व कंत्राटदारासह यांचे प्रभागातील चार स्थानिक नगरसेवकांचे नाव असणे बंधनकारक राहील.
६) विकास कामांचे उद्‌घाटन, भुमीपुजनासाठी तयार केलेल्या वरील धोरणा व्यतिरिक्त कोणत्याही लोकप्रतिनिधीनी परस्पर उद्‌घाटने, भुमीपुजने करू नये याबाबत स्पष्ट ताकीद देण्यात यावी व परस्पर कार्यक्रम केल्यास कायदेशीर कारवाई करून नामफलक देखिल काढून टाकण्यात यावेत.

वरील निर्णयाची प्रशासनाने काटेकोर अंमलबजावणी करावी.

रिटा शहा :-

माझे अनुमोदन आहे.

दिप्ती भट्ट :-

मा. महापौरांच्या परवानगीने बोलते मला प्रशासनाला, सचिवांना विचारायचे आहे आम्ही जो ठराव करतो. त्याचे उल्लंघन केले आणि किती मान्य आहे. याला मान्य करणे गरजेचे आहे की हे खाली पेपर आहे फेकायला? मला त्याचे उत्तर पाहिजे. मी सचिवांना विचारल ह्या ठरावाची काय किंमत आहे? ह्या पेपरची किंमत काय आहे?

प्र. नगरसचिव :-

ठरावाची किंमत खुप आहे.

दिप्ती भट्ट :-

ते काय?

प्र. नगरसचिव :-

तुम्ही केलेले ठराव................

दिप्ती भट्ट :-

महापौर मॅडम जेव्हा मी प्रशासन व आयुक्तांबरोबर बोलते तेव्हा प्लीज सत्ताधाऱ्यांना हमेशा बोलायला टाईम आहेच. आणि ते त्यांचे करणारे जे आहे त्यांची त्यांची डाऊन होत आहे. सर आम्हाला लिज विरोधांना आली. जेव्हा प्रॉब्लेम सॉल्व्ह करण्यासाठी आम्हाला बोलायला वेळ द्यावा आम्ही जेव्हा बोलत असु तेव्हा मध्ये कोणी बोलु नका आणि जर करायचे असेल तर आपल्या कॅबीनमध्ये मिटींग घेत जा. आम्हाला मिटींगमध्ये काही इंट्रेस्ट नाही. आपण बोला साहेब मॅडम मी पहिलाच सांगितल मी टाईम घेतलेला आहे. पर्सनल नाही महासभेचा ठराव आहे.

प्रशांत दळवी :-

सत्ताधाऱ्यांनी बोलु नये आम्हाला हे शिकवता का. सत्ताधाऱ्यांनी बोलु नये हे आम्हाला शिकवतील का.

दिप्ती भट्ट :-

आज तुम्हाला उत्तर द्याव लागेल मी सचिवांना विचारलेले आहे.

(सभागृहात गोंधळ)

प्र. नगरसचिव :-

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो महासभेमध्ये किंवा स्थायी समितीमध्ये किंवा कुठल्याही प्रभाग समिती असो किंवा कुठल्याही समितीमध्ये जे कोणतेही ठराव होतात. ते ठराव नगरसचिव विभागामार्फत मा. आयुक्त यांचे दालन संबंधित विभागास ते ठराव पाठविण्यात येतात. त्यानंतर त्या ठरावांवर संबंधित विभाग कार्यवाही करतात.

दिप्ती भट्ट :-

त्याला खुप मान्यता आहे ना.

प्र. नगरसचिव :-

मान्यता ही सभागृहातच मिळालेली असते.

दिप्ती भट्ट :-

सचिवांनी सभागृहात हा ठराव वाचावा.

(सभागृहात गोंधळ)

दिप्ती भट्ट :-

मला सचिवांनी एक उत्तर द्यायचे आहे. आपल्याकडे २००६ ठराव आपल्याकडे असेल. ठराव नं. ७९ च्या ठरावामध्ये आपण काय नमुद केलेले आहे. त्याच्यात कोणाला बोलवायचे कोणाला नाही बोलावयाचे तो ठराव काय आहे त्याचे नवीन काय आहे.

प्र. नगरसचिव :-

दि. २०/०१/२००६ मिरा भाईंदर महानगरपालिकेचे विकास कामांची भुमीपुजन, उद्‌घाटन, समारंभाचे नाव फलक नियमाप्रमाणे पत्रिकेबाबत धोरण निश्चित करणे हा विषय आहे.

दिप्ती भट्ट :-

हा विषय आहे त्याच्यामध्ये स्थायी समिती तुम्ही बोलले स्थायी समितीचा ठराव तुम्ही मान्य करत आहे. दि. २२/०१/२००४ ठराव क्र. १९२ त्याच्यामध्ये महापौर, उपमहापौर, आयुक्त, सभापती, सभागृह नेता, विरोधी पक्षनेता आता ते ठराव बोलले. जे सत्ताधारी आता जे बोलले तेच त्याच्यामध्ये लिहीलेले आहे. सेम आहे. मग आज ह्या ठरावाचे जेव्हा ओपनींग करायचा नियम कुठला आहे. काय आहे, कोणाला बोलवायचं. हा विषय आपण घेतलेला होता. आयुक्तांना मी आता एक पत्र दिलेले आहे. सेक्टर ५ मध्ये मी तिथली नगरसेविका आहे मग काल तिथे ओपनिंग कोणी केल? प्रशासनाला एवढी घाई का होती ओपनिंग करायची. मी प्रशासनाला विचारते आयुक्तांना विचारते की काल ओपनिंग करायची घाई हा होती?

अश्विन कासोदरिया :-

महापौर निधी हमारा निधी वहाँ पे हमने लगाया जो हमारा निधीसे लगाया नगरसेवक निधी से लगाया आमदारजी की गाडी रेडी था इलेक्शन की वजह से बारीश के वजह से ओपनिंग नही हुआ था। उसको हमने नगरसेवक निधी से काम किया था जनता के लिए हमने खुला किया है। प्रशासन ने प्रोग्रॅम लगाया था। एक स्थानिक नगरसेवक के नाते मैंने लगाया था इनको भी बुलाया था, वह नही आए उसमें हमारा कोई दोष नही।

मा. महापौर :-

आपका ठराव होगा तो आप बोलीए।

(सभागृहात गोंधळ)

मा. महापौर :-

यह विशेष महासभा है। उनका मैंने सुन लिया उनका भी आपको जवाब मिल गया है। अगर आपका ठराव होगा तो आप दिजीए।

दिप्ती भट्ट :-

मी आयुक्त साहेबांना विचारत आहे.

(सभागृहात गोंधळ)

निलम ढवण :-

महापौर मॅडम याच्यापूर्वी ठरावात विविध ठराव केलेले होते. एक करोडच्या वरती ज्या इमारती बांधलेल्या आहेत त्यावर सगळ्या नगरसेवकांची नावांची पाटी लावणे. तेही कुठे इम्प्लीमेन्टेशन झालेले नाही आहे. फक्त ठराव करायचे, आपली नावे कशी येतील एवढे फक्त बघायचे ह्या अर्थाने ठराव वाचला गेला. ह्या सभागृहाला विरोधी पक्षनेत्याची गरज नाही का? विरोधी पक्षनेता इथे द्यायच नाही आहे का? तो ठराव केला त्याच्यात कुठेही विरोधी पक्षाचे नाव नाही आहे.

मा. उपमहापौर :-

त्या ठरावात काही जणांचे नाव आहेत.

दिप्ती भट्ट :-

आयुक्तांनी प्लीज उत्तर देण्यांत यावे.

मा. उपमहापौर :-

ताई आता वाचला त्याच्यात मेन्शन केलेले आहे.

दिप्ती भट्ट :-

आयुक्तांनी उत्तर देण्यांत यावे.

निलम ढवण :-

त्या पाट्या का नाही लागल्या मॅडम?

मा. उपमहापौर :-

विरोधी पक्षनेता त्यात नाव आहे.

(सभागृहात गोंधळ)

निलम ढवण :-

महापौर मॅडम, आयुक्त साहेबांना प्रशासन म्हणून जेवढे गोषवारे देतात त्यांनाही काही तरी अधिकार ठेवा. त्यांना ही काहीतरी बोलू द्या.

मा. महापौर :-

सगळे सदस्य बसून जा.

निलम ढवण :-

प्रश्न विचारला त्याचे उत्तर आयुक्त साहेबांना बोलावे लागेल. आयुक्त साहेबांना काही अधिकार ठेवा आता.

मा. महापौर :-

तुमचा ठराव आहे का?

हरिश्चंद्र आमगावकर :-

पैसा कुणाचा, विकासक कोण आणि नाव कोणाचे आहे त्याच्यामध्ये.

मा. उपमहापौर :-

आपण सगळे जण एकदम बोलत असाल तर आपला नेमके कुणाला काय म्हणायचे आहे. ते आम्हाला कळत नाही. जेव्हा सत्ता पक्षाकडून ठराव मांडला जातो. तुमचे म्हणणे काय आहे. एका एकाने सांगा एवढे ओरडलात आपला ठराव द्या.

निलम ढवण :-

उपहापौर साहेब एकच बोलत होती इथे याचे उत्तर तर देऊ द्या आयुक्त साहेबांना उत्तर द्यायला देत नाही.

मा. उपमहापौर :-

ताई ह्या सभागृहात आपण सिनियर आहात. आपण कामकाज करतात ह्या सभागृहामध्ये जेव्हा जेव्हा सभा लावली जाते. त्या दिवशी आपल्याला विषया व्यतिरिक्त कुठच्याही विषयावर बोलता येत नाही..........

निलम ढवण :-

बरोबर आहे.

मा. उपमहापौर :-

त्यासाठी वारंवार संधी मिळणार आहे. खुलासा पाहिजे असेल आपल्याला कुठल्या विषयाचा तर आपण निश्चितपणे तो घेऊ शकता. तो नाकारण्याचे कारण नाही पण तो ज्या दिवशी विशेष सभा आहे त्यादिवशी विशेष सभेव्यतिरिक्त दुसरे विषय कशाला काढतात.

(सभागृहात गोंधळ)

निलम ढवण :-

पहिला तिच्या प्रश्नाला उत्तर द्या.

मा. उपमहापौर :-

आयुक्त साहेब आपण दिप्ती मॅडमच्या प्रश्नाचा खुलासा करावा. सर्वांनी बसुन घ्यावे आयुक्त साहेब खुलासा करत आहेत.

दिपक खांबित :-

मा. महापौरांच्या परवानगीने उत्तर देतोय मा. महासभा दि. २०/०१/२००६ अन्वये आपण धोरण निश्चित केलेले होते तथापि ह्या धोरणानुसार आणि शासनाची जी काही परिपत्रक आहेत त्यानुसार आपल्याकडे गेल्या मागील वर्षभरापासून विचारणा होत नव्हती. त्यासाठी आम्ही हा विषय दिलेला आहे.

दिप्ती भट :-

माझा प्रश्न हा आहे की, काल जे आपण उद्घाटन केले तांत्रिक रित्या ती जागा प्रशासनाची होती.

दिपक खांबित :-

२००६ ला जो आपण ठराव करून धोरण निश्चित केले होत त्यांचा सर्रास उल्लंघण झाल्यामुळे आम्ही ही सगळी वस्तुस्थिती नमुद करून आजच्या बैठकीमध्ये हा विषय आणला आहे.

दिप्ती भट :-

साहेब मी काय बोलत आहे आपण काल ओपनिंग केले त्याच्यामध्ये गेल्या बजेटची आपण पाटी लावलेली होती. त्यांनी बोलले ही इलेक्शनच्या अगोदर आम्ही पूर्ण केले तेव्हा गिता जैन महापौर मॅडम यांचे

नाव लागलेले मी पाटी काढून आता नवीन दूसरी पाटी दोन दिवसा अगोदर लावण्यात आली ते सगळ कसे झाले आणि प्रशासनाच्या याच्यात आयुक्त आहे की आपल्याला दिलेले आहे ते जनरल फंड आहे.

निलम ढवण :-

मा. महापौर मॅडम जागेवरुन खाली आले आहेत त्याचा सगळ्या जुन्या पाट्या बदलून टाकणार का?

दिप्ती भट :-

ज्यांनी प्रोग्राम केला त्यांनी विज चोरी केली कारण की आपण महासभेमध्ये ठरावामध्ये आपण अस केलेले आहे की कोणीपण ओपनिंग केली किंवा पडल त्याला आपण तीन हजार रू. फाईन घेतो. एम आर टी पी दाखल करतो विज चोरी केली, सभा केली, माईक चालू केल यांच्यावर एम आर टी पी दाखल करा.

दिपक खांबित :-

याबाबत चौकशी करण्यात येईल.

दिप्ती भट :-

चौकशी नाही मी तुम्हाला रेकॉर्डिंग पाठविलेली आहे मी पत्र व्यवहार केलेला आहे. तुम्ही त्याच्यावर एम आर टी पी दाखल करतात यांच्यावरती का नाही? कारण सत्ताधारी आहेत आणि आज काय यांना कोणी विचारत नाही ते आताच झाले त्यांना आपण सपोट करणार..................

प्रविण पाटील :-

जरा ह्याच्यावर खुलासा करा.

प्रभात पाटील :-

मा. महापौर मॅडम ठरावाला लागून आहे.

प्रविण पाटील :-

प्रशासनामार्फत ह्या गार्डनचे उद्‌घाटन झालेले आहे की नाही ते सांगा.

मा. महापौर :-

त्यानी सांगितलेले तुम्हाला.

दिप्ती भट :-

इललिगल पाटी काढण्यात यावी प्रशासनाने जुनी जी पाटी होती ती लावण्यात यावी आणि प्रशासनाने ते प्रोग्राम तोडण्यात यावे आता ठरावामध्ये ते बोलले ते तुम्ही करा. आम्हाला मान्य आहे.

मा. महापौर :-

आता पुढचा विषय घ्या. ठराव मंजूर.

प्रकरण क्र. १० :-

मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत आयाजित करावयाचे भूमिपूजन उद्‌घाटन कार्यक्रमासाठी सुधारीत धोरण निश्चित करणेबाबत.

ठराव क्र. ०८ :-

मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत पार पाडण्यात येणाऱ्या विविध विकास कामांचे भूमीपूजन, उद्‌घाटन समारेभ तसेच विविध कार्यक्रमाकरीता महानगरपालिकेने मा. महासभा दि.२०/०१/२००६ ठराव क्र. ७९ अन्वये धोरण निश्चित केले आहे. तसेच मा. स्थायी समिती सभा दि.११/०५/२००७ ठराव क्र. २५ अन्वये खालील प्रमाणे निर्णय घेण्यात आला आहे.

"मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या कोणत्याही कार्यक्रमाची निमंत्रण पत्रिका मा. महापौर यांचे मान्यतेनंतर छपाई करण्यात यावी. तसेच कोणत्याही कार्यक्रमाकरीता (महानगरपालिकेच्या निधीतील) मंडप, स्टेज, खुर्च्या, टेबल इ. व्यवस्थेकरीता महानगरपालिकेच्या निधीतून खर्च करण्यात येऊ नये. महानगरपालिकेमार्फत काही खास कार्यक्रम करावयाचे असल्यास मा. महापौर, उप महापौर, सभागृह नेता, विरोधी पक्ष नेता, सभापती, स्थायी समिती व गटनेत्यांची बैठक घेऊन तद्‌नंतर खर्चास मा. महासभेची रीतसर मान्यता घेऊन कार्यक्रम व खर्च करण्यात यावे."

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, शासन परिपत्रक क्रमांकः- संकीर्ण २००७/प्र.क्र.९५/ २००७/नवि-२० दि.१८ ऑगस्ट २००७ अन्वये नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या कार्यक्रम/ समारंभाच्या वेळी स्थानिक खासदार, आमदार यांना विश्वासात घेऊन ते कार्यक्रमास उपस्थित राहणार किंवा कसे याची संबंधितानी खातरजमा करून घ्यावी व समारंभाच्या निमंत्रण पत्रिकेत प्रमुख उपस्थितांच्या नावाचा उल्लेख असल्यास त्यामध्ये त्यांच्या नावाचा समावेश करावा व त्यांच्या दर्जानुरूप आसन व्यवस्था करण्याबाबत योग्य ती दक्षता घेऊन सदर सुचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याबाबत संचना आहेत. तसेच दि. २७ जुलै २०१५ रोजीचे देखिल परीपत्रक शासनाने जारी केले आहे. सोबत परीपत्रकाच्या प्रती जोडल्या आहेत.

तथापी मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभागातील विकास कामांची उद्‌घाटने, भूमीपूजने ही संबधित स्थानिक सन्माननीय नगरसेवकांमार्फत प्रशासनास अथवा सन्माननीय पदाधिकाऱ्यांना माहीती न देता व रितसर मान्यता न घेता परस्पर करण्यात येत असल्याचे निदर्शनास येत आहे. नामफलक देखिल

परस्पर तयार करून बसविण्यात येत आहेत. यामुळे सर्वत्र नाराजी व्यक्त होऊन तक्रारी होत असतात. तसेच याबाबत विधी मंडळात हक्क भंगाचे प्रस्ताव सादर झाले आहेत.

मा. महासभा दि.२०/०१/२००६ ठराव क्र. ७९ व मा. स्थायी समिती सभा दि.११/०५/२००७ ठराव क्र. २५, दि.१८/०७/२००७ रोजीचे शासन परिपत्रक विचारात घेऊन नव्याने धोरण निश्चित होऊन त्याची काटेकोरपणे अमंलबजावणी करणेसाठी मा. महासभा दि.२९/०९/२०१६ मध्ये प्रस्ताव ठेवला असता मा. महासभेने ठराव क्र. ७३ अन्वये धोरण निश्चित करण्यासाठी विषय फेर सादर करावा असा निर्णय घेतला आहे.

वरील वस्तुस्थिती व मा. महासभेचे धोरण, शासन परीपत्रक पहाता नव्याने धोरण निश्चित होणेस व त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करणेसाठी निर्णय घेण्यासाठी आयुक्त यांनी प्रस्ताव सादर केला आहे. सदर प्रस्तावाच्या अनुशंगाने खालील निर्णय ठरावाद्वारे घेण्यात येत आहेत.

<u>ठराव</u>

१) यापुर्वी निर्णय घेण्यात आलेल्या मा. महासभा दि.२०/०१/२००६ ठराव क्र.७९ व मा. स्थायी समिती सभा दि.११/०५/२००७ ठराव क्र.२५ रद्द करण्यात येत आहे.
२) रु.१.०० कोटी रकमेच्या वरील कामांची (कोणत्याही इमारती व वास्तू वगळून) भुमीपुजने व उद्‌घाटने मा. महापौर यांच्या मंजुरीने तसेच मा. महापौर यांच्याकडून पाहुण्यांची नावे व निमंत्रण पत्रिकेचा मजकुर अंतिम करुनच कार्यक्रम करण्याची दक्षता घेण्यात यावी. तसेच विशेष बाब म्हणून एखाद्या कार्यक्रमाचे उद्‌घाटन मा. महापौरांनी कळविल्यास ते काम त्यांच्या परवानगीशिवाय करु नये.
३) रु.५.०० कोटी रकमेच्या वरील कामाच्या कार्यक्रमासाठी मा. महापौर यांनी सुचविलेल्या पाहुण्यांना बोलविण्यात यावे, सदर कार्यक्रमामध्ये महानगरपालिकेचे पदाधिकारी, स्थानिक विधानसभा सदस्य, स्थानिक खासदार यांना निमंत्रित करण्यात यावे.
४) आमदार, खासदार निधीतील कामांची उद्‌घाटने, भुमीपुजन व नामफलक त्यांच्या शिफारसीनुसार तयार करण्यात यावेत. त्यावर मा. महापौराचे, आयुक्तांचे नाव असणे बंधनकारक राहील.
५) महानगरपालिकेच्या इतर कोणत्याही निधितील कामाच्या नामफलकावर मा. महापौर, मा.आयुक्त, स्थानिक प्रभाग समिती अध्यक्ष, सभागृह नेता, विरोधी पक्ष नेता, सभापती, स्थायी समिती विभागाचे अधिकारी व कंत्राटदारासह यांचे प्रभागातील चार स्थानिक नगरसेवकांचे नाव असणे बंधनकारक राहील.
६) विकास कामांचे उद्‌घाटन, भुमीपुजनासाठी तयार केलेल्या वरील धोरणा व्यतिरिक्त कोणत्याही लोकप्रतिनिधीनी परस्पर उद्‌घाटने, भुमीपुजने करू नये याबाबत स्पष्ट ताकीद देण्यात यावी व परस्पर कार्यक्रम केल्यास कायदेशीर कारवाई करून नामफलक देखिल काढून टाकण्यात यावेत.

वरील निर्णयाची प्रशासनाने काटेकोर अंमलबजावणी करावी.

सुचक :- श्री. रवि व्यास अनुमोदक :- श्रीम. रिटा शाह

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

**प्र. नगरसचिव :-**

**प्रकरण क्र. ११,** भाईंदर (पू.) आरक्षण क्र. ११९ या जागेवरील क्रिडा संकुलाच्या नामकरणाबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

**प्रशांत दळवी :-**

मिरा भाईदर महानगरपालिका क्षेत्रात भाईदर (पूर्व) आरक्षण क्र.119 मध्ये बांधण्यात आलेल्या क्रिडासंकुलास मा.स्थायी समिती सभा दि.21/08/2014 ठराव क्र.70 अन्वये लोकनेते स्व.गोपीनाथ मुंडे असे नामकरण करण्याबाबत निर्णय घेतला आहे. सदर नामकरण करण्याचा अधिकार हा मा.महासभेचा आहे. मा.स्थायी समिती सभा दि.२१/०८/२०१४ ठराव क्र.७० अन्वये देण्यात आलेल्या नामकरणास अंतीम मान्यता देणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेण्यासाठी प्रस्ताव मा.आयुक्त यांनी सादर केला आहे. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने खालील निर्णय ठरावाद्वारे घेण्यात येत आहे.

<u>ठराव</u>

भाईदर (पूर्व) आरक्षण क्र.119 या जागेत बांधलेल्या क्रिडा संकुलास "लोकनेते स्व. गोपीनाथ मुंडे क्रिडा संकुल" असे नामकरण करण्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसुची "ड" मधील प्रकरण 11(2) अन्वये मान्यता देण्यात येत आहे.

**अश्विन कासोदरिया :-**

माझे अनुमोदन आहे.

स्नेहा पांडे :-

मा. महापौर मॅडम कमिशनर साहबसे मेरा यह प्रश्न है की इस गोषवारेमे यह लिखा गया है की शासनका परिपत्रक साथमे जोड रहे है। लेकीन गोषवारे के साथ परिपत्रक आया नही है। कुछ सदस्य यहा पे नये है। जो पिछले टर्म मे नही थे तो शासनका परिपत्रक या पिछले टर्म में क्या ठराव हूवा था यह हम लोगोको जानकारी नही है इसलिए इसकी जानकारी के लिए मुझे शासनका परिपत्रक चाहिए। कहा है साथ में परिपत्रक? ऐसा गोषवारेमे कुछ भी विषय आता है और परिपत्रक साथमे आता नही तो हम कैसे समझे की क्या शासन का परिपत्रक है।

मा. महापौर :-

ठिक है।

स्नेहा पांडे :-

ठिक है मॅडम इसका सोल्युशन कुछ है की आप...........

हरिश्चंद्र आमगावकर :-

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो मॅडम, ह्या क्रिडा संकुलाला माझा वॉर्ड क्र. जुना १३ आणि आता नविन १० ह्या वॉर्डचे चारही नगरसेवक आम्ही असताना मी पहिलाही नगरसेवक असताना हा ठराव २५/०७/२०१४ ला मी नामकरणाचे लेटर दिलेले होते आणि आमचे मित्र प्रशांत दळवी यांनी त्यांच्या याच्यामध्ये स्थायी समितीमध्ये विषय आला आणि मुंडे साहेबांच्या बद्दल आम्हाला आदर आहे पण आमच्या वॉर्डचे असल्याकारणाने मी ह्या स्पोर्ट कॉम्पलेक्सला पहिले दिले असताना मिटींग झाली होती. एक महिना आधी पहिले पत्र दिलेले आहे आणि त्याच्यानंतर त्या स्पोर्ट कॉम्पलेक्सला धर्मविर आनंद दिघे क्रिडा संकुल असे नाव द्यायची मी मागणी केलेली आहे. आणि त्याच्यानंतर ह्यांनी तो ठराव स्टँडिंगला आणला. स्टँडिंगचा अधिकार नसताना माझे म्हणणे आहे की त्या स्पोर्ट कॉम्पलेक्सला क्रिडा संकुलाला जे नाव आहे स्वर्गीय धर्मविर आनंद दिघे क्रिडा संकुल असे नाव द्यावे. असा माझा त्याच्यात ठराव आहे.

प्रविण पाटील :-

कुठल्याही वास्तुला नाव देण्यासाठी एक ठराव असतो. आपण एक ठराव दिलेला आहे. कुठल्या वास्तुला नाव देण्यासाठी त्याच्यामध्ये असा ठराव होता की ज्याचे पत्र पहिला येईल ज्या वास्तुला त्याला त्या वास्तुला नाव द्यायचे स्थानिक नगरसेवकांनी.

वर्षा भानुशाली :-

असा कुठे उल्लेख नाही.

प्रविण पाटील :-

आहे ठरावामध्ये आहे. खांबित साहेबांना विचारा.

(सभागृहात गोंधळ)

प्रविण पाटील :-

ज्यांची पहिली मागणी असेल ते नाव मंजूर केले जाते.

सुरेश खंडेलवाल :-

आजच सर्व मिरा भाईंदरचे सर्वांनी मागणी करुन टाकतो असे नसते.

(सभागृहात गोंधळ)

मा. उपमहापौर :-

मागच्या स्थायी समितीमध्ये हा ठराव झालेला आहे. तुमची मागणी आहे ती आम्ही मानतो. मागच्या स्थायी समितीमध्ये हा ठराव झालेला आहे. सर्व गोष्टीमध्ये एक नियोजीतपणा यावा म्हणून ह्या महासभेपुढे हा ठराव आणलेला आहे. तुम्ही पत्र दिले आहे. तुम्ही मागणी केलेली आहे. आम्ही मानतो.

प्रविण पाटील :-

उपमहापौर साहेब, स्थायी समितीला कुठलाही अधिकार नाही नावे कमी करण्याचा व नावे देण्याचा. हा महासभेचा अधिकार आहे. तो फक्त ज्यांनी मागणी केलेली आहे तो मंजुर करण्याचा अधिकार महासभेला आहे.

मा. उपमहापौर :-

तुमच्या वक्त्व्यातुन एक गोष्ट अशी दिसली की तुम्ही म्हणाले की ज्यांची पहिली मागणी त्यांचे नाव देणार अस मला वाटत नाही........

प्रविण पाटील :-

स्थानिक नगरसेवकांनी मागणी केलेली आहे. महासभेला मंजुरी देण्याचा अधिकार आहे. मागणी नगरसेवकांनी केलेली आहे.

दिपक खांबित :-

महापौरांच्या परवानगीने बोलतो, आम्ही आपण काय करायचो की स्थायीमध्ये विषय घ्यायचो. स्थायीची शिफारस घेऊन नंतर महासभेमध्ये यायचे. आणि महासभेमध्ये येताना महासभेमध्ये जे काही पत्र

असतील आपण ते सगळे ठेवायचो. ज्याचे पहिले दिले ते आपण घ्यायचो नाही. चार नावांनी चार घ्यायचो आणि महासभा अंतीम करायची.

हरिश्चंद्र आमगावकर :-

मागच्या वेळी शासनाचे आधिचे पत्र असेल.

सुरेश खंडेलवाल :-

तुम्ही उपमहापौर असताना तुम्ही स्थायी समिती सभापती असताना मी तुम्हाला पत्र दाखवितो. मी माझे प्रभागामध्ये पहिल पत्र दिले तुम्ही सत्ताधारी असताना तुम्ही वगळून दुसरं नाव दिलेले आहे. तुम्हाला पाहिजे असेल तर दोघांची प्रत देतो. हे ठराव महासभेचा अधिकार आहे हे महासभेमध्ये आणलेले आहे..........

मा. महापौर :-

तुमचा ठराव आहे का?

प्रविण पाटील :-

स्थानिक नगरसेवकांनी मागणी केलेली होती. आणि तुमच्या स्थायी समितीच्या सभेमध्ये मंजूर व्हायच्या अगोदरचे ते पत्र आहे.

हरिश्चंद्र आमगावकर :-

हा ठराव कधी झाला आणि मागणी कधी केलेली आहे. आमच्या प्रभागामध्ये आम्ही मागणी केलेली आहे आम्हाला त्याचे नाव पाहिजे.

प्रविण पाटील :-

मागणी करायचे अधिकार पहिले झालेले आहे. आम्ही मागणी केलेली आहे. नाहीतर महासभेमध्ये ह्या शहराची सगळी नावे चेंज केली जातील. हे लक्षात ठेवा महासभेचा जर अधिकार असेल आम्ही मान्य करतो. मग ह्या शहरामध्ये कुठल्याही वास्तुची मागणी केली उद्या तुम्ही मंजूर करणार.

सुरेश खंडेलवाल :-

स्थायी समितीचा जो ठराव आहे त्यात तुमची सही आहे. तेव्हा तुम्ही उचलल नाही मला सांगा स्थायी समितीमध्ये जो ठराव झालेला आहे त्याच्यामध्ये तुम्ही होते, तुमची सही आहे. तेव्हा तुम्ही कशाला बोलले नाही आता तुम्ही विरोधात कसे आले.

मा. महापौर :-

सुरेश खंडेलवालजी आप बैठ जाईए।

प्रशांत दळवी :-

महापौर मॅडम, स्टॅन्डिंग कमिटी असताना आमचे मित्र पक्षाचे नगरसेवकही त्या स्टॅन्डिंग कमिटीमध्ये होते, त्यावेळेला आम्ही युतीमध्ये होतो. त्यावेळेला माजी नगरसेवक श्री. शरद पाटील हे सभापती होते. महापौर मॅडम त्यावेळेला मी मित्र पक्षामध्ये असताना हा ठराव सर्वानुमते पास करण्यांत आलेला आहे. त्यावेळेला कोणी ऑब्जेक्शन घेतले नाही. याच्या अगोदर ते पत्र होत का? याच्या अगोदर ते पत्र होते तेव्हा त्यांनी का ऑब्जेक्शन घेतले नाही. हा दि. १६/०८/२०१४ ला ठराव केला. मग त्यावेळेला सर्वानुमते पास झाला.

मा. महापौर :-

तुमचा ठराव असेल तर तुम्ही द्या.

सुरेश खंडेलवाल :-

मॅडम ठराव मंजूर करुन पुढचा विषय घ्या.

मा. महापौर :-

तुमचा ठराव असेल तर द्या नाहीतर मी ठराव मंजूर करते.

प्रविण पाटील :-

नगरसेवकांचे पत्र दिल्यावर तुम्ही रितसर करता की नाही.

मा. महापौर :-

ते सभा डिसाईड करणार.

प्रविण पाटील :-

आम्ही पहिली मागणी केलेली आहे. आमच्या नगरसेवकांची मागणी आहे. आमची सर्वप्रथम मागणी आहे.

जयंतीलाल पाटील :-

सर्वप्रथम लेटर आम्ही टाकलेले आहे. आमचा प्रभाग आहे.

हरिश्चंद्र आमगावकर :-

आमची वास्तु ज्या एरियात आहे ती वास्तुला आम्ही नाव मागतो.

ध्रुवकिशोर पाटील :-

कोणत्याही वास्तुला नाव दिल्यानंतर तो विषय स्थायी समितीमध्ये येतो आणि स्थायी समितीमार्फत तो विषय महासभेला येतो.

प्रविण पाटील :-

नामकरणाचा विषय स्थायी समितीमध्ये येत नाही.

ध्रुवकिशोर पाटील :-

तो विषय स्थायी समितीमध्ये पास केलेला आहे. तो विषय महासभेला आलेला आहे. ठराव झालेला आहे. तर माझी आपणांस विनंती आहे तो ठराव मंजूर करा अन्यथा जर याचा ठराव असेल तर त्या ठरावावर अनुमोदन टाका.

मा. महापौर :-

तुमचा ठराव असेल तर तो ठराव द्या.

प्रविण पाटील :-

महापालिकेचे नावे देण्याचे धोरण जे आहे ते आम्हाला वाचून दाखवा.

ध्रुवकिशोर पाटील :-

महापौर मॅडम ठराव झालेला आहे. कृपया आपण वेळ अमुल्य आहे वेळ वेस्ट करु नका.

(सभागृहात गोंधळ)

मा. महापौर :-

ठराव मंजूर पुढचा विषय घ्या. सचिव महोदय पुढचा विषय घ्या.

मा. उपमहापौर :-

खांबित साहेबांनी तुम्हाला आता माहिती दिली ती तुम्ही ऐकली. हे अधिकार महासभेचे आहेत...........

(सभागृहात गोंधळ)

निलम ढवण :-

महापौर मॅडम मला एका प्रश्नाचे उत्तर द्या. ह्या महासभेमध्ये ही आता पहिलीच आहे याच्यापुढे पण ह्या घटना घडतच राहणार आहेत. पण आपण आताच जाहिर कराव्यात की जे पूर्वी तेव्हा आम्ही तुमच्याबरोबर होतो आता विरोधात आहोत. मग जेव्हा पूर्वी आम्ही एकत्र होतो ज्या-ज्या वेळी आम्ही कामे केलेली आहेत. ती सगळी कामे अशा महासभेमध्ये विषय घेऊन तुम्ही ती रद्द करणार आहात का? आताच सांगा याच्यापुढे आम्ही विषय देणार नाही. आम्ही इथे बसणार पण नाही वेळोवेळी असे विषय येत असतील तर ते चुकीचे आहे. महापौर मॅडम आपण उत्तर द्या. तुम्ही मला मी विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर द्या असे घडणार असेल तर इथे आम्ही नगरसेवक उपस्थित राहणार नाहीत. आणि दाद कशी मागायची ती आम्ही मागु.

मा. महापौर :-

ठराव मंजूर हो गया है।

निलम ढवण :-

ठराव कसा मंजूर होणार.

(सभागृहात गोंधळ)

मा. महापौर :-

तुम्ही बसून घ्या. सचिव पुढचा विषय घ्या.

प्र. नगरसचिव :-

पुढचा विषय आहे तुम्ही महापौर मॅडमशी बोलावे.

निलम ढवण :-

तुम्ही कसे विषय घेणार पुढचा तुम्ही बसा आम्हाला याचे उत्तर देऊ देत.

ध्रुवकिशोर पाटील :-

सचिव साहेब तुम्हाला महापौरांनी सांगितलेले आहे तुम्ही पुढचा विषय घ्या.

निलम ढवण :-

नाही तुम्ही जाहिर करणार आहात जाहिर करा ना तुम्ही जाहिर करावे आम्ही इथे बसत नाही. आम्ही निघून जातो. अशीच मनमानी चालणार असेल तर आम्ही इथे बसत नाही.

(सभागृहात गोंधळ)

प्रविण पाटील :-

मागणीनुसार तुमच्या धोरणामध्ये लिहीलेले आहे. नागरिकांच्या, नगरसेवकांच्या मागणीनुसार नावे द्या असे धोरण आहे. तुम्ही दाखवा खुलासा जो आहे तो त्यांनी दिलेला आहे. पूर्ण खुलासा द्या. उद्या महासभेमध्ये तुम्ही पूर्ण शहराची नावे बदलाल.

सुरेश खंडेलवाल :-

पहिलाच विषय झालेला आहे. आपण दिलेले नाव बदल नाही करणार असे तुम्ही............

(सभागृहात गोंधळ)

मा. महापौर :-

खांबित साहेबांनी आपल्याला खुलासा दिलेला आहे.

सुरेश खंडेलवाल :-

पुढचा विषय घ्या.

प्रविण पाटील :-

त्यांनी अर्धवट खुलासा दिलेला आहे.

निलम ढवण :-

महापौर मॅडम, सहीनुसार निर्णय घेऊ नका. महापौर मॅडम पहिला सुरुवातीच्या भाषणात तुम्ही हेच बोललात. आमचे पूर्ण सहकार्य असेल परंतु जर मागच्या वेळचे सर्व विषय असे महासभा घेऊन मेजोरीटीच्या जोरावर तुम्ही हे रद्द करणार असाल तर आम्ही ते कदापी खपवून घेणार नाही.

(सभागृहात गोंधळ)

मा. महापौर :-

खांबित साहेब खुलासा देत आहेत बसुन जा.

मा. उपमहापौर :-

खांबित साहेब सदस्य जागेवर बसल्याशिवाय खुलासाला सुरुवात करु नका. सदस्यांना विनंती आहे जागेवर बसून जा.

सुरेश खंडेलवाल :-

मॅडम यांचा विषय असा आहे की पत्र दिल की नाव झाल असे नसते. हा महासभेचा अधिकार आहे.

मा. उपमहापौर :-

आपआपल्या मागणीनुसार तुमची जी भुमिका आहे तुम्ही जी मांडत आहेत. त्या विषयात धोरण ठरलेले आहे. तर ते धोरण कुठे आहे ते दाखवा. आमगावकर साहेब आपण मागणी केलेली आहे. म्हणजे ते मंजूर केला पाहिजे अशातला भाग नाही. आपण मागणी केलेली आहे.

मा. महापौर :-

आपने खाली मागणी किया है।

सुरेश खंडेलवाल :-

महापौर मॅडम हे सभागृहाचा अमुल्य वेळ वाया घालवत आहेत तुम्ही पुढचा विषय घ्या.

(सभागृहात गोंधळ)

मा. उपमहापौर :-

महापौरांना ज्या पध्दतीने निवडून आणले त्याच पध्दतीने उपमहापौरांना निवडून आणलेले आहे. हे उपविधी काय सांगते ते माहिती आहे का ते बघा आधी मग बोला.

मा. महापौर :-

सगळे सदस्य बसून जा.

मा. उपमहापौर :-

ठराव मंजूर नसेल तर तुमचा ठराव मांडा. लोकांनी तुम्हाला बहूमत दिल नाही ते आमची चुक नाही. लोकांनी बहुमत आम्हाला दिलेले आहे. आम्हाला बहुमत दिले त्याचा आदर करा. लोकांनी आम्हाला स्विकारलेले आहे.

(सभागृहात गोंधळ)

सुरेश खंडेलवाल :-

महापौर मॅडम पुढचा विषय घ्या.

मा. महापौर :-

ठराव असेल तर तुमचा ठराव बोला. ठराव वाचून झालेला आहे ठराव मंजूर पुढचा विषय घ्या.

सुरेश खंडेलवाल :-

सचिव साहेब पुढचा विषय घ्या.

मा. महापौर :-

सचिव साहेब पुढचा विषय घ्या. तुमचा ठराव असेल तर ठराव मांडा.

मा. उपमहापौर :-

आम्ही कोणाला विरोध करत नाही. ते आम्ही नंतर ठरवू. तुमचा ठराव मांडा.

मा. महापौर :-

ठराव मांडा आणि बसून जा.

सुरेश खंडेलवाल :-

महापौर मॅडम हे फक्त वेळ घालवत आहेत याच्यामध्ये काही अर्थ नाही.

मा. महापौर :-

सचिव साहेब पुढचा विषय घ्या.

(सभागृहात गोंधळ)
सुरेश खंडेलवाल :-

शिरवळकर साहेब महापौरांच्या परवानगीने पुढचा विषय घ्या.

ध्रुवकिशोर पाटील :-

सचिव साहेब प्रकरण क्र. १२ अवलोकनचा विषय असल्यामुळे ठराव होऊ शकत नाही. नेक्स्ट विषय घ्या.

मा. महापौर :-

सचिव साहेब पुढचा विषय घ्या.

(सभागृहात गोंधळ)
मा. उपमहापौर :-

तुम्हाला ठराव मांडायचा आहे का संधी देत आहे. ठराव मांडायचा असेल तर मांडा. आपआपल्या जागेवर बसा.

मा. महापौर :-

ठराव का टाईम आपको दिया है। आप ठराव मांडीए।

(सभागृहात गोंधळ)
प्र. नगरसचिव :-

प्रकरण क्र. ११ चे वाचन मगाशी मी केलेले होते. पुन्हा एकदा करतो. प्रकरण क्र. ११, भाईंदर (पू.) आरक्षण क्र. ११९ या जागेवरील क्रिडा संकुलाच्या नामकरणाबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

जयंतीलाल पाटील :-

ठराव मांडण्याच्या आधी मला एक शब्द बोलू द्या. माझे मित्र श्री. प्रशांत दळवी साहेब यांनी सांगाव आनंद दिघेच्या नावावर यांचा विरोध आहे हा विषय आहे. प्रशांत दळवी साहेब तुमचा विरोध आहे का?

प्रशांत दळवी :-

महापौर मॅडम ह्या सभागृहामध्ये विषयाचे विषयांतर होत आहे. ह्या सभागृहामध्ये सभागृहाची दिशाभूल करण्यांत येत आहे. आम्ही कोणाचे दिलेले नाव काढत नाही आहोत. आम्ही कोणाचे दिलेले नाव काढलेले नाही. ह्या सभागृहापूढे नाव देणेकरिता ठराव आलेला आहे. आणि त्यावेळेला स्वतः सभागृहात होतो. त्यावेळेला मान्यता दिलेली आहे ना. तेव्हा आमचे तीन सदस्य होते. त्यावेळेला आम्ही पत्र दिलेले आहे.

निलम ढवण :-

महापौर मॅडम, फक्त एक प्रश्नाचे उत्तर द्या की आताचे जे प्रकरण आहे त्याच्यात तुम्ही प्रत्येकाने उत्तर दिले. स्टॅन्डिंगला मान्य झाले आहे. किंवा बाकीच्या काही गोष्टी झालेल्या नाहीत. मग ह्या पुढे पण विषय येतील त्यामध्ये पण तुम्ही हिच काळजी घ्या. जर स्टॅन्डिंगला विषय मान्य झाले असतील तर पुढच्या ठरावात ते येता कामा नये. येतील का? की प्रत्येक प्रकरणासाठी वेगळे नियम राहणार? तुम्ही सोयीनुसार प्रत्येक ठरावामध्ये तुम्ही विषय घेणार आहात. जे स्टॅन्डिंगला पास झाले असतील.

मा. महापौर :-

विषय प्रशासन का है ठराव।

निलम ढवण :-

जेव्हा येईल तेव्हा मी त्यावेळी विचारेल त्यावेळी मी तुमच्या निदर्शनास आणून देईन. म्हणून सोयीनुसार कुठच्या गोष्टी करु नका तुम्हाला विनंती आहे. तुम्ही महिला महापौर आहात. प्रत्येक शहराच्या विकासाचा आणि बाकीच्याही गोष्टींच्या बाबतीत जागरुकपणे तुम्ही विचार करा आणि प्रथमतः तुम्ही आम्हाला उत्तर देत जा. महापौर म्हणून फक्त ठरावाच्या मागे पडू नका मॅडम.

मा. महापौर :-

आपको सब आन्सर का जवाब मिल चुका है अगर आपको पास ठराव है तो आप ठराव पढीए। नाही तर पुढचा विषय घ्या.

प्रविण पाटील :-

महापौर मॅडम पुन्हा-पुन्हा तोच विषय येत आहे............

जयंतीलाल पाटील :-

थोडे मोठेपण दाखविले असते ना आनंद दिघे तिकडे नाव द्यायचे तर एवढा विषय झालाच नसता. ठराव मांडायची काही तुम्हाला गरज नसती. हा ठराव मांडत आहेत तुमचा विरोध आहे. प्रत्येक गोष्टीत तुम्ही जर असेच वागत असाल तर ते योग्य नसणार. आयुक्त साहेबांना पण मी विनंती करतो धर्मवीर आनंद दिघे साहेबांना विरोध करु नका.

प्रशांत दळवी :-

मी परत सांगतो महापौर मॅडम आनंद दिघे साहेबांच नावाला विरोध करत नाही आहे. ही पक्षाची भुमिका आहे ती मी मांडली.

जयंतीलाल पाटील :-

स्वतःला कट्टर मानणारे जर असे वागत असतील तर ते योग्य नसणार. सत्तेचा माज जास्त नसावा.

प्रविण पाटील :-

महापौर मॅडम यापुढेही असे बरेच नामकरणाचे विषय आलेले आहेत. बरेच वाद झालेले आहेत. महापालिकेने निश्चित धोरण ठरवलेले आहे. नामकरणाबद्दल नेमके काय धोरण असावे हे महानगरपालिकेला आहे. त्याच्यामध्ये खांबित साहेबांना अपुरी माहिती दिलेली आहे. त्याच्यामध्ये असे लिहीलेले आहे नागरिकांच्या मागणीनुसार स्थानिक नगरसेवकांच्या मागणीनुसार तिथे नाव देण्यांत यावे ज्याची पहिली मागणी असेल ते त्याप्रमाणे महासभेला असा अधिकार दिलेला आहे ते नाव डिक्लेर करावे. महासभेमध्ये ते नाव जाहिर करावे असे आहे. मागणी ज्याची पहिली असेल ते नाव जाहिर करावे. इथे ठरविण्याचे काम नाही आहे. ठरविलेले पहिलेच असते मागणी असते त्यांचे हे धोरण प्रशासनाने परत जाहिर करावे आणि परिपूर्ण खांबित साहेब खोट बोलू नका. जे असेल ते खरीखुरी माहिती द्या.

दिपक खांबित :-

धोरण असे आहे धोरण वगैरे काही नाही फक्त जे नाव दिलेल असेल आधी ते बदलु नये असा निर्णय झालेला आहे.

प्रविण पाटील :-

नाव बदलण्याचा विषय नाही नाव देण्याचा विषय आहे.

दिपक खांबित :-

यापूर्वी दिलेले कुठलेही नाव बदलण्यात येऊ नये. आपण जी डबल डबल नावे दिलेली होती ती पुन्हा आणून एकदा करेक्ट केली.

प्रविण पाटील :-

स्थानिक नगरसेवकांनी जर प्रथम मागणी केली असेल तर त्याला काही अर्थ आहे की नाही त्याचा तुम्ही काय विचार करणार.

दिपक खांबित :-

अधिकार महासभेचा आहे.

प्रविण पाटील :-

महासभेत ते नाव जाहिर करायचा अधिकार आहे ना.

दिपक खांबित :-

कुठल नाव द्यायचा अधिकार महासभेचा आहे. आम्ही महासभेमध्ये ४-४ वेळा शिफारस केलेल्या आहेत की ह्या रस्त्यालाही चार नावे आलेली आहेत हे चार नावे आली आहेत महासभेची..............

प्रविण पाटील :-

प्रथम जी मागणी करेल त्याला काही अर्थ नाही का?

मा. महापौर :-

आपको समय दिया था आपका ठराव होगा तो मांडीए।

प्रविण पाटील :-

तुम्ही केलेला विषय बेकायदेशीर आहे.

ध्रुवकिशोर पाटील :-

तुम्ही नावासाठी भांडता पण तुम्हाला आठवत का ही जी वास्तु आहे ह्या वास्तुचे भुमीपुजन ह्या वास्तुची सुरुवात कोणी केली तुम्ही त्याचे नावच घेत नाही.

प्रविण पाटील :-

आमच्या ठरावात ते पण नाव आहे.

ध्रुवकिशोर पाटील :-

विरोधी पक्षाने त्यांचा ठराव मांडला नाही तर आमचा ठराव आम्ही कायम करतो.

निलम ढवण :-

ध्रुवकिशोरजी त्यांचे नाव द्यायला म्हणत आहेत तेव्हा संजीव नाईक साहेबांनी जेव्हा तिथे उद्घाटन केले तेव्हा भगवती शर्माने देखील तेव्हा नाव दिलेले होते. भगवती शर्माने पण डबल नाव दिलेले होते. म्हणजे जेव्हा नावे दिलेली होती त्यावेळी ते लेटर दिले होत. मग हे काय तुमच बदला बदल चालु आहे.

नयना म्हात्रे :-

महापौर मॅडम २५ वर्षापासून मिरा भाईंदर महापालिकेमध्ये सभा लागतात. २५-२६ वर्ष जास्त झाली पण याच्यापुढे देखील अशा सत्तेवर ठराव मंजूर झाले आहेत. दोन्ही ठिकाणी ठराव वाचले जातात. ज्याची सत्ता त्याचा ठराव मंजूर होतो. तुम्ही पण ठराव मांडतात आम्ही पण मांडतो. ज्याचा बहुसंख्येने ठराव मंजूर होईल कशाला एवढे नाटक पाहिजे. हे का सभागृह नविन आहे का.

निलम ढवण :-

नयना मॅडम सभागृहात सत्तेचा वापर करावा. जी झालेली कामे आहेत आपण पुन्हा नव्याने घेऊन त्याचे ठराव नाही तयार करता येत...............

नयना म्हात्रे :-

तुम्ही तुमचा ठराव मांडा.

(सभागृहात गोंधळ)

हरिश्चंद्र आमगावकर :-

प्रकरण क्र. ११ भाईंदर (पूर्व) आरक्षण क्र. ११९ या जागेतील क्रिडा संकुल मा. खासदार संजीव नाईक यांच्या खासदार निधीमधुन बांधण्यात आले आहे. त्याचप्रमाणे त्याचे उद्‌घाटनही करुन कॅरम स्पर्धा व इतर स्पर्धा ह्या क्रिडा संकुलामध्ये घेण्यात आलेल्या आहेत. सदर क्रिडासंकुल ज्या प्रभागात आहे येथील स्थानिक नगरसेवकांनी दि. २५/०७/२०१४ रोजी ''धर्मवीर आनंद दिघे क्रिडा संकुल'' अशी नावाची रितसर मागणी महानगरपालिकेकडे केली आहे. त्यानंतर स्थायी समितीमध्ये दि. २१/०८/२०१४ म्हणजे एक महिन्यानंतर मा.स्व. गोपिनाथ मुंडे असा ठराव आणला होता.

हा नामकरणाचा विषय मा. स्थायी समितीने मध्ये आलेला असताना सर्वप्रथम ''धर्मवीर आनंद दिघे क्रिडा संकुल'' असे नामकरण करण्याची मागणी असताना व नामकरणाचा अधिकार हा मा. महासभेचा असल्याने सर्वप्रथम नामकरणाची मागणी आमच्या स्थानिक नगरसेवकांची होती. तरी सदर क्रिडा संकुलनास ''धर्मवीर आनंद दिघे क्रिडा संकुल'' असे नाव देण्यात यावे असा मी रास्त ठराव मांडत आहे.

जयंतीलाल पाटील :-

माझे अनुमोदन आहे.

अनिल सावंत :-

ह्या ठरावात माझी एक सुचना आहे आरक्षण क्र. ११९ क्रिडा संकुलनाच्या नामकरणाचा विचार विनिमय करुन निर्णय घेणे हा विषय आहे. प्रशासनाने सत्ताधाऱ्यांमध्ये आणि विरोधी पक्षामध्ये भांडणे कशी लावायची याचे उत्तम उदाहरण आहे. स्टॅन्डिंग कमिटीला अधिकार नाही ठराव करण्याचे. माझी सुचना आहे ध्रुवकिशोरजी क्रिडा संकुलनाचा विषय तुमचा जिव्हाळ्याचा विषय आहे. मला माहिती आहे मागच्या टर्मची प्रोसीडिंग काढून बघा वरुन महापौरांनी ह्या क्रिडा संकुलाला विरोध केलेला होता की, महापालिकेकडे पैसे नाही म्हणून तेव्हा तुम्ही सांगितले होते संजीव नाईकांकडून आम्ही पैसे आणू आणि तुमच दुःख सुध्दा आम्हाला कळते. स्टॅन्डिंग कमिटी हे अधिकार नसतेवेळी त्यांनी ठराव केला. सचिवांनी तो ठराव मान्य केला. आणि परत मोठी चुक तुम्ही महासभेमध्ये तुम्ही तोच ठरावाचा उल्लेख करत आहेत. त्याला अधिकार नाहीत तुम्ही स्पष्ट धोरण देऊ द्या ना. अस अस करायचे आहे पूढे माझी त्या ठरावामध्ये अशी सुचना घ्या प्रविण की ह्या प्रकरणामध्ये ज्या अधिकाऱ्यांनी स्टॅन्डिंग कमिटीचा विषय नसते वेळी सुध्दा महासभेमध्ये जो विषय आणला त्याच्यावर कारवाई करावी.

जुबेर इनामदार :-

ह्या सुचनेला अनुमोदन आहे.

मा. महापौर :-

ह्या विषयाला दोन ठराव आलेले आहेत सचिव साहेब मतदान घ्या.

प्र. नगरसचिव :-

प्रकरण क्र. ११ साठी दोन ठराव आलेले आहेत. पहिला ठराव सुचक श्री. प्रशांत दळवी, अनुमोदक श्री. अश्विन कासोदरिया. दुसरा ठराव सुचक श्री. हरिश्चंद्र आमगावकर, अनुमोदक श्री. जयंतीलाल पाटील. ह्या ठरावामध्ये सुचना आहे सुचक श्री. अनिल सावंत. प्रथम दुसरा जो ठराव आलेला आहे तो मी मतदानासाठी पुकारतो. दुसरा ठराव आलेला आहे सुचक श्री. हरिश्चंद्र आमगावकर यांच्या सुचनेसह जो ठराव आलेला आहे या ठरावाच्या बाजूने जे असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ कोणी असतील त्यांनी हात वर करायचे आहे. सुचक श्री. प्रशांत दळवी यांच्या ठरावाच्या बाजूने जे असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ कोणी असतील त्यांनी हात वर करायचे आहे.

मा. महापौर :-

सुचक श्री. प्रशांत दळवी यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने ५९, विरोधात ३४, तटस्थ ० इतकी मते पडलेली आहेत. श्री. प्रशांत दळवी यांनी मांडलेला ठराव बहुमतांनी मंजूर करण्यांत येत आहे.

प्रकरण क्र. ११ :-

भाईंदर (पू.) आरक्षण क्र. ११९ या जागेवरील क्रिडा संकुलाच्या नामकरणाबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

ठराव क्र. ०९ :-

मिरा भाईदर महानगरपालिका क्षेत्रात भाईंदर (पूर्व) आरक्षण क्र. ११९ मध्ये बांधण्यात आलेल्या क्रिडासंकुलास मा.स्थायी समिती सभा दि. २१/०८/२०१४ ठराव क्र. ७० अन्वये लोकनेते स्व.गोपीनाथ मुंडे असे नामकरण करण्याबाबत निर्णय घेतला आहे. सदर नामकरण करण्याचा अधिकार हा मा.महासभेचा आहे. मा.स्थायी समिती सभा दि. २१/०८/२०१४ ठराव क्र. ७० अन्वये देण्यात आलेल्या नामकरणास अंतीम मान्यता

देणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेण्यासाठी प्रस्ताव मा.आयुक्त यांनी सादर केला आहे. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने खालील निर्णय ठरावाद्वारे घेण्यात येत आहे.

<u>ठराव</u>

भाईंदर (पूर्व) आरक्षण क्र.119 या जागेत बांधलेल्या क्रिडा संकुलास "लोकनेते स्व. गोपीनाथ मुंडे क्रिडा संकुल" असे नामकरण करण्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसुची "ड" मधील प्रकरण 11(2) अन्वये मान्यता देण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. प्रशांत दळवी अनुमोदक :- श्री. अश्विन कासोदरीया**

| अ.क. | ठरावाच्या बाजुने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | भोईर सुनिता शशिकांत | १ | ढवण निलम हरीश्चंद्र | निरंक |
| २ | शाह रिटा सुभाष | २ | कदम अर्चना अरुण | |
| ३ | तिवारी अशोक सूर्यदेव | ३ | नलावडे दिनेश दगडु | |
| ४ | पांडेय पंकज सूर्यमणि | ४ | गुप्ता कुसुम संतोष | |
| ५ | पाटील रोहिदास शंकर | ५ | पाटील धनेश परशुराम | |
| ६ | गोहिल शानू जोरावर सिंह | ६ | परेरा कॅटलीन एन्थोनी | |
| ७ | कांगणे मीना यशवंत | ७ | परदेशी गिता हरीश | |
| ८ | सिंह मदन उदितनारायण | ८ | पाटील नरेश तुकाराम | |
| ९ | शेट्टी गणेश गोपाळ | ९ | सय्यद नुरजाहॉं नाझर हुसेन | |
| १० | भोईर गणेश गजानन | १० | शेख अमजद गफार | |
| ११ | पाटील प्रभात प्रकाश | ११ | पाटील जयंतीलाल गुरूनाथ | |
| १२ | पाटील वंदना मंगेश | १२ | घरत तारा विनायक | |
| १३ | रावल मेघना दिपक | १३ | पांडे स्नेहा शैलेश | |
| १४ | शाह राकेश रतिशचंद्र | १४ | आमगावकर हरिश्चंद्र रामचंद्र | |
| १५ | सिंग श्रीप्रकाश जिलेदार | १५ | शिर्के अनंत गेणू | |
| १६ | पाटील धृवकिशोर मन्साराम | १६ | पाटील वंदना विकास | |
| १७ | जैन सुनिता रमेश | १७ | पाटील संध्या प्रफुल्ल | |
| १८ | जैन राजेंद्र भवरलाल | १८ | पाटील प्रविण मोरेश्वर | |
| १९ | भूप्ताणी रक्षा सतीश (शाह) | १९ | भोईर कमलेश यशवंत | |
| २० | मोकाशी दिपाली आनंदराव | २० | पाटील अनिता जयवंत | |
| २१ | व्यास रवि वासुदेव | २१ | भोईर भावना राजू | |
| २२ | रकवी वैशाली गजेंद्र | २२ | भोईर राजू यशवंत | |
| २३ | अग्रवाल सुशील गोपीकिशन | २३ | शेख रुबीना फिरोझ | |
| २४ | खंडेलवाल सुरेश जगदीश | २४ | डिसा मर्लिन मर्विन | |
| २५ | डॉ. पाटील प्रिती जयप्रकाश | २५ | सावंत अनिल दिवाकर | |
| २६ | मेहता डिंपल विनोद | २६ | मेहरा राजीव ओमप्रकाश | |
| २७ | शेट्टी अरविंद आनंद | २७ | भट दीप्ती शेखर | |
| २८ | गेहलोत हसमुख मोहनलाल | २८ | सपार उमा विश्वनाथ | |
| २९ | शिंदे रुपाली वसंत (मोदी) | २९ | अहमद साराह अकरम | |
| ३० | थेराडे संजय अनंत | ३० | इनामदार जुबेर अब्दुल्ला | |
| ३१ | मुखर्जी अनिता बबलू | ३१ | शेख अशरफ मोहम्मद इब्राहीम | |
| ३२ | वैती चंद्रकांत सिताराम | ३२ | गोविंद हेलन जॉर्जी | |
| ३३ | हसनाळे ज्योत्सना जालींदर | ३३ | बगाजी शर्मिला विन्सन्ट | |
| ३४ | पारधी सुजाता यशवंत | ३४ | बांड्या एलायस दुमिंग | |
| ३५ | म्हात्रे सचिन केसरीनाथ | | | |
| ३६ | यादव मिरादेवी रामलाल | | | |
| ३७ | म्हात्रे मोहन गोपाळ | | | |

| | | | |
|---|---|---|---|
| ३८ | सोनार सुरेखा प्रकाश | | |
| ३९ | भोईर विणा सुर्यकांत | | |
| ४० | म्हात्रे परशुराम पदमाकर | | |
| ४१ | मांजरेकर आनंद दत्ताराम | | |
| ४२ | अरोरा दीपिका पंकज | | |
| ४३ | बेलानी हेमा राजेश | | |
| ४४ | दळवी प्रशांत ज्ञानदेव | | |
| ४५ | गजरे दौलत तुकाराम | | |
| ४६ | नाईक विविता विवेक | | |
| ४७ | सोंस नीला बर्नाड | | |
| ४८ | राय विजयकुमार सिस्थन नारायण | | |
| ४९ | परमार हेतल रतिलाल | | |
| ५० | कासोदारिया अश्विन शामजीभाई | | |
| ५१ | जैन दिनेश तेजराज | | |
| ५२ | भावसार वंदना संजय | | |
| ५३ | शाह सीमाबेन कमलेश | | |
| ५४ | दुबे मनोज रामनारायण | | |
| ५५ | विराणी अनिल रावजीभाई | | |
| ५६ | भोईर जयेश भानुदास | | |
| ५७ | म्हात्रे नयना गजानन | | |
| ५८ | भानुशाली वर्षा गिरधर | | |
| ५९ | म्हात्रे विनोद काशिनाथ | | |

**ठराव बहुमताने मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र. नगरसचिव :-**

**प्रकरण क्र. १२,** ॲन्टी करप्शन ब्युरो कार्यालयातून लाचलुचपत प्रकरणी अटक करण्यात आलेले महानगरपालिकेतील अधिकारी/कर्मचारी यांचेवर मा. न्यायालयात अभियोग दाखल करणेकरीता मा. आयुक्त यांनी दिलेल्या मंजूरी प्रकरणाचे अवलोकन करणे.

**जुबेर इनामदार :-**

**महापौर मॅडम मी आपल्याला परत आठवण देऊन देतो. तुम्हाला माझा हरकतीचा मुद्दा आहे उपविधी प्रमाणे मी रितसर मागणी केलेली आहे मला त्याची संधी देण्यात यावी.**

**ध्रुवकिशोर पाटील :-**

**अवलोकन झालेले आहे. सचिव साहेब अवलोकन झालेले आहे ठरावाची गरज नाही.**

**(सदर प्रस्तावाचे अवलोकन करण्यात आले.)**

**प्र. नगरसचिव :-**

**प्रकरण क्र. १३,** मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालय इमारतीमधील सन्मानीय पदाधिकारी यांच्या दालनाचे, सभागृहाचे नुतनीकरण करणे, तळ मजल्यावर नव्याने दालने तयार करणे कामाबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

**स्नेहा पांडे :-**

**अवलोकनाचा सभागृहात खुलासा करा. आम्हाला तरी माहित पडू द्या. सचिव साहेब खुलासा करा आम्हाला माहिती तरी पडू द्या. काय अवलोकन झालेले आहे आम्हाला माहितीच नाही.**

**प्र. नगरसचिव :-**

खुलासा करायचा काही विषय नाही. प्रकरण क्र. १२ हा मा. आयुक्त यांनी दिलेल्या मंजूरी प्रकरणाचे अवलोकन आहे. त्याच्यावरती ठराव होत नाही म्हणून हा पुढचा विषय...............

**स्नेहा पांडे :-**

ठराव नाही तर सुचना तरी आम्हाला माहित पडू द्या.

**प्र. नगरसचिव :-**

तुमच्याकडे गोषवारा दिलेला आहे. अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो कार्यालयातून लाचलुचपत प्रकरणी अटक करण्यात आलेले महानगरपालिकेतील अधिकारी / कर्मचारी यांचेवर मा. न्यायालयात अभियोग दाखल करणेकरीता मा. आयुक्त यांनी दिलेल्या मंजूरी प्रकरणाचे अवलोकन करणे.

**स्नेहा पांडे :-**

अवलोकन काय झालेले आहे ते माहित पडेल का?

**जयंतीलाल पाटील :-**

याच्यात नगरसेवक, आमदार वगैरे असतील त्या सर्वांना घ्या अशी माझी सूचना आहे. अधिकाऱ्यांच्या जोडीला जे नगरसेवक असतील...............

**ध्रुवकिशोर पाटील :-**

त्याच्यामध्ये सुचना होत नाही.

**मा. महापौर :-**

तुम्ही विषयावर बोला.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालय इमारतीचा वापर सन 2000 मध्ये सुरू करण्यात आलेला आहे. सद्यस्थितीत दुसऱ्या मजल्यावर सन्मानीय पदाधिकारी यांच्यासाठी दालने आहेत. तसेच तिसऱ्या मजल्यावर सभागृह असून तळमजल्यावर गटनेत्यांच्या संख्येनूसार दालने तयार करण्यात येतात.

मा. महापौर यांनी पत्र देऊन मा. महापौर यांच्यासाठी असलेले दालन हे अपुरे पडत असून त्यांना बैठका घेण्यासाठी स्वतंत्र दालन नसल्याने बैठकांसाठी स्थायी समितीचे दालन महापौर दालनास जोडून उपलब्ध करून देणे, स्थायी समिती सभागृह हे स्थलांतरीत करून सभापती, स्थायी समिती यांच्या दालनात नव्याने स्थायी समिती सभागृह तयार करणे, सभापती, स्थायी समिती यांना सभागृह नेता यांचे दालन व सभागृह नेता यांना विरोधी पक्षनेत्यांसाठी असलेले दालन उपलब्ध करून देण्याबाबत त्याच प्रमाणे मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विविध विशेष समित्या, तर्द्थ समित्यांची त्वरीत स्थापना करावयाची असल्याने सदर दालने व विरोधी पक्ष नेता यांच्यासाठी दालन तळ मजल्यावर तयार करण्याबाबत कळविलेले आहे. तिसऱ्या मजल्यावर असलेल्या सभागृहाचे तातडीने नुतनीकरण करण्याची आवश्यकता असून पहील्या, दुसऱ्या व तळ मजल्यावरील दालनांचे देखिल नुतनीकरण करणे, नव्याने दालने तयार करण्याची आवश्यकता आहे.

सदर प्रस्तावित कामे करण्याबाबत विचार विनिमय होऊन निर्णय घेण्यासाठी आयुक्ताकडून सादर करण्यात आलेल्या प्रस्तावानुसार ठरावाद्वारे खालील प्रमाणे निर्णय घेण्यात येत आहेत.

**<u>ठराव</u>**

१) मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या तिसऱ्या मजल्यावरील सभागृहाचे तातडीने नुतनीकरणाचे काम हाती घेण्यात यावे.

२) दुसऱ्या मजल्यावरील लॉबीचे नुतनीकरण करण्यात यावे.

३) महापौर दालन, उपमहापौर दालनाचे नुतनीकरण करण्यात यावे.

४) महापौर यांना बैठकीसाठी जागा नसल्याने सध्याचे स्थायी समिती सभागृह नुतनीकरण करुन महापौर दालनास जोडून महापौर यांना उपलब्ध करुन देण्यात यावे.

५) मुख्य कार्यालय इमारतीत टेरेसवर तात्पुरत्या स्वरुपात शेड बांधून कॅटीन सुरु करण्याची प्रक्रीया करुन कॅटीन सुरु करावी.

६) स्थायी समिती सभागृह, सभापती, स्थायी समिती यांच्या दालनात स्थलांतरीत करुन तयार करण्यात यावे, सभापती स्थायी समिती यांना सभागृह नेते यांचे दालन व सभागृह नेते यांना विरोधी पक्ष नेते यांचे दालन नुतनीकरणासह उपलब्ध करुन देण्यात यावे.

७) तळ मजल्यावर कार्यालये करताना प्रथमतः विरोधी पक्ष नेता दालन, विविध समित्यांची कार्यालये (समान आकाराची) गटनेता कार्यालये (समान आकाराची) पत्रकार कक्ष या दालनांचे नियोजन करण्यात यावे या मध्ये महासभेने निश्चित केलेल्या प्राधान्य क्रमानूसार दालने तयार करण्याची दक्षता आयुक्त यांनी घ्यावी व त्याचे अधिकार आयुक्त यांना देण्यात येत आहेत. नूतनीकरण कामे करण्यासाठी पत्रकार कक्ष तात्पुरत्या स्वरूपात स्थलांतरीत करण्यात यावे.

८) महापौर यांना सद्यास्थितीत असलेले आयुक्त निवासस्थान उपलब्ध करुन देण्यात यावे व आयुक्त यांना सध्याचे महापौर निवासस्थान नुतनीकरणासह उपलब्ध करुन देण्यात यावे.

वरील सर्व कामांसाठी येणाऱ्या खर्चास प्रशासकिय व आर्थिक मान्यता देत आहे. सदर खर्चाच्या पुर्नविनियोजनासह बांधकाम विभागाच्या इतर लेखाशिर्षात आवश्यक पुर्नविनियोजन करुन तरतुद उपलब्ध करुन घेण्यास ही सभा आयुक्त यांना अधिकार प्रदान करीत आहे.

वरील सर्व कामे करण्यासाठी सल्लागारामार्फत नकाशा व अंदाजपत्रक तयार करुन घेऊन सर्व आवश्यक प्रक्रीया शीघ्रतेने पार पाडुन कार्यवाही करावी असा मी ठराव मांडत आहे.

सिमा शाह :-

माझे अनुमोदन आहे.

निलम ढवण :-

महापौर मॅडम, आयुक्त साहेब महापौर मॅडम आपल्या परवानगीने बोलते आयुक्त साहेब आपल्याला विनंती आहे की माझ्या शंकाचे जरा निराकरण करावे हा विषय प्रशासनातर्फे घेतला गेलेला आहे. म्हणजे नक्की ह्या संदर्भात आपण ह्या विषयाशी सहमत असणार आणि त्यामुळे हा विषय इथे महासभेत दिलेला आहे. पूर्ण दुसऱ्या मजल्यावरच्या ज्या केबीज चेंज करायच्या आहेत. नेहमी सारख्या इथे पूर्वी पण आहेत. महापौर केबीन, स्थायी समितीचे आहे, विरोधकांचे आहे, सभागृह नेत्यांचे आहे, स्थायी सभापतीची केबीन तिथे आहे. हे करण्यामागे कारण काय? आणि विरोधक विरोधी पक्षनेत्यांची केबीन खाली हलविण्यामागे कारण काय? कृपया आयुक्त साहेब आपण जरा ह्या विषयावर स्पष्टीकरण द्यावे. गोंधळ नको असेल तर कृपया थांबा मला पूर्ण उत्तरे मिळाल्याशिवाय कोणी बोलू नये.

(सभागृहात गोंधळ)

निलम ढवण :-

त्यांनी उत्तर दिल्यानंतर त्याच्या पुढेही माझा प्रश्न आहे. तोपर्यंत तुम्ही दुसऱ्याला उठू देऊ नये. मला पहिल्यांदा आयुक्त साहेबांनी उत्तर द्यावे. मला अधिकार आहे. नगरसेवकांना अधिकार आहे.

मा. महापौर :-

आप बैठीए आपका जवाब भी मिलेगा।

निलम ढवण :-

मला पुढची पण उत्तरे पाहिजेत.

ध्रुवकिशोर पाटील :-

महापौर मॅडम, आम्ही ठराव मांडलेला आहे आमचा ठराव पास करावा.

निलम ढवण :-

आयुक्त साहेब मला उत्तर द्या. महापौर मॅडम, आयुक्त साहेब तो प्रश्न मी विचारुन आणि तो का विचारला त्याचे पुढचे सांगते. मागच्या ५ वर्षात देखील किंवा याच्यापूर्वी देखील नगरसेवकांची संख्या तेवढीच होती. आताही तेवढीच आहे. मग आता का कमी पडायला लागलं? सगळ्या स्ट्रक्चरमध्ये तुम्ही बदल करणार. त्याच्यासाठी पुर्ननियोजन करायला सांगतात. मग जी विकासाची कामे आहेत. मिरा भाईंदर इव्हन सगळे नगरसेवकांची प्रभाग निधी, नगरसेवक निधीची जी कामे आहेत. त्याच्यानंतर माझ्याकडे लिस्ट आहे जी कामे अडलेली आहेत पैसा अभावी अडलेली आहेत. हे लोक इंदिरा गांधी रुग्णालयात काम करणारे कर्मचारी ४-४ महिने त्यांचा पगार झाला नाही. विकास कामांसाठी पैसे नाहीत. बी.एस.यु.पी. योजना मुदतीत पूर्ण व्हावी मी लिस्ट वाचून दाखविते. बी.एस.यु.पी. योजना मुदतीत पूर्ण झालेली नसेल ३१ मार्च पर्यंतची बंद झाली आहे. सदर १७९ फ्लॅटची एक इमारत पूर्ण झाली आहे. सुमारे २ हजार कुटुंब रस्त्यावर आहेत. प्रशासन त्यांना भाडे देत नाही आहेत. पैसे नाही आहेत. याच्यासाठी पैसे कशाला? केबीन नविन बनविण्यासाठी लोकांचा पैसा आहे. तुम्ही लोकांना सुविधा द्या. तुमच्या सोयी बघु नका. लोकांकडून टॅक्सचा पैसा आलेला आहे. तो लोकांसाठीच खर्च झाला पाहिजे.

ध्रुवकिशोर पाटील :-

तुम्ही पण उपमहापौर होते. त्यावेळी तुम्ही पण पैसे खर्च केले होते.

निलम ढवण :-

आम्ही पण त्यावेळी विरोध केला होता. आम्ही सत्तेत होतो तरी पण आम्ही त्यावेळी विरोध केला होता. जेव्हा एक एक कोटी केबीनसाठी खर्च केला तेव्हा आम्ही विरोध केला होता. त्यामुळे तुम्ही आम्हाला सांगुच शकत नाही. आणि लोकांचा टॅक्सचा पैसा आहे. ह्या केबीनसाठी अय्याशीसाठी वापरू नये. लोकांची जी विविध कामे आहेत ते वाचून दाखविते जर माहिती नसतील तर.

ध्रुवकिशोर पाटील :-

तुम्ही आयुक्तांशी पाठपूरावा करा.

निलम ढवण :-

इथे मध्ये विषय घेतला ना. महासभेत विषय घेतला.

(सभागृहात गोंधळ)

मा. महापौर :-

याला तुमचा विरोध आहे का?

निलम ढवण :-

ज्या केबीन आहेत त्या कुठेही हलवायच्या नाहीत. आमचा विरोध आहे.

मा. महापौर :-

तुम्ही इथे ठराव करा.

निलम ढवण :-

ठराव कशाला. मॅडम तुम्हाला ठरावाविषयी दुसर काही करता येत नाही का? फक्त ठराव करायचे आणि मेजोरीटीवर पारीत करुन घ्यायचे. आयुक्त साहेब तुम्ही मला उत्तर द्या कारण हा प्रशासनाचा विषय आहे. टॅक्स तुम्ही घेता आणि उद्यापासून लोकांना सांगणार एकही पैसा टॅक्सचा भरायचा नाही. काय करायचे ते करा काही अॅक्शन घ्याल तेव्हा लोकांच्या बाजूने आम्ही असणार आहोत. हे लक्षात घ्या प्रत्येक वर्षी प्रत्येक ५ वर्षाने काय चाललं हे का पैशाची उधळपट्टी करायची आमचा प्रभाग निधी, नगरसेवक निधीची कामे पेन्डींग आहेत. विकासावर तुमचे लक्ष नाही. मोठमोठ्या केबीन पाहिजेत. कशासाठी आयुक्त साहेब प्रशासनाचा अजेंडा तुम्ही चुकीचा घेतलेला आहे. आयुक्त साहेब तुम्ही उत्तर द्यायचें.

(सभागृहात गोंधळ)

स्नेहा पांडे :-

मॅडम ठराव करने के लिए खडे है ठराव के साईट से ही बात कर रही हूँ। अगर नगररचना का एक भी अधिकारी है तो में एक प्रश्न पूछना चाहती हूँ। २००७-०८ मैं जब गट कार्यालय गट प्रमुखों के लिए निचे कार्यालय बनाया जा रहा हथा तो उस टाईम अधिकारीयोंने बोला था की तळ मजला इललीगल है। इसलिए उसपे बांधकाम नही हो सकता और पार्टीशन डालके सभी गटनेताओं को छोटे-छोटे कार्यालय दिए गए थे। तो इस वक्त विरोधी पक्षनेताजी के केबीन बनाने के लिए परमीशन नगररचना दे रहा है क्या? तळ मजला इललिगल है पहिले इसका खुलासा करे। कभी इललिगल हो जाता है। जब हमारे लिए बडा गट प्रमुख का कॅबीन बडा करना था उस टाईम नगररचना के अधिकारीयोंन जवाब दिया था की नगरपालिका तळ मजला इललिगल है। इसलिए उसपर कोई बांधकाम नही हो सकता तो इस वक्त कैसे बांधकाम होगा मुझे नगररचना के अधिकारीयो से जवाब चाहिए।

दिनेश नलावडे :-

महापौर मॅडम, महानगरपालिका बनल्यानंतर आजपर्यंत विरोधी पक्षनेत्यांची केबीन महापौरांबरोबर तिकडे आहे आणि आजच तळमजल्यावर नेण्याचे कारण काय? सत्तेचा दुरुपयोग करु नका हे ठिक नाही. विरोधी पक्षनेत्याला एवढ्या तळाला खाली पाठवू नका. त्यांचा मान फार मोठा आहे. त्यांना सन्मानाने द्या. विरोधी पक्षनेता दुसऱ्या माळ्यावरती बनवायला पाहिजे. आम्ही तळाला जाऊ देणार नाही.

निलम ढवण :-

आयुक्त साहेब प्रशासन म्हणून तुम्ही निर्णय घ्या. कोणाच्या दबावाखाली असे गोषवारे देऊ नका.

दिनेश नलावडे :-

महापौर मॅडम, हा विषय तुमचा आहे. विरोधी पक्षनेत्याची केबीन दुसऱ्या माळ्यावरती पाहिजे. याचे उत्तर तुम्ही द्या.

मा. महापौर :-

आपका विरोध है तो आप अपना ठराव दिजीए।

(सभागृहात गोंधळ)

निलम ढवण :-

आयुक्त साहेब आपण याचे उत्तर द्यावे. प्रशासनाने हा गोषवारा दिलाच नाही पाहिजे होता तरी का दिला त्याचे उत्तर आपण द्यावे. प्रशासन म्हणून आयुक्त साहेब तुम्हाला रिक्वेस्ट आहे की आपण आपली भुमिका तटस्थपणे बजावायची. कुणाच्याही दबावाखाली येऊन कुठल्याही असेल गोषवारे पाठवत जाऊ नका ही आपल्याला विनंती राहील. साहेब तुमचे काम चांगले आहे. प्रत्येक वेळेला तुमचा निर्णय चांगला असतो. हे आम्हालाही कळते पण तरी आपण आमच्या सगळ्यांच समोर उत्तर द्यावे ही आपल्याला विनंती राहील.

दिनेश नलावडे :-

महापौर मॅडम लक्ष द्या, आयुक्त साहेब विषयाला उत्तर देत नाही. याचा अर्थ आयुक्त साहेबांना ह्या सगळ्या विषयावरती शंका येते तुमच्या समोर ह्या सगळ्या प्रकरणावरती आयुक्त साहेब तुम्ही याच्यावरती उत्तर द्या. आणि तुम्ही जर उत्तर नाही दिल. तर याचा अर्थ सत्ताधाऱ्यांकडून तुम्हाला काहीतरी शंका निर्माण झालेली आहे. ह्या ठिकाणी आम्हाला शंका येते. तुमच्या बाबतीमध्ये तर तुम्ही याचे उत्तर द्या.

अनिल सावंत :-

महापौर मॅडम हा जो विषय आणलेला आहे मुख्य कार्यालय इमारत सन्मा. पदाधिकाऱ्यांचे जेव्हा प्रत्येक वर्षी खर्च करतात महापौर मॅडम मुळात ही जी इमारत आहे सी.आर.झेडमध्ये इललिगल इमारत

आहे. याच्याबद्दल तुमच्याकडून अल्टरनेशन केले तर अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल होतील. कोणी कोर्टात गेले तर दुसरा मुद्दा ह्या शहरासाठी नविन भव्य प्रशासकीय इमारत आपल्याला मिळणार आहे. आदरणीय मुख्यमंत्र्यांनी त्यांचे उद्‌घाटन केले दिड वर्षापूर्वी ती इमारत आपल्याला मिळणार आहे. तिथे सगळी दालने असणार आहेत. मग हा पैसा खर्च कशाला करत आहेत. लोकांच्या टॅक्सचा पैसा घामाचा पैसा कशाला खर्च करत आहेत. ह्या मुद्दयांचा विचार करा आणि हा प्रस्ताव तुम्ही मागे घ्या.

मा. आयुक्त :-

आता मला परवानगी दिली सुचनेप्रमाणे मी प्रस्तावावरती खुलासा करतो. गोषवारा हा आयुक्तांनी दिलेला आहे. आयुक्तांच्या नियमामध्ये आपण वाचा आणि महापौरांनी पत्र दिलेले आहे. आम्हाला त्याचा विचार विनिमय आम्ही सभागृहात ठेवलेला आहे. प्रशासनाने फक्त विचार विनिमय करायचा आणि आम्हाला सांगायचे तुम्ही जे सांगाल ते आम्ही निर्णय घेऊ.

(सभागृहात गोंधळ)

निलम ढवण :-

विचार विनिमयावर ठराव झाला नाही पाहिजे. त्या विचारविनिमय म्हणजे त्याच्यावर ठराव नाही झाला पाहिजे. मेजोरीटीने ठराव करणार ते तुम्ही मान्य कराल. मग ते तुम्ही करणार का?

मा. आयुक्त :-

याच्यामध्ये महापौरांनी पत्र दिल्यानंतर महासभेत हा प्रस्ताव ठेवलेला आहे.

निलम ढवण :-

महापौरांनी पत्र दिल्यानंतर मग विचार विनिमय करा ना.................

मा. आयुक्त :-

शंका घेण्याबाबतत कुठल्याही प्रकारचे कारण नाही. मगाशी सन्मा. महोदय म्हणाले आयुक्तांवर शंका घ्यायच याच्यामध्ये महापौरांनी पत्र दिल्यानंतर आयुक्त काय करणार.

दिनेश नलावडे :-

आयुक्त साहेब हे उत्तर अगोदर दिल असते तर आम्हाला शंका आली नसती. एवढा उशीर का लावला उत्तर देण्यासाठी.

निलम ढवण :-

आयुक्त साहेब याच्यावर ठराव झाल्यानंतर पुढची तुमची तयारी असेल.

दिनेश नलावडे :-

महापौर मॅडम, आज तुमच्याकडे मेजोरीटी आहे आज विरोधी पक्षनेत्याला तुम्ही त्या मळमजल्यावर पाठवत आहेत. उद्या जर तुमच्या मनात आले ह्या बहुमताच्या जोरावर तुम्ही दुसऱ्या ठिकाणी विरोधी पक्षनेत्याला तुम्ही कुठेही पाठवाल. हे होऊ शकत का? याचा विचार महापौर मॅडम तुम्ही करा.

ध्रुवकिशोर पाटील :-

हा प्रस्ताव महापौरांनी दिलेला आहे. आणि विचार विनिमय करुन तुम्ही निर्णय घ्या. आमच्या पक्षाने विचार विनिमय करुन आम्ही तुम्हाला हा प्रस्ताव दिलेला आहे. जर त्यांना पाहिजे असेल तर तुम्ही तुमचा विचार विनिमय करा.

निलम ढवण :-

पक्षाचा विचार विनिमय नाही पक्षाचा नाही सांगितला. सभागृहाचा सांगितलेला आहे.

ध्रुवकिशोर पाटील :-

आमचा प्रस्ताव आपल्याकडे आलेला आहे...........

निलम ढवण :-

महापौर मॅडम सभागृहाने विचार विनिमय करायचा.

दिनेश नलावडे :-

महापौर मॅडम तुम्ही महापौर म्हणून कमी बोलता आणि ते नगरसेवक ध्रुवकिशोर पाटील ते तुमचे उत्तर जास्त देत आहेत. जर असा बदल केला तर ते बर होईल.........

निलम ढवण :-

विचार विनिमय केल्यानंतर मेजोरीटीच्या जोरावर जर तुम्ही ठराव करणार असाल तर त्याच्यावर तुमची काय कारवाई असेल? आयुक्त म्हणून तुमची काय कारवाई असेल? ते मेजोरीटीच्या जिवावर काहीही करतील तुम्ही विषय घेतलेला आहे. त्यांच्या सांगण्यानुसार मग तुम्हालाही पुढचा अधिकाराचा विचार करायला पाहिजे. विखंडीत करायला पाठवणार का?

मा. आयुक्त :-

माझा विषय सभागृहासमोर २५ लाखाच्यावर खर्च होणार असल्यामुळे तुम्हीच ठरवा. खर्च करायचा की नाही करायचा. नाही करायचा असेल तर नका करु.

निलम ढवण :-

तुम्हाला हे योग्य वाटत आहे का? मेजोरीटीच्या जोरावर त्यांनी पास केल तर ते विखंडीत करायला तुम्ही पाठविणार का? आयुक्त साहेब आम्हाला सांगा हे चुकीचे करत आहेत यांना तुम्ही साथ देणार का?

चुकीचे जे घडते त्याला तुम्ही प्रशासन म्हणून साथ देणार का? प्रशासन म्हणून तुम्ही ह्या गोष्टीला साथ देणार का?

मा. महापौर :-

आपको आपका ठराव देना हो तो दिजीए।

(सभागृहात गोंधळ)

जुबेर इनामदार :-

महापौर मॅडम, आयुक्त महोदय प्रशासनाने गोषवारा दिलेला आहे. आयुक्त महोदय आपले लक्ष वेधु इच्छितो प्रशासनाने गोषवारा दिलेला आहे. आपली स्वाक्षरी आहे. याचा अर्थ प्रशासनाने अभ्यास करुन निट विषय करता येईल किंवा नाही येईल केल पाहिजे की नाही केल पाहिजे. आर्थिक परिस्थिती आर्थिक बाबींची चाचपणी केल्यानंतर गोषवारा प्रशासन देतो. हा आमचा विश्वास आहे. महापौर मॅडम जी पत्र दिल महापौर मॅडम बऱ्याच विषयावर तुम्हाला पत्र देतील तो त्यांचा अधिकार प्रथम नागरीक आहेत बरेच काही विषय त्यांच्याकडे येतील. त्यांना वाटेल त्याप्रकारे लोक हीतामध्ये लोक त्यांच्याकडे येतील त्यांची पत्र त्यांना ती योग्य वाटेल ते तुम्हाला पत्र व्यवहार करतील पण त्याच्यावर तुम्ही कारवाई करायची की नाही हा अधिकार संपूर्ण तुमचा आहे सर तुम्ही शहराचे मालक हे शहर तुम्ही घेतलेली प्रत्येक भुमिका तुमची भुमिका आयुक्त महोदय म्हणून तुमची भुमिका आम्ही लोकप्रतिनिधी आम्ही फक्त आमची बाजु मांडणार. महापौर मॅडमचा अधिकार सभागृह चालविण्याचा आहे आणि बाकी तुमच्याकडे शिफारस करण्याचा आहे. मान्य करायचा नाही मान्य करायचा हा तुमचा विषय आहे. आयुक्त महोदय गोषवाऱ्यामध्ये स्थायी समितीचे दालन तोडायचे माजी पंतप्रधान ह्या देशाचे लालबहादुर शास्त्री साहेबांच्या नावाचे दालन आपल्याला तोडायचे आहे. आपण अशी तोडफोड करु शकतो का? आयुक्तांनी आपल्या दालनाचे सुशोभिकरण केले.

सुरेश खंडेलवाल :-

पुरे सभागृह का टाईम जो है वह किंमती है। एक-एक विषय पे एक-एक जो है ना आयुक्त ने खुलासा कर दिया जो भी डिसीजन है वह लेगे............

जुबेर इनामदार :-

आयुक्त महोदय सी.आर.झेडमध्ये बाधीत होणारी वस्तु त्याच्यामध्ये कुठलेही बांधकाम होऊ शकत का? ते शक्य आहे का?

मा. महापौर :-

आपका ठराव है क्या?

जुबेर इनामदार :-

आयुक्त महोदय होणारा खर्च ह्या गोषवाऱ्यामध्ये कुठेही त्याचा उल्लेख केलेला नाही कुणाचे दालन कुठे असेल आता विरोधी पक्षाचे दालन दुसऱ्या मजल्यावर होता आणि तो सोयीस्कर होता. इतके वर्ष चालला काही अडचण नव्हती पार्टीशन होते त्याला बांधकाम कोणीच केले नाही पाहिजे. तसा त्याच्यामध्ये स्थलांतरीत करत होते. इतके सदस्य एकही सदस्य वाढलेला नाही तरीही....................

स्नेहा पांडे :-

महापौर सबके एक है सिर्फ बी.जे.पी. के नही है और सारे नगरसेवक महापौर की मिटींग जब भी होती थी पहले भी बैठते थे। सिर्फ बी.जे.पी. के लिए महापौर नही होते है। इसी लिए बोला सबका सच सबका विकास जिसको विषय मालुम रहेगा वही बोलेगा ना वह बोल रहे है बी.जे.पी. के नगरसेवक बढे हुए है तो महापौर सिर्फ एक पार्टी का नही होता है। महापौर सभी पक्ष का होता है।

जुबेर इनामदार :-

महापौर मॅडम मैंने शुरु कैसे किया प्रशासन का यह विषय है। गोषवारा प्रशासन देता है फिर जवाब ध्रुवकिशोरजी देंगे नही तो खंडेलवालजी देंगे यह बरोबर नही।

मा. महापौर :-

आपका ठराव पढीए ना।

जुबेर इनामदार :-

आयुक्त महोदय आणि खरी वस्तुस्थिती आहे भव्यदिव्य उद्घाटन झालेले आहे. मिरारोडमध्ये एक नविन प्रशासकीय इमारतीचा मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झालेले आहे. बऱ्याच काही त्याचा तामजाम झाला ह्या शहरामध्ये अशी भव्यदिव्य इमारत आपल्या पालिकेची होणार असली तर आम्हाला हे सगळे खर्च करायची गरज नाही. महापौर मॅडम थोडक्यात असे आहे एक दोन छोटी छोटी नावांची कामे आम्ही आयुक्तांकडे प्रस्तावित केलेली आहेत. आम्हाला सार्वजनिक बांधकाम कडून माहिती अशी मिळते की आमच्याकडे फंड अव्हेलेबल नाही म्हणजे निधी अव्हेलेबल नाही. मार्च महिन्यानंतर २ महिने आचारसंहितेमध्ये गेले. आता कुठे कामकाज शहराचे सुरु झाले आणि सुरु होताच आपला निधी संपुन गेलेला आहे. ती परिस्थिती आता ठराव वाचताना ध्रुवकिशोर पाटील साहेबांनी ठरावामध्ये नमुद केलेल्या पुर्ननियोजन करा पुर्नविनीयोजन करायचा अधिकार किंवा त्याचा गोषवारा द्यायचा अधिकार फक्त आणि फक्त प्रशासनाला आहे. महापौर मॅडम तुमचा आणि माझा कोणालाच नाही कारण त्यांना कुठून पुर्नविनियोजन करायचे आहे कुठल्या लेखाशिर्षामधून कुठल्या लेखाशिर्षाकडे वर्ग करायचे असतात तो अधिकार फक्त आणि फक्त प्रशासनाचा आहे. त्यांनी असा

**ठराव सुध्दा करु शकत नाही. हे नियमबाह्य ठराव होऊन जातील. म्हणून माझी प्रशासनाला फक्त एकच विनंती आहे गोषवारा देताना परिपूर्ण अभ्यास करुन आमच्याकडे गोषवारा पाठवा. विरोधांनी करायचा करणारा मी विरोधी पक्षामध्ये तुम्ही सत्ताधारी आहेत. तुमच्याकडे बहुत आहे. ठराव होणार ठराव झाला याचा अर्थ तो नियम नाही त्याचा कायदा झाला असे नाही मी करायचो तो कायदा नसतो. शासन आहे त्यावरती न्यायपालिका आहे. बरेच काही विषय आहेत. अस कुठलेही कार्य प्रशासनाने करु नये याच्यापुढे नामुशकी तुम्हाला सहन करावी लागेल. मी माझा ठराव वाचुन विषय संपवतो.** मिरा-भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालय इमारतीचा वापर सन 2000 मध्ये सुरू करण्यात आलेला आहे. सद्यस्थितीत दुसऱ्या मजल्यावर सन्मानीय पदाधिकारी यांच्यासाठी दालने आहेत. तसेच तिसऱ्या मजल्यावर सभागृह असून तळमजल्यावर गटनेत्यांच्या संख्येनूसार दालने तयार करण्यात येतात. मा. महापौर यांनी पत्र देऊन मा. महापौर यांच्यासाठी असलेले दालन हे अपुरे पडत असून त्यांना बैठका घेण्यासाठी स्वतंत्र दालन नसल्याने बैठकांसाठी स्थायी समितीचे दालन महापौर दालनास जोडून उपलब्ध करून देणे, स्थायी समिती सभागृह हे स्थलांतरीत करून सभापती, स्थायी समिती यांच्या दालनात नव्याने स्थायी समिती सभागृह तयार करणे, सभापती, स्थायी समिती यांना सभागृह नेता यांचे दालन व सभागृह नेता यांना विरोधी पक्षनेत्यांसाठी असलेले दालन उपलब्ध करून देण्याबाबत त्याच प्रमाणे मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विविध विशेष समित्या, तर्द्थ समित्यांची त्वरीत स्थापना करावयाची असल्याने सदर दालने व विरोधी पक्ष नेता यांच्यासाठी दालन तळ मजल्यावर तयार करण्याबाबत कळविलेले आहे. तिसऱ्या मजल्यावर असलेल्या सभागृहाचे तातडीने नुतनीकरण करण्याची आवश्यकता असून पहील्या, दुसऱ्या व तळ मजल्यावरील दालनांचे देखिल नुतनीकरण करणे, नव्याने दालने तयार करण्याची आवश्यकता आहे. असे प्रशासनाने गोषवारा मान्यतासाठी महासभेसमोर ठेवला आहे. प्रशासनाने सदर कामी होणाऱ्या खर्चाची माहिती दिलेली नाही. तरी सदरचा विषय पुरीपूर्ण माहितीसहीत पुढच्या महासभेमध्ये घेण्यात यावा.

**निलम ढवण :-**

**माझे अनुमोदन आहे.**

**मा. महापौर :-**

**दोन ठराव आहेत. सचिव साहेब मतदान घ्या.**

**प्र. नगरसचिव :-**

**प्रकरण क्र. १३ साठी दोन ठराव आलेले आहेत. पहिला ठराव सुचक श्री. ध्रृवकिशोर पाटील अनुमोदन श्रीम. सिमा शहा. दुसरा ठराव सुचक श्री. जुबेर इनामदार अनुमोदन श्रीम. निलम ढवण. प्रथम मी दुसरा ठराव मतदानास टाकतो. सुचक श्री. जुबेर इनामदार यांच्या बाजूने असतील त्यांनी हात वर करायचे आहेत, ह्या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत, तटस्थ कोणी असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. सुचक श्री. ध्रृवकिशोर पाटील ह्यांच्या ठरावाच्या बाजूने असतील त्यांनी हात वर करायचे आहेत, ह्या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत, तटस्थ कोणी असतील त्यांनी हात वर करायचे आहेत.**

**मा. महापौर :-**

**सुचक श्री. ध्रृवकिशोर पाटील यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने ५९, विरोधात ३४, तटस्थ ० इतकी मते पडलेली आहेत. श्री. ध्रृवकिशोर पाटील यांनी मांडलेला ठराव बहुमताने मंजूर करण्यांत येत आहे.**

**प्रकरण क्र. १३ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालय इमारतीमधील सन्मानीय पदाधिकारी यांच्या दालनाचे, सभागृहाचे नुतनीकरण करणे, तळ मजल्यावर नव्याने दालने तयार करणे कामाबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

**ठराव क्र. १० :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालय इमारतीचा वापर सन 2000 मध्ये सुरू करण्यात आलेला आहे. सद्यस्थितीत दुसऱ्या मजल्यावर सन्मानीय पदाधिकारी यांच्यासाठी दालने आहेत. तसेच तिसऱ्या मजल्यावर सभागृह असून तळमजल्यावर गटनेत्यांच्या संख्येनूसार दालने तयार करण्यात येतात.

मा. महापौर यांनी पत्र देऊन मा. महापौर यांच्यासाठी असलेले दालन हे अपुरे पडत असून त्यांना बैठका घेण्यासाठी स्वतंत्र दालन नसल्याने बैठकांसाठी स्थायी समितीचे दालन महापौर दालनास जोडून उपलब्ध करून देणे, स्थायी समिती सभागृह हे स्थलांतरीत करून सभापती, स्थायी समिती यांच्या दालनात नव्याने स्थायी समिती सभागृह तयार करणे, सभापती, स्थायी समिती यांना सभागृह नेता यांचे दालन व सभागृह नेता यांना विरोधी पक्षनेत्यांसाठी असलेले दालन उपलब्ध करून देण्याबाबत त्याच प्रमाणे मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विविध विशेष समित्या, तर्द्थ समित्यांची त्वरीत स्थापना करावयाची असल्याने सदर दालने व विरोधी पक्ष नेता यांच्यासाठी दालन तळ मजल्यावर तयार करण्याबाबत कळविलेले आहे. तिसऱ्या मजल्यावर असलेल्या सभागृहाचे तातडीने नुतनीकरण करण्याची आवश्यकता असून पहील्या, दुसऱ्या व तळ मजल्यावरील दालनांचे देखिल नुतनीकरण करणे, नव्याने दालने तयार करण्याची आवश्यकता आहे.

सदर प्रस्तावित कामे करण्याबाबत विचार विनिमय होऊन निर्णय घेण्यासाठी आयुक्ताकडून सादर करण्यात आलेल्या प्रस्तावानुसार ठरावाद्वारे खालील प्रमाणे निर्णय घेण्यात येत आहेत.

**ठराव**

१) मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या तिसऱ्या मजल्यावरील सभागृहाचे तातडीने नुतनीकरणाचे काम हाती घेण्यात यावे.

२) दुसऱ्या मजल्यावरील लॉबीचे नुतनीकरण करण्यात यावे.

३) महापौर दालन, उपमहापौर दालनाचे नुतनीकरण करण्यात यावे.

४) महापौर यांना बैठकीसाठी जागा नसल्याने सध्याचे स्थायी समिती सभागृह नुतनीकरण करुन महापौर दालनास जोडून महापौर यांना उपलब्ध करुन देण्यात यावे.

५) मुख्य कार्यालय इमारतीत टेरेसवर तात्पुरत्या स्वरुपात शेड बांधून कॅटीन सुरु करण्याची प्रक्रीया करुन कॅटीन सुरु करावी.

६) स्थायी समिती सभागृह, सभापती, स्थायी समिती यांच्या दालनात स्थलांतरीत करुन तयार करण्यात यावे, सभापती स्थायी समिती यांना सभागृह नेते यांचे दालन व सभागृह नेते यांना विरोधी पक्ष नेते यांचे दालन नुतनीकरणासह उपलब्ध करुन देण्यात यावे.

७) तळ मजल्यावर कार्यालये करताना प्रथमतः विरोधी पक्ष नेता दालन, विविध समित्यांची कार्यालये (समान आकाराची) गटनेता कार्यालये (समान आकाराची) पत्रकार कक्ष या दालनांचे नियोजन करण्यात यावे या मध्ये महासभेने निश्चित केलेल्या प्राधान्य क्रमानूसार दालने तयार करण्याची दक्षता आयुक्त यांनी घ्यावी व त्याचे अधिकार आयुक्त यांना देण्यात येत आहेत. नूतनीकरण कामे करण्यासाठी पत्रकार कक्ष तात्पुरत्या स्वरूपात स्थलांतरीत करण्यात यावे.

८) महापौर यांना सद्यास्थितीत असलेले आयुक्त निवासस्थान उपलब्ध करुन देण्यात यावे व आयुक्त यांना सध्याचे महापौर निवासस्थान नुतनीकरणासह उपलब्ध करुन देण्यात यावे.

वरील सर्व कामांसाठी येणाऱ्या खर्चास प्रशासकिय व आर्थिक मान्यता देत आहे. सदर खर्चाच्या पुर्नविनियोजनासह बांधकाम विभागाच्या इतर लेखाशिर्षात आवश्यक पुर्नविनियोजन करुन तरतुद उपलब्ध करुन घेण्यास ही सभा आयुक्त यांना अधिकार प्रदान करीत आहे.

वरील सर्व कामे करण्यासाठी सल्लागारामार्फत नकाशा व अंदाजपत्रक तयार करुन घेऊन सर्व आवश्यक प्रक्रीया शीघ्रतेने पार पाडुन कार्यवाही करावी असा मी ठराव मांडत आहे.

सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील श्रीम. सिमा शाह

| अ.क. | ठरावाच्या बाजुने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | भोईर सुनिता शशिकांत | १ | ढवण निलम हरीश्चंद्र | निरंक |
| २ | शाह रिटा सुभाष | २ | कदम अर्चना अरुण | |
| ३ | तिवारी अशोक सूर्यदेव | ३ | नलावडे दिनेश दगडु | |
| ४ | पांडेय पंकज सूर्यमणि | ४ | गुप्ता कुसुम संतोष | |
| ५ | पाटील रोहिदास शंकर | ५ | पाटील धनेश परशुराम | |
| ६ | गोहिल शानू जोरावर सिंह | ६ | परेरा कॅटलीन एन्थोनी | |
| ७ | कांगणे मीना यशवंत | ७ | परदेशी गिता हरीश | |
| ८ | सिंह मदन उदितनारायण | ८ | पाटील नरेश तुकाराम | |
| ९ | शेट्टी गणेश गोपाळ | ९ | सय्यद नुरजाहॉ नाझर हुसेन | |
| १० | भोईर गणेश गजानन | १० | शेख अमजद गफार | |
| ११ | पाटील प्रभात प्रकाश | ११ | पाटील जयंतीलाल गुरूनाथ | |
| १२ | पाटील वंदना मंगेश | १२ | घरत तारा विनायक | |
| १३ | रावल मेघना दिपक | १३ | पांडे स्नेहा शैलेश | |
| १४ | शाह राकेश रतिशचंद्र | १४ | आमगावकर हरिश्चंद्र रामचंद्र | |
| १५ | सिंग श्रीप्रकाश जिलेदार | १५ | शिर्के अनंत गेणू | |
| १६ | पाटील धृवकिशोर मन्साराम | १६ | पाटील वंदना विकास | |
| १७ | जैन सुनिता रमेश | १७ | पाटील संध्या प्रफुल्ल | |
| १८ | जैन राजेंद्र भवरलाल | १८ | पाटील प्रविण मोरेश्वर | |
| १९ | भूप्ताणी रक्षा सतीश (शाह) | १९ | भोईर कमलेश यशवंत | |
| २० | मोकाशी दिपाली आनंदराव | २० | पाटील अनिता जयवंत | |
| २१ | व्यास रवि वासुदेव | २१ | भोईर भावना राजू | |
| २२ | रकवी वैशाली गजेंद्र | २२ | भोईर राजू यशवंत | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २३ | अग्रवाल सुशील गोपीकिशन | २३ | शेख रुबीना फिरोझ | |
| २४ | खंडेलवाल सुरेश जगदीश | २४ | डिसा मर्लिन मर्विन | |
| २५ | डॉ. पाटील प्रिती जयप्रकाश | २५ | सावंत अनिल दिवाकर | |
| २६ | मेहता डिंपल विनोद | २६ | मेहरा राजीव ओमप्रकाश | |
| २७ | शेट्टी अरविंद आनंद | २७ | भट दीप्ती शेखर | |
| २८ | गेहलोत हसमुख मोहनलाल | २८ | सपार उमा विश्वनाथ | |
| २९ | शिंदे रुपाली वसंत (मोदी) | २९ | अहमद साराह अकरम | |
| ३० | थेराडे संजय अनंत | ३० | इनामदार जुबेर अब्दुल्ला | |
| ३१ | मुखर्जी अनिता बबलू | ३१ | शेख अशरफ मोहम्मद इब्राहीम | |
| ३२ | वैती चंद्रकांत सिताराम | ३२ | गोविंद हेलन जॉर्जी | |
| ३३ | हसनाळे ज्योत्सना जालींदर | ३३ | बगाजी शर्मिला विन्सन्ट | |
| ३४ | पारधी सुजाता यशवंत | ३४ | बांड्या एलायस दुमिंग | |
| ३५ | म्हात्रे सचिन केसरीनाथ | | | |
| ३६ | यादव मिरादेवी रामलाल | | | |
| ३७ | म्हात्रे मोहन गोपाळ | | | |
| ३८ | सोनार सुरेखा प्रकाश | | | |
| ३९ | भोईर विणा सुर्यकांत | | | |
| ४० | म्हात्रे परशुराम पदमाकर | | | |
| ४१ | मांजरेकर आनंद दत्ताराम | | | |
| ४२ | अरोरा दीपिका पंकज | | | |
| ४३ | बेलानी हेमा राजेश | | | |
| ४४ | दळवी प्रशांत ज्ञानदेव | | | |
| ४५ | गजरे दौलत तुकाराम | | | |
| ४६ | नाईक विविता विवेक | | | |
| ४७ | सोंस नीला बर्नाड | | | |
| ४८ | राय विजयकुमार सिस्थन नारायण | | | |
| ४९ | परमार हेतल रतिलाल | | | |
| ५० | कासोदारिया अश्विन शामजीभाई | | | |
| ५१ | जैन दिनेश तेजराज | | | |
| ५२ | भावसार वंदना संजय | | | |
| ५३ | शाह सीमाबेन कमलेश | | | |
| ५४ | दुबे मनोज रामनारायण | | | |
| ५५ | विराणी अनिल रावजीभाई | | | |
| ५६ | भोईर जयेश भानुदास | | | |
| ५७ | म्हात्रे नयना गजानन | | | |
| ५८ | भानुशाली वर्षा गिरधर | | | |
| ५९ | म्हात्रे विनोद काशिनाथ | | | |

**ठराव बहुमताने मंजूर**

**सही** /-

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र. नगरसचिव :-**

**प्रकरण क्र. १४,** मिरारोड (पूर्व) आरक्षण क्र. २४९ (वाचनालय) इमारतीमधील जागा जिल्हाधिकारी, ठाणे यांना उपलब्ध करुन देणेबाबत.

**ज्योत्सना हसनाळे :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मिरारोड (पूर्व) कनकिया भागात आरक्षण क्र. 249 मध्ये विकासकाकडून समावेशक आरक्षणाच्या तरतूदीतून 1242.96 चौ.मिटर क्षेत्राची तळ + चार मजल्याची इमारत हस्तांतरीत झालेली आहे.

तहसिलदार, ठाणे यांनी सदर संपुर्ण इमारत शासकीय कामासाठी त्यांच्या ताब्यात सुपुर्द करण्यासाठी पत्रान्वये कळविलेले आहे. सदर जागेची मा.जिल्हाधिकारी यांनी समक्ष पहाणी केली असून सदर जागा हस्तांतरणासाठी पाठपुरावा करीत आहेत.

सदर इमारतीमधील जागेचे चालु बाजारभावानुसार (Ready Recknor) रू.5,09,010/- (रूपये पाच लक्ष नऊ हजार दहा मात्र) मासिक भाडे होत आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 79 ग मध्ये सन 2017 चा महाराष्ट्र अधिनियम क्र.53 अन्वये केलेल्या सुधारणेनुसार “आयुक्तास, महानगरपालिकेच्या मंजुरीने व राज्य शासनाच्या मान्यतेने, महानगरपालिकेच्या मालकीची जमीन, महाराष्ट्र शासनाच्या किंवा भारत सरकारच्या कोणत्याही विभागाला किंवा उपक्रमाला सार्वजनिक प्रयोजनासाठी अशा रितीने भाडेपट्टयाने देण्याकरीता नियम असलेल्या अधिमुल्यांचया भाडयाच्या, बाजार मुल्यापेक्षा किंवा इतर मोबदल्या पेक्षा कमी असले अशा भाडयाने आणि महानगरपालिका लादील अशा शर्तीस अधीन राहून तीस वर्षाहून अधिक होणार नाही इतक्या मुदतीकरीता भाडयापट्टयाने देता येईल” अशी तरतूद केली आहे.

मा.महापौर यांनी पत्र देऊन सदर जागा नव्याने निर्माण होणाऱ्या तहसिलदार कार्यालय तसेच कौशल्य विकास कार्यक्रमासाठी मा.जिल्हाधिकारी यांना हस्तांतर करण्यास व सदर प्रस्ताव मा.महासभेपुढे ठेवण्यासाठी कळविलेले आहे, त्यानुसार मा.महासभेच्या मान्यतेच्या व अटीशर्तीच्या अधिन राहून सदर जागा शासनास तात्पुरत्या स्वरूपात हस्तांतर करण्यात आलेली आहे.

तरी सदर जागेचे भाडे व अटीशर्ती ठरवुन करारनामा करण्यास मान्यता देणेचा प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने खालील निर्णय ठरावाद्वारे घेण्यात येत आहे.

**<u>ठराव</u>**

मिरारोड (पूर्व) आरक्षण क्र.249 (वाचनालय) ही जागा इमारतीसह तहसिलदार कार्यालय व इतर शासकीय वापरासाठी 11 वर्षे मुदतीसाठी मा.जिल्हाधिकारी, ठाणे यांना हस्तांतरीत करण्यास मान्यता देण्यात येत आहे. सदर जागेचे भाडे ठरविण्याचे अधिकार आयुक्त यांना देण्यात येत आहेत. सदर जागेचे भाडे ठरवुन जागा हस्तांतरास शासनाची मान्यता घेण्यात यावी. भविष्यात शासनामार्फत तहसिलदार कार्यालय बांधुन झाल्यावर सदर जागा परत घेण्यात यावी. त्याचप्रमाणे मा.जिल्हाधिकारी यांच्याकडून डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन (नगरभवन) ही इमारतीची जागा महानगरपालिकेच्या नावे हस्तांतर करून घेण्याच्या अटीशर्तीवर सदर जागा हस्तांतरीत करावी.

**दिनेश जैन :-**

**माझे अनुमोदन आहे.**

**मा. महापौर :-**

**ठराव मंजूर करण्यांत येत आहे.**

**प्रकरण क्र. १४ :-**

मिरारोड (पूर्व) आरक्षण क्र. २४९ (वाचनालय) इमारतीमधील जागा जिल्हाधिकारी, ठाणे यांना उपलब्ध करुन देणेबाबत.

**ठराव क्र. ११ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मिरारोड (पूर्व) कनकिया भागात आरक्षण क्र. 249 मध्ये विकासकाकडून समावेशक आरक्षणाच्या तरतूदीतून 1242.96 चौ.मिटर क्षेत्राची तळ + चार मजल्याची इमारत हस्तांतरीत झालेली आहे.

तहसिलदार, ठाणे यांनी सदर संपुर्ण इमारत शासकीय कामासाठी त्यांच्या ताब्यात सुपुर्द करण्यासाठी पत्रान्वये कळविलेले आहे. सदर जागेची मा.जिल्हाधिकारी यांनी समक्ष पहाणी केली असून सदर जागा हस्तांतरणासाठी पाठपुरावा करीत आहेत.

सदर इमारतीमधील जागेचे चालु बाजारभावानुसार (Ready Recknor) रू.5,09,010/- (रूपये पाच लक्ष नऊ हजार दहा मात्र) मासिक भाडे होत आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 79 ग मध्ये सन

2017 चा महाराष्ट्र अधिनियम क्र.53 अन्वये केलेल्या सुधारणेनुसार "आयुक्तास, महानगरपालिकेच्या मंजुरीने व राज्य शासनाच्या मान्यतेने, महानगरपालिकेच्या मालकीची जमीन, महाराष्ट्र शासनाच्या किंवा भारत सरकारच्या कोणत्याही विभागाला किंवा उपक्रमाला सार्वजनिक प्रयोजनासाठी अशा रितीने भाडेपट्टयाने देण्याकरीता नियम असलेल्या अधिमुल्यांचया भाडयाच्या, बाजार मुल्यापेक्षा किंवा इतर मोबदल्या पेक्षा कमी असले अशा भाडयाने आणि महानगरपालिका लादील अशा शर्तीस अधीन राहून तीस वर्षाहून अधिक होणार नाही इतक्या मुदतीकरीता भाडयापट्टयाने देता येईल" अशी तरतूद केली आहे.

मा.महापौर यांनी पत्र देऊन सदर जागा नव्याने निर्माण होणाऱ्या तहसिलदार कार्यालय तसेच कौशल्य विकास कार्यक्रमासाठी मा.जिल्हाधिकारी यांना हस्तांतर करण्यास व सदर प्रस्ताव मा.महासभेपुढे ठेवण्यासाठी कळविलेले आहे, त्यानुसार मा.महासभेच्या मान्यतेच्या व अटीशर्तीच्या अधिन राहून सदर जागा शासनास तात्पुरत्या स्वरूपात हस्तांतर करण्यात आलेली आहे.

तरी सदर जागेचे भाडे व अटीशर्ती ठरवुन करारनामा करण्यास मान्यता देणेचा प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने खालील निर्णय ठरावाद्वारे घेण्यात येत आहे.

**<u>ठराव</u>**

मिरारोड (पूर्व) आरक्षण क्र.249 (वाचनालय) ही जागा इमारतीसह तहसिलदार कार्यालय व इतर शासकीय वापरासाठी 11 वर्षे मुदतीसाठी मा.जिल्हाधिकारी, ठाणे यांना हस्तांतरीत करण्यास मान्यता देण्यात येत आहे. सदर जागेचे भाडे ठरविण्याचे अधिकार आयुक्त यांना देण्यात येत आहेत. सदर जागेचे भाडे ठरवुन जागा हस्तांतरास शासनाची मान्यता घेण्यात यावी. भविष्यात शासनामार्फत तहसिलदार कार्यालय बांधुन झाल्यावर सदर जागा परत घेण्यात यावी. त्याचप्रमाणे मा.जिल्हाधिकारी यांच्याकडून डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन (नगरभवन) ही इमारतीची जागा महानगरपालिकेच्या नावे हस्तांतर करून घेण्याच्या अटीशर्तीवर सदर जागा हस्तांतरीत करावी.

**सुचक** :- **श्रीम. ज्यो**त्स्ना हसनाळे अनुमोदक :- श्री. दिनेश तेजराज जैन

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही** /-

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र. नगरसचिव :-**

**प्रकरण क्र. १५,** वैद्यकिय विभागाकरीता आवश्यक औषधे, लॅब मटेरिअल, सर्जिकल मटेरिअल खरेदी करणेकरीता आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत.

सुरेश खंडेलवाल :-

**मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या वैद्यकीय विभागा अंतर्गत एकुण १० आरोग्य केंद्र / उपकेंद्र, भारतरत्न इंदिरा गांधी रुग्णालय व भारतरत्न पंडीत भिमसेन जोशी रुग्णालय कार्यरत आहे. याकरिता आवश्यक औषधे, लॅब मटेरिअल, सर्जिकल मटेरिअल करीता याआधी मागविण्यात आलेल्या निविदांची मुदत संपलेली असल्यामुळे आरोग्य केंद्र व रुग्णालय सुरळीत चालण्याकरिता औषधे, लॅब मटेरिअल, सर्जिकल मटेरिअल यांची नव्याने निविदा मागविणे आवश्यक आहे. आवश्यक औषधे, लॅब मटेरिअल, सर्जिकल मटेरिअल यांची यादी सोबत जोडली आहे.**

**सन २०१७-१८ या वर्षासाठी औषधे खरेदीकरिता रु. १,००,००,०००/- रुग्णालय साहीत्य देखभाल/दुरुस्ती करिता रु. १,५०,००,०००/- श्वानदंश/ सर्पदंश/ काविळ लस खेरदी करिता रु. २०,००,०००/- अंदाज खर्च अपेक्षीत आहे.**

**ठराव - प्रशासनाने दिलेल्या गोषवाऱ्यानुसार महानगरपालिकेच्या वैद्यकीय विभागाकरिता आवश्यक औषधे, लॅब मटेरिअल, सर्जिकल मटेरिअल निविदा मागवुन खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या खर्चास ही सभा आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देत आहे.**

**वरील कामी निविदा तात्काळ काढाव्यात, सदर ठरावाची अमंलबजावणी ठरावाची वाट न बघता त्वरीत करण्यात यावी.**

वर्षा भानुशाली :-

**माझे अनुमोदन आहे.**

अनिल सावंत :-

**महापौर मॅडम, प्रशासनाने जो गोषवारा दिलेला आहे. साहित्य देखभाल दुरुस्ती १.५० करोड सोबत त्यांनी सांगितले होते आम्ही यादी देतो त्यांनी यादी दिलेली नाही. अस कुठच साहित्य आहे की त्याला १.५० करोड फक्त देखभाल दुरुस्तीसाठी खर्च होणार आहे. बऱ्याचशा आपण मशीन घेतो त्या कॉन्ट्रॅक्टमध्ये**

असतात. वॉरंटीमध्ये असतात मग हे १.५० करोड रुपये कुठे खर्च होणार आहेत? प्रशासनाने गोषवारा देतेवेळी जरा सरळ-सरळ माहिती पडेल ना कुठची मशीन आहे तिला देखभालीसाठी एवढे खर्च येणार आहेत. आज आपल्याकडे परिस्थिती अशी आहे किती डॉक्टरांवर कारवाई चालु आहे. एम.बी.बी.एस. डॉक्टरला एक वर्षापासून सॅनेटरी इन्स्पेक्टर बनवून ठेवलेला आहे. डॉक्टरांचा तुटवडा आहे. डॉक्टर येत नाही आहेत. ही वस्तुस्थिती आहे. आणि त्यांनी सांगितल होत आम्ही गोषवाऱ्यामध्ये आम्ही यादी देतो त्यांनी यादी का दिली नाही? सदस्यांनी अभ्यास केला असता.

मा. महापौर :-

खुलासा करत आहेत.

संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो आपण सचिव विभागामध्ये यादी दिली होती सविस्तर यादी दिली होती.

अनिल सावंत :-

सचिव विभागाने कुठे दिली नाही. हा बघा मॅडम असा कारभार आहे. आरोग्य विभाग म्हणतो सचिव विभागाकडे सचिव विभाग म्हणतो माझ्या जवळ नाही आहे. आणि सदस्यांना पत्ताच नाही. स्पष्टीकरण द्यायचे असेल तर द्या नाहीतर मी ठराव मांडतो. डिटेल विषय घेऊन या. पुढच्या सभेमध्ये घेऊ या.

संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-

सर्व सदस्यांना यादी देण्यात येईल. मी सचिव विभागामध्ये दिली होती नसेल मिळाली तर...........

अनिल सावंत :-

साहेब जरा मेजर हेड सांगा ना. १.५० करोड रुपये देखभाल दुरुस्तीसाठी कुठे खर्च होणार आहेत.

संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-

डिटेल सविस्तर अहवालात आहे साहेब.

अनिल सावंत :-

तुम्हाला तर माहिती असेल ना डी.एम.सी. साहेब कुठल्या मशीन आहेत.

संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-

आहेत तुम्हाला देतो.

अनिल सावंत :-

१.५०, २.०० करोड सांगा एक दोन मशीन. डायलेसिस मशीन घ्यायला आपल्याकडे पैसे नाहीत आमदार निधीमधून आपण मशीन घेतो आणि १.५० करोड रुपये तुम्ही मेन्टनन्ससाठी विषय आणता.

संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-

मोठा खर्च आहे. एक्सरे मशीन आहेत. ५-६ मशीन आहेत. एक्सरे मशीन आहेत, सोनोग्राफी आहेत अशा वेगवेगळ्या आहेत.

अनिल सावंत :-

याचे स्पष्टीकरण द्या तुम्ही मी ठराव मांडत नाही.

संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-

ठिक आहे.

स्नेहा पांडे :-

महापौर मॅडम इस निविदा का मुदत कभी खत्म हुआ है? ऐसे लिखा हुआ है की मुदत खत्म हो चुकी है। तो कबसे खत्म हुई है। इसकी मुदत यह जो औषधी हमने खरीदी है पिछली बार वह कब खत्म हो गई है?

संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-

एक दिड महिना चलेगी हमारे पास है।

स्नेहा पांडे :-

और दुसरा मेरा यह विषय है की कौनसे रोग के लिए अपना जादा कौनसा दवाई ले रहे है और इस वक्त मिरा भाईंदर शहर में कौनसा रोगराई ज्यादा फैला हुआ है? इसके उपर एक मेरा प्रश्न है की इसकी कुछ यादी या कुछ स्टडी अपने आरोग्य विभाग के पास है क्या? और दुसरा विषय यह है की सर्पदंश की दवा इसमें मेन्शन है तो वह यादी मुझे जरा जानना है की मिरा भाईंदर में सर्पदंश के पुरे वर्ष में कितने किसेस होते है?

संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-

हमारे पास यादी है।

मा. महापौर :-

आपको यादी मिल जाएगी। ठराव मंजूर. पुढचा विषय घ्या.

**प्रकरण क्र. १५ :-**

वैद्यकिय विभागाकरीता आवश्यक औषधे, लॅब मटेरिअल, सर्जिकल मटेरिअल खरेदी करणेकरीता आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत.

ठराव क्र. १२ :-

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या वैद्यकीय विभागा अंतर्गत एकुण १० आरोग्य केंद्र / उपकेंद्र, भारतरत्न इंदिरा गांधी रुग्णालय व भारतरत्न पंडीत भिमसेन जोशी रुग्णालय कार्यरत आहे. याकरिता आवश्यक औषधे, लॅब मटेरिअल, सर्जिकल मटेरिअल करीता याआधी मागविण्यात आलेल्या निविदांची मुदत संपलेली असल्यामुळे आरोग्य केंद्र व रुग्णालय सुरळीत चालण्याकरिता औषधे, लॅब मटेरिअल, सर्जिकल मटेरिअल यांची नव्याने निविदा मागविणे आवश्यक आहे. आवश्यक औषधे, लॅब मटेरिअल, सर्जिकल मटेरिअल यांची यादी सोबत जोडली आहे.

सन २०१७-१८ या वर्षासाठी औषधे खरेदीकरिता रु. १,००,००,०००/- रुग्णालय साहीत्य देखभाल/दुरुस्ती करिता रु. १,५०,००,०००/- श्वानदंश/ सर्पदंश/ काविळ लस खेरदी करिता रु. २०,००,०००/- अंदाज खर्च अपेक्षीत आहे.

ठराव :-

प्रशासनाने दिलेल्या गोषवाऱ्यानुसार महानगरपालिकेच्या वैद्यकीय विभागाकरिता आवश्यक औषधे, लॅब मटेरिअल, सर्जिकल मटेरिअल निविदा मागवुन खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या खर्चास ही सभा आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देत आहे.

वरील कामी निविदा तात्काळ काढाव्यात, सदर ठरावाची अमंलबजावणी ठरावाची वाट न बघता त्वरीत करण्यात यावी.

सुचक :- श्री. सुरेश खंडेलवाल अनुमोदक :- श्रीम. वर्षा भानुशाली

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्र. नगरसचिव :-

**प्रकरण क्र. १६,** भाईंदर (प.) येथील अग्निशमन केंद्र इमारतीमध्ये बदल करुन मार्केट इमारत बांधणे कामाऐवजी समाजिक सभागृह बांधणेबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

**राजेंद्र जैन :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात भाईंदर पश्चिम डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्गालगत अग्निशमन केंद्र व अग्निशमन विभागाचे मुख्यालय आहे. सद्यस्थितीत भाईंदर (प.) रेल्वे समांतर रस्त्यावर आरक्षण क्र. 132 या जागेत नव्याने अग्निशमन केंद्र इमारत बांधल्याने सद्यस्थितीत असलेले अग्निशमन विभाग मुख्यालय नवीन इमारतीत स्थलांतरीत करण्यात येणार आहे. मा. महासभा दि. 01/07/2015 ठराव क्र. 16 अन्वये सदर अग्निशमन केंद्र इमारत रिकामी होणार असल्याने सदर अग्निशमन केंद्र इमारतीत बदल करुन वाढीव जागेसह मार्केट बांधणे कामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय व आर्थीक मान्यता देण्यात आली होती. त्यानुसार विहीत निविदा प्रक्रीया करुन मा. स्थायी समिती दि. 11/08/2016 ठराव क्र. 54 च्या मे. स्पार्क सिव्हील इन्फ्रा प्रोजेक्ट या कंत्राटदारास दि. 20/09/2016 रोजी कार्यादेश देण्यात आलेले होते. तथापी सदर ठिकाणी मार्केट सुरु करण्यासाठी स्थानिक रहीवाशांमार्फत विरोध झाल्याने सदर काम सुरु करता आलेले नाही. सदर कामाबाबत मा. महापौर महोदया यांच्या दालनात दि.27/09/2017 रोजी बैठक होऊन मा. महापौर महोदयाकडुन सदर मार्केट इमारतीचे मंजुर झालेले काम रद्द करुन सदर ठिकाणी सामाजिक सभागृह बांधणेसाठी नकाशे व अंदाजपत्रक तयार करुन मा. महासभेपुढे सादर करण्याकरीता कळविण्यात आलेले आहे. सदर प्रस्तावास अनुसरून खालील निर्णय ठरावाव्दारे घेण्यात येत आहे.

<u>ठराव</u>

1) भाईंदर पश्चिम भागात महानगरपालिकेचे नगरभवन येथील सभागृह वगळता एकही सभागृह नाही. अग्निशमन केंद्राचे मुख्यालय असलेल्या भागात मार्केटसाठी शहरातील असलेला रस्ता अरूंद असल्याने व सदर भाग हा रहिवाशी असल्याने वाहतुकीची कोंडी होणार आहे. तरी सदर ठिकाणी यापुर्वी मंजूर केलेला मार्केट बांधण्याचा प्रस्ताव रद्द करण्यात येत असून कंत्राटदारास देण्यात आलेले कार्यादेश रद्द करण्यात यावे. सदर जागेत सामाजिक सभागृह बांधण्यासाठी आवश्यक नकाशे व अंदाजपत्रक सल्लागारामार्फत तयार करून घेण्यात यावे. तसेच नविन अंदाजपत्रकानुसार नव्याने निविदा प्रक्रिया करण्यास व खर्चास ही सभा प्रशासकीय व आर्थिक मान्यता देत आहे.

2) त्याचप्रमाणे भाईंदर (पूर्व) खारीगाव येथील मासळी मार्केट इमारतीमधील जागा महानगरपालिकेने जागा मालकाकडून विकत घेतलेली असून सदर मार्केटची अत्यंत दुरावस्था झालेली आहे. सदर ठिकाणी तळ मजल्याची मार्केट शेड बांधण्यासाठी रु.64,39,542/- रकमेचे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले असून सदर खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे.

3) भाईंदर (पूर्व) मौजे खारी आरक्षण क्र. 108 या जागेत मार्केट बांधण्याचे काम मंजूर झालेले आहे, तथापी महानगरपालिकेमार्फत यापूर्वी बांधण्यात आलेल्या आरसीसी तळ अधिक एक मजल्याच्या मार्केट चा विकेत्यांमार्फत सुरु होऊ शकला नाही. त्यामुळे मार्केटचा वापर होण्याच्या दृष्टीने सदर मार्केटच्या डीझाईन मध्ये बदल करुन तळमजल्यावर मार्केट शेड बांधण्यासाठी अंदाजपत्रक तयार करुन मंजूर दरानूसार कंत्राटदारास नविन डिझाईन देऊन काम करुन घेण्यास ही सभा मान्यता देत आहे.

सुशील अग्रवाल :-

माझे अनुमोदन आहे.

निलम ढवण :-

महापौर मॅडम आता जो ठराव वाचला गेला भाईंदर पश्चिम फायर बिग्रेडच्या इथे मार्केट इमारत बांधण्या संदर्भात मला विशेष वाटत आहे की त्यावेळी तिथे लोकांचा विरोध असताना आमच्या स्थानिक नगरसेविका शुभांगी कोटीयन, लोकांच्या बाजूने जो प्रस्ताव मार्केट बांधू नये म्हणून मागणी करत होत्या परंतु त्यावेळी आपण तो प्रस्ताव मान्य करुन घेतला. आता कळलय की समाज मंदिर ठिक आहे तो भाईंदर पश्चिमेचा विषय आहे. मगाशी जो विषय झाला की स्टॅन्डींग समितीमध्ये नामकरणाचा इथे पास झाल्यामुळे तुम्ही तो विषय महासभेत घेऊन झालेला आहे. म्हणून मगाशी मी तुम्हाला प्रश्न विचारला होता की जर हा नियम तुम्ही सगळ्यांसाठी वापरणार का? त्याचे कारण ह्या ठरावामध्ये विषय आहे भाईंदर पश्चिमेचा आणि ह्या ठरावामध्ये भाईंदर पूर्व आरक्षण क्र. १०८ इथे मार्केटची एक इमारत बांधण्यासाठी स्थायी समिती म्हणा, निविदा सगळ्या काढून झाल्या. पाच वेळा स्थायी समितीची मंजूरी झाली. सगळ्या मंजुऱ्या झाल्या महासभेपासून त्यानंतर ६ जुनमध्ये त्यांना वर्क ऑर्डर पण दिली गेली आहे. त्या कामाला आता सुरुवात झालेली आहे. आणि असे असताना ते ठराव ते काम रद्द करा आता पुन्हा ठराव तुम्ही कसे करु शकतात. आज फेरिवाल्यांना एवढा मोठा प्रश्न आहे. नवघर रोडला सगळीकडे आहे परंतु विशेषतः नवघर रोडचा मी उल्लेख करेन की त्या ठिकाणी फेरिवाल्यांचा प्रश्न असताना त्यांना जर पर्यायी व्यवस्था म्हणून इथे मार्केटचे आरक्षण असताना तिथे जर मार्केट बांधकाम चालु झाले असताना परत तुम्ही ते रद्द करण्यासाठी का घेतलं?

(सभागृहात गोंधळ)

सुरेश खंडेलवाल :-

आपने पुछा इनकी कोई शंका है जिसकी भी शंका है एकही साथ प्रशासन जवाब देगा। सभी आप अलग पुछेंगे फिर प्रशासन देगा..............

निलम ढवण :-

खंडेलवाल ते पण तुम्ही बोलणार महापौरांना काही तर बोलू द्या.

हरिश्चंद्र आमगावकर :-

महापौर मॅडम विषय ढवण मॅडमचा आहे. तुम्ही ध्रुवकिशोर पाटीलला नेहमी प्रत्येक वेळेला सांगतात तुम्ही बोला. उत्तर तुम्हाला द्यायचे आहे.

मा. महापौर :-

मी तुम्हालाही वेळ देते आणि त्यांना पण वेळ देते. मैं सबको टाईम देती हूँ।

(सभागृहात गोंधळ)

मा. उपमहापौर :-

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो हा जो विषय आलेला आहे. अग्निशमन केंद्र हे मुख्यालय आपल्याला तिथुन आपण सद्यस्थितीमध्ये भाईंदर पश्चिम रेल्वे समांतर रस्त्यावर आरक्षण क्र. १३२ ह्या नव्या जागेवर इमारत बांधल्याने असलेले अग्निशमनचे कार्यालय आहे. त्याठिकाणी मार्केट बनविण्याचा ठराव होता. मार्केट बनविण्याचा जेव्हा विचार केला त्यावेळेला. तिथल्या रहिवाशांचा फार मोठ्या प्रमाणात विरोध सुरु झाला. त्यांनी तशा मागण्या केल्या बर आपण ज्या पध्दतीने मार्केट सुचविलेले आहे. त्या इमारतीसाठी लागणारा जो खर्च आहे तो करोडो रुपयांचा खर्च आहे. आणि आपल्याला मार्केटसाठी आपण दोन माळ्याची, तीन माळ्यांची, चार माळ्यांची बिल्डींग बांधली. त्याच्यामध्ये मार्केटसाठीचे विक्रेते येऊन बसले त्यांच्याकडून मेन्टनन्सच्या स्वरुपामध्ये आपण काय घेणार आहोत ५० रु., १०० रुपये म्हणजे त्यांची पावती आपण देऊ परंतु तो मार्केटचा उपयोग होत नाही. आपल्याला उलट त्या इमारतीचा खर्च आर्थिक त्याच्या मेन्टनन्सचा खर्च आणि उत्पादन आपल्याला काही होणार नाही असा विषय होता. त्याच्यामध्ये अशी नोंद आहे ते व्यवस्थित वाचा की मे. स्पार्क सिव्हील इन्फ्रा प्रोजेक्ट ह्या कॉन्ट्रॅक्टदारास दि. २०/०९/२०१६ रोजी कार्यादेश देण्यांत आलेले आहेत. तथापि सदर ठिकाणी मार्केट सुरु करण्यासाठी स्थानिक रहिवाश्यांमार्फत विरोध झाल्याने सदर काम सुरु करता आलेले नाही आणि म्हणून आता आपण असे ठरवलेले आहे की............

निलम ढवण :-

हे कुठच सांगत आहेत हे भाईंदर पश्चिमचे सांगत आहेत ना.

मा. उपमहापौर :-

हो.

निलम ढवण :-

पण माझा विषय भाईंदर पश्चिमेचा नाही साहेब. मी भाईंदर पूर्वेचे बोलत आहे.

मा. उपमहापौर :-

एका मार्केटच्या ठिकाणी आपण सामाजिक उपक्रमासाठी सभागृह बांधण्याचे ठरविण्यात आलेले आहे.

निलम ढवण :-

हरकत नाही.

मा. उपमहापौर :-

तुमचा विषय आहे तो याच्याशी संबंधित नाही.

निलम ढवण :-

नाही आहे.

मा. उपमहापौर :-

हा विषय आहे म्हणून तुम्ही विषय काढत असाल.

निलम ढवण :-

मी नाही काढत आहे. मी तुमच्या निदर्शनास आणून देत आहे. ह्या ठरावात शेवटी नोट्स टाकलेली आहे. दोन ठिकाणची रद्द करत आहेत. ठराव वाचला म्हणून मी बोलत आहे. तुमच्या भाईंदर पश्चिमेच्या विषयाशी मी अजिबात विरोध नाही किंवा मला त्या विषयावर तुमच एक्स्प्लेनेशन नको आहे. कारण ढक्स्पलेनेशन काय असणार मागच्या वेळी आमचे नगरसेविका तेव्हा आमच्या नगरसेविकेला विरोध केला गेला होता. ती तेव्हा सांगत होती की इथे मार्केट नको लोकांचा विरोध आहे. तेव्हा तिचा विरोध डावलून हे मार्केट तुम्हीच पास केल त्यांच्यात त्यांनी ठराव केलेला आहे.

मा. उपमहापौर :-

तुमचा ठरावाला कुठे विरोध आहे. तुमचा ईस्टच्या कामाला कुठे विरोध आहे.

निलम ढवण :-

तुम्ही बघा ना त्यांनी ठरावात काय वाचल ठराव काय वाचला विचारा.

मा. उपमहापौर :-

ठराव माझ्याकडे आलेला आहे.

निलम ढवण :-

शेवटचे काय लिहिलेले आहे.

मा. उपमहापौर :-

ठरावात शेवटची ओळ अशी आहे की भाईंदर पूर्व मौजे खारी आरक्षण क्र. १०८ जागेत मार्केट बांधण्याचे काम मंजूर झालेले आहे. तथापि महापालिकेमार्फत ह्यापूर्वी बांधण्यात आलेल्या आर.सी.सी. तळ अधिक एक मजल्याला मार्केटच्या विक्रेत्यामार्फत सुरु होऊ शकला नाही त्यामुळे मार्केटचा वापर होण्याच्या दृष्टीने सदर मार्केटचा डिझाईनमध्ये बदल करुन तळ मजला मार्केट शेड बांधण्यासाठी अंदाजपत्रक तयार करुन मंजूर दरानुसार कंत्राटदारास नविन डिझाईन देऊन काम करुन घेण्यास ही सभा मान्यता देण्यात येत आहे.

निलम ढवण :-

ठिक आहे. रद्द नाही केल रद्द नाही म्हणजे रद्द झाले ना ते. याचा अर्थ नविन इस्टीमेट काढणार पहिल रद्द झाले आहे. याचा अर्थ अस खा नाहीतर अस खा. पारदर्शकता ठेवा दुसरी गोष्ट अशी आहे की तुम्ही सांगत आहेत की अशी घर बांधलेली आहेत त्याचा वापर झाला नाही ते वापर करण्यासाठी त्याच्यावर किती काय केल गेल आहे. प्रशासनातर्फे कुणाला माहिती तरी आहे कुठे बिल्डींग बांधल्या मार्केटच्या? आम्हाला माहिती नाही ह्या शहरात कुठे-कुठे बिल्डींग बांधल्या आहेत. कुठे इमारती बांधल्या आहेत. तुम्ही का नाही त्या फेरिवाल्यांवर हे केल त्यांच्यासाठी काय तरतूद केली सांगा. त्यांच्यावर काय कारवाई केली? चालु होत नाही फक्त मनात जे पाहिजे आपल्याला पाहिजे ते करायचं आणि पूर्वी जेव्हा ४-५ वेळा ही निविदा झाली तेव्हा प्रशासनाच्या निदर्शनास आले नाही. काम चालू झाल्यानंतर परत नविन इस्टीमेट काढायला सांगता ही दडपशाही आहे. मार्केटच्या हेडखाली तरतुद आहे.

राजेंद्र जैन :-

महापौर मॅडम जैसे की वैती साहबने स्पष्ट किया है आपका पहिले जो इस्टीमेट था वह बहुत कॉस्टली था। शासन को खर्चा था वहाँ जो लोग आ रहे थे उस समय मेन्टेनन्स नही चल रहा था इसलिए उसका डिझाईन चेंज किया है.............

निलम ढवण :-

मार्केट के उपर खर्चा होता है वह दिखता है। और यह सभागृह जब दालन बना रहा है उसके लिए इतना खर्चा कर रहा है उसका क्या?

राजेंद्र जैन :-

हम बोल क्या रहे है पहिले आप सुनो।

निलम ढवण :-

मार्केट के लिए यह फेरिवालो का सवाल है ना वह मेरे वॉर्ड का काम है। मला अस सांगा मॅडम काम चालु झाल्यानंतर त्याचे इस्टीमेट परत चेंज होऊ शकते?

राजेंद्र जैन :-

हो सकता है महासभा बहुमत से बहुत कुछ कर सकती है।

निलम ढवण :-

महासभा तुम्ही काहीही करु शकणार आहेत. सत्तेचा दुरुपयोग आहे तुम्ही काहीही करु शकणार.

राजेंद्र जैन :-

जनताने मेजोरीटी दिया है। महासभा सक्षम आहे.

निलम ढवण :-

सक्षम तुम्ही आहात किती ते आम्हाला माहिती आहे. मेजोरीटीवर पास करायला.

(सभागृहात गोंधळ)

राजेंद्र जैन :-

जनता का वोट है इनको।

निलम ढवण :-

महापौर मॅडम माझ्या वॉर्डातल्या आरक्षण क्र. १०८ आहे त्याचे काम चालु झालेले आहे. त्यासंदर्भात मी प्रश्न विचारलेले आहेत. पाच वेळा रिकॉल करुन जुन महिन्यात त्याची वर्क ऑर्डर मिळाली. त्यानंतर कामाला सुरुवात झाली. ते आता स्टॉप करुन त्याचे इस्टीमेट तुम्ही बदलणार याचा अर्थ पहिले टेंडर कॅन्सल करणार हे तुम्ही करु शकता का? आयुक्त साहेब त्यांनी ह्या ठरावात विषय असा घेतलेला आहे म्हणून मी प्रश्न विचारत आहे. म्हणजे विकासकाकडे लक्ष नाही आपल्याला जे पाहिजे ती मनमानी करायची. फेरीवाल्यांवर कधी विचार केला लोकांच्या एवढ्या कम्पलेन्ट आहेत त्याच्याकडे कधी बघितलं.

राजेंद्र जैन :-

आप करे वो राज हम करे वो मनमानी।

निलम ढवण :-

ही मनमानीच आहे. आम्ही राज नाही करत. आम्ही योग्य असेल ते करतो.

सुरेश खंडेलवाल :-

आता कसे आहे तुम्ही पण तेव्हा सत्तेमध्ये असताना सुध्दा........

निलम ढवण :-

मी माझ्या विषयावर महापौर मॅडम आणि आयुक्त साहेबांशी बोलते मध्ये कोणी बोलू नये.

सुरेश खंडेलवाल :-

चांगली गोष्ट आहे ठिक आहे.

निलम ढवण :-

मध्ये कोणी बोलू नये महापौर मॅडम आणि आयुक्त साहेब त्याला उत्तर देतील.

दिपक खांबित :-

महापौरांच्या परवानगीने बोलतो विषय जो आहे तो अग्निशमन केंद्राच्या इकडे आपण मार्केटचे काम मंजूर केलेले होते ते रद्द करुन त्या ठिकाणी हॉल बांधायचा आहे आणि बाकीचा जो काही ठराव झालेला आहे ठरावाची प्रत आल्यावरती प्रशासनामार्फत तपासणी करुन त्याबाबत योग्य तो निर्णय घेण्यात येईल.

निलम ढवण :-

ठिक आहे. धन्यवाद.

स्नेहा पांडे :-

महापौर मॅडम, मार्केट आरक्षण बदली करके सभागृह बनाने जा रहे है पुरे मिरा भाईंदर में हॉकर्स की क्या स्थिती है। हॉकर्स पे कारवाई हो रही है, उनके लिए अपने मार्केट की व्यवस्था मार्केट के जितने भी रिझर्व्हेशन है उसपे अतिक्रमण किए हुए है। मैं उदाहरण के लिए बोलना चाहती हूँ मिरारोड के हैदरी चौक पे अपना मार्केट रिझर्व्हेशन था। उसपे आज अतिक्रमण हुआ है। उसको आपने हटाया नही है हॉकर्स पे कारवाई क्यो होती है।

निलम ढवण :-

मिरा भाईंदर हद्दीतील भाईंदर पूर्व आरक्षण क्र. १०८ विकास योजनेतील मार्केट विकसित करणेकामी ५ वेळा निविदा काढून दि. ३/०६/२०१७ रोजी कार्यादेश देण्यात आला आहे. सदर कामाचे कार्यादेश देऊन कामास सुरुवात झालेली आहे. सध्या नवघर रोड परिसरात फेरिवाल्यांचा प्रश्न फार मोठा गंभीर असून त्यापासून नागरिकांना होणारा त्रास यावर या मार्केट बांधणीमुळे पर्याय निर्माण होणार असून हे मार्केट बांधणे अत्यंत आवश्यक आहे. तरी सदर आरक्षण क्र. १०८ मार्केटचे काम दि. ३/०६/२०१७ च्या कार्यादेशानुसार चालू ठेवण्यात यावे अशी सूचना मांडत आहे.

जुबेर इनामदार :-

आयुक्त महोदय, प्रस्तावित मार्केट १ कोटी १७ लाख त्याला स्थायी समितीने मंजूरी दिलेली आहे. १ कोटी १७ लाखाची दि ४/०६/२०१६ रोजी टेंडरींग प्रोसिजर झाली दि. २७/०४/२०१६ रोजी म्हणजे ही पूर्ण

प्रक्रिया कम्पलीट झालेली आहे. सगळ काही विरोध समोर असताना तुम्ही प्रक्रियेला पूर्ण केलेले आहे. प्रशासनाने आज हा विषय परत तोच येतो की महापौरांकडे काही लोक आलेत काहींनी तक्रार केली. आम्हाला तिकडे मार्केट नको आहे. त्या लोकांना तिथे समाज मंदिर सुध्दा नको आहे. त्यांना मैदानच पाहिजे ही खरी वस्तुस्थिती आहे. आणि मार्केट करायचे असेल तर आपल्याकडे भाईंदर वेस्टमध्ये आरक्षण आहे ६८ चे आरक्षण आपल्याकडे मार्केटचे आहे. त्याच्यावर का स्थलांतरीत करत नाही. ह्याप्रकारे आपण १३२ नंबरमध्ये सध्या असलेले फायर स्टेशन आपण १३२ मध्ये स्थलांतरीत करतो त्या आरक्षणाची जागा आहे. तसेच आरक्षण भाईंदर पश्चिमेमध्ये ६८ नंबरचे महापालिकेचे आहे. ही माझी सुचना आहे ते मार्केट जसेच्या तसे तुम्हाला फक्त स्थलांतरीत करायचे आहे. त्या मार्केटचा निधी कारण परत तुम्ही काढायला गेलात नविन तर परत कॉस्ट एस्कलेशन होणार आहे. ह्याच किंमतीमध्ये साहेब मार्केट तयार होईल. आणि लोकांना त्याचा फायदा होईल ही माझी सुचना आहे.

दिनेश जैन :-

महापौर मॅडम आमचे प्रभाग २० मध्ये जे सोमवार मार्केट इललिगल बेकायदेशीर जे बसलेले आहेत त्याच्यावरती आम्ही वारंवार सांगुन पण कारवाई केलेली नाही. याच्यामध्ये सुचना म्हणून त्याच्यावरती पण आपण कारवाई करायला पाहिजे.

स्नेहा पांडे :-

मॅडम अभी कारवाई हॉकर्स बेठेंगे उसपर कारवाई होगी और उनको मार्केट उपलब्ध करके देगा नही तो इसका क्या रास्ता है बताईए। आप लोगो के बारे में गरीब हॉकर्स के बारे में कभी विचार नही करेंगे।

जुबेर इनामदार :-

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात भाईंदर पश्चिम डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्गालगत अग्निशमन केंद्र व अग्निशमन विभागाचे मुख्यालय आहे. सद्यस्थितीत भाईंदर (प.) रेल्वे समांतर रस्त्यावर आरक्षण क्र. 132 या जागेत नव्याने अग्निशमन केंद्र इमारत बांधल्याने सद्यस्थितीत असलेल्या अग्निशमन विभाग मुख्यालय नवीन इमारतीत स्थलांतरीत करण्यात येणार आहे. मा. महासभा दि. 01/07/2015 ठराव क्र. 16 अन्वये सदर अग्निशमन केंद्र इमारत रिकामी होणार असल्याने सदर अग्निशमन केंद्र इमारतीत बदल करुन वाढीव जागेसह मार्केट बांधणे कामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय व आर्थीक मान्यता देण्यात आली होती. त्याला अधिन राहून विविध निविदा प्रक्रिया करण्यांत आल्या व ठेकेदाराना कार्यादेशही प्रदान करण्यांत आलेले आहे. सदर ठिकाणी मार्केट सुरु करण्यासाठी स्थानिक रहीवाशांमार्फत विरोध झाल्याने सदर काम सुरु करता आलेले नाही. या विषयी मा. महापौरांनी दि.27/09/2017 रोजी बैठक घेऊन मार्केट इमारतीचे काम रद्द करुन सामाजिक सभागृह बांधण्याची शिफारस केली व कार्यपध्दतीन अनुसार बांधकामासाठी नकाशे व अंदाजपत्रक तयार करुन मा. महासभेची मंजुरी घेण्याची सुचना केली.

वरील बाबीचा अवलोकन केले असता प्रथम दर्शनी हे स्पष्ट दिसुन येत आहे. स्थानिक लोकांचा तिथे कोणत्याही प्रकाराच्या बांधकामाला विरोध आहे तरी सदर विषयाचे योग्य चौकशी करुन हा विषय महासभेच्या आर्थिक व प्रशासकीय मंजूरीसाठी फेर सादर करावे. तसेच मार्केट इमारत बांधकाम आरक्षण क्र. ६८ मार्केट मध्ये स्थलांतरीत करण्यांत यावे असा ठराव मांडत आहे.

प्रविण पाटील :-

माझे अनुमोदन आहे.

मा. महापौर :-

दोन ठराव आलेले आहेत. सचिव महोदय मतदान घ्या.

निलम ढवण :-

महापौर मॅडम, माझी सुचना पहिल्या ठरावाबरोबर घ्यायची का तर ज्यावेळी पहिला नियम तुम्ही नामकरणाच्या वेळी जो लावलेले आहेत ते नियम यालाही लागू होतात त्यामुळे हा भेदभाव तुम्ही करु नका. हे तुमच्या ह्या सगळ्या कृतितून तुमचे कामकाज काय आहे हे सगळ्यांच्या निदर्शनास येईल बाहेर पत्रकार पण बसलेले आहेतच. त्यामुळे योग्य तो निर्णय आपण घ्यावा.

मा. महापौर :-

आमच्या ठरावामध्ये सुचना घेत नाही.

निलम ढवण :-

घेत नाही कशी.

ध्रुवकिशोर पाटील :-

तो आमचा अधिकार आहे.

निलम ढवण :-

तुम्ही सत्तेचा दुरुपयोग करत आहेत.

मा. महापौर :-

सचिव महोदय मतदान घ्या.

जुबेर इनामदार :-

**मी हे पत्र दिलेले आहे मला त्याचे उत्तर द्या. तुम्ही सभागृहामध्ये चर्चा करायला त्याची संधी द्याल किंवा नाही कारण तो माझा हरकतीचा मुद्दा आहे. आणि सभा कामकाज नियम उपविधी स्पष्ट उल्लेख करते की मला ती संधी मिळालीच पाहिजे.**

प्र. नगरसचिव :-

**प्रकरण क्र. १६ साठी दोन ठराव आलेले आहेत. पहिला ठराव सुचक डॉ. राजेंद्र जैन, अनुमोदन श्री. सुरेश खंडेलवाल. दुसरा ठराव सुचक श्री. जुबेर इनामदार अनुमोदन श्री. प्रविण पाटील. ह्या ठरावामध्ये श्रीम. निलम ढवण यांची सुचना आहे. प्रथम मी दुसरा ठराव मतदानास टाकतो. सुचक श्री. जुबेर इनामदार यांच्या बाजूने असतील त्यांनी हात वर करायचे आहेत, ह्या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत, तटस्थ कोणी असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. सुचक डॉ. राजेंद्र जैन ह्यांच्या ठरावाच्या बाजूने असतील त्यांनी हात वर करायचे आहेत, ह्या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत, तटस्थ कोणी असतील त्यांनी हात वर करायचे आहेत.**

मा. महापौर :-

**सुचक डॉ. राजेंद्र जैन यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने ५९, विरोधात ३४, तटस्थ ० इतकी मते पडलेली आहेत. डॉ. राजेंद्र जैन यांनी मांडलेला ठराव बहुमतांनी मंजूर करण्यांत येत आहे.**

**प्रकरण क्र. १६ :-**

भाईंदर (प.) येथील अग्निशमन केंद्र इमारतीमध्ये बदल करुन मार्केट इमारत बांधणे कामाऐवजी समाजिक सभागृह बांधणेबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

**ठराव क्र. १३ :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात भाईंदर पश्चिम डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्गालगत अग्निशमन केंद्र व अग्निशमन विभागाचे मुख्यालय आहे. सद्यस्थितीत भाईंदर (प.) रेल्वे समांतर रस्त्यावर आरक्षण क्र. 132 या जागेत नव्याने अग्निशमन केंद्र इमारत बांधल्याने सद्यस्थितीत असलेले अग्निशमन विभाग मुख्यालय नवीन इमारतीत स्थलांतरीत करण्यात येणार आहे. मा. महासभा दि. 01/07/2015 ठराव क्र. 16 अन्वये सदर अग्निशमन केंद्र इमारत रिकामी होणार असल्याने सदर अग्निशमन केंद्र इमारतीत बदल करुन वाढीव जागेसह मार्केट बांधणे कामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय व आर्थीक मान्यता देण्यात आली होती. त्यानुसार विहीत निविदा प्रक्रीया करुन मा. स्थायी समिती दि. 11/08/2016 ठराव क्र. 54 च्या मे. स्पार्क सिव्हील इन्फ्रा प्रोजेक्ट या कंत्राटदारास दि. 20/09/2016 रोजी कार्यादेश देण्यात आलेले होते. तथापी सदर ठिकाणी मार्केट सुरु करण्यासाठी स्थानिक रहीवाशांमार्फत विरोध झाल्याने सदर काम सुरु करता आलेले नाही. सदर कामाबाबत मा. महापौर महोदया यांच्या दालनात दि.27/09/2017 रोजी बैठक होऊन मा. महापौर महोदयाकडुन सदर मार्केट इमारतीचे मंजुर झालेले काम रद्द करुन सदर ठिकाणी सामाजिक सभागृह बांधणेसाठी नकाशे व अंदाजपत्रक तयार करुन मा. महासभेपुढे सादर करण्याकरीता कळविण्यात आलेले आहे. सदर प्रस्तावास अनुसरून खालील निर्णय ठरावाव्दारे घेण्यात येत आहे.

**<u>ठराव</u>**

1) भाईंदर पश्चिम भागात महानगरपालिकेचे नगरभवन येथील सभागृह वगळता एकही सभागृह नाही. अग्निशमन केंद्राचे मुख्यालय असलेल्या भागात मार्केटसाठी शहरातील असलेला रस्ता अरूंद असल्याने व सदर भाग हा रहिवाशी असल्याने वाहतुकीची कोंडी होणार आहे. तरी सदर ठिकाणी यापुर्वी मंजूर केलेला मार्केट बांधण्याचा प्रस्ताव रद्द करण्यात येत असून कंत्राटदारास देण्यात आलेले कार्यादेश रद्द करण्यात यावे. सदर जागेत सामाजिक सभागृह बांधण्यासाठी आवश्यक नकाशे व अंदाजपत्रक सल्लागारामार्फत तयार करून घेण्यात यावे. तसेच नविन अंदाजपत्रकानुसार नव्याने निविदा प्रक्रिया करण्यास व खर्चास ही सभा प्रशासकीय व आर्थिक मान्यता देत आहे.
2) त्याचप्रमाणे भाईंदर (पूर्व) खारीगाव येथील मासळी मार्केट इमारतीमधील जागा महानगरपालिकेने जागा मालकाकडून विकत घेतलेली असून सदर मार्केटची अत्यंत दुरावस्था झालेली आहे. सदर ठिकाणी तळ मजल्याची मार्केट शेड बांधण्यासाठी रु.64,39,542/- रकमेचे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले असून सदर खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे.
3) भाईंदर (पूर्व) मौजे खारी आरक्षण क्र. 108 या जागेत मार्केट बांधण्याचे काम मंजूर झालेले आहे, तथापी महानगरपालिकेमार्फत यापूर्वी बांधण्यात आलेल्या आरसीसी तळ अधिक एक मजल्याच्या मार्केट चा विकेत्यांमार्फत सुरु होऊ शकला नाही. त्यामुळे मार्केटचा वापर होण्याच्या दृष्टीने सदर मार्केटच्या डीझाईन मध्ये बदल करुन तळमजल्यावर मार्केट शेड बांधण्यासाठी अंदाजपत्रक तयार करुन मंजूर दरानूसार कंत्राटदारास नविन डिझाईन देऊन काम करुन घेण्यास ही सभा मान्यता देत आहे.

**सुचक :- डॉ. राजेंद्र जैन अनुमोदक :- डॉ. सुशिल अग्रवाल**

| अ.क. | ठरावाच्या बाजुने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | भोईर सुनिता शशिकांत | १ | ढवण निलम हरीश्चंद्र | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २ | शाह रिटा सुभाष | २ | कदम अर्चना अरुण | निरंक |
| ३ | तिवारी अशोक सूर्यदेव | ३ | नलावडे दिनेश दगडु | |
| ४ | पांडेय पंकज सूर्यमणि | ४ | गुप्ता कुसुम संतोष | |
| ५ | पाटील रोहिदास शंकर | ५ | पाटील धनेश परशुराम | |
| ६ | गोहिल शानू जोरावर सिंह | ६ | परेरा कॅटलीन एन्थोनी | |
| ७ | कांगणे मीना यशवंत | ७ | परदेशी गिता हरीश | |
| ८ | सिंह मदन उदितनारायण | ८ | पाटील नरेश तुकाराम | |
| ९ | शेट्टी गणेश गोपाळ | ९ | सय्यद नुरजाहाँ नाझर हुसेन | |
| १० | भोईर गणेश गजानन | १० | शेख अमजद गफार | |
| ११ | पाटील प्रभात प्रकाश | ११ | पाटील जयंतीलाल गुरूनाथ | |
| १२ | पाटील वंदना मंगेश | १२ | घरत तारा विनायक | |
| १३ | रावल मेघना दिपक | १३ | पांडे स्नेहा शैलेश | |
| १४ | शाह राकेश रतिशचंद्र | १४ | आमगावकर हरिश्चंद्र रामचंद्र | |
| १५ | सिंग श्रीप्रकाश जिलेदार | १५ | शिर्के अनंत गेणू | |
| १६ | पाटील धृवकिशोर मन्साराम | १६ | पाटील वंदना विकास | |
| १७ | जैन सुनिता रमेश | १७ | पाटील संध्या प्रफुल्ल | |
| १८ | जैन राजेंद्र भवरलाल | १८ | पाटील प्रविण मोरेश्वर | |
| १९ | भूप्ताणी रक्षा सतीश (शाह) | १९ | भोईर कमलेश यशवंत | |
| २० | मोकाशी दिपाली आनंदराव | २० | पाटील अनिता जयवंत | |
| २१ | व्यास रवि वासुदेव | २१ | भोईर भावना राजू | |
| २२ | रकवी वैशाली गजेंद्र | २२ | भोईर राजू यशवंत | |
| २३ | अग्रवाल सुशील गोपीकिशन | २३ | शेख रुबीना फिरोझ | |
| २४ | खंडेलवाल सुरेश जगदीश | २४ | डिसा मर्लिन मर्विन | |
| २५ | डॉ. पाटील प्रिती जयप्रकाश | २५ | सावंत अनिल दिवाकर | |
| २६ | मेहता डिंपल विनोद | २६ | मेहरा राजीव ओमप्रकाश | |
| २७ | शेट्टी अरविंद आनंद | २७ | भट दीप्ती शेखर | |
| २८ | गेहलोत हसमुख मोहनलाल | २८ | सपार उमा विश्वनाथ | |
| २९ | शिंदे रुपाली वसंत (मोदी) | २९ | अहमद साराह अकरम | |
| ३० | थेराडे संजय अनंत | ३० | इनामदार जुबेर अब्दुल्ला | |
| ३१ | मुखर्जी अनिता बबलू | ३१ | शेख अशरफ मोहम्मद इब्राहीम | |
| ३२ | वैती चंद्रकांत सिताराम | ३२ | गोविंद हेलन जॉर्जी | |
| ३३ | हसनाळे ज्योत्सना जालींदर | ३३ | बगाजी शर्मिला विन्सन्ट | |
| ३४ | पारधी सुजाता यशवंत | ३४ | बांड्या एलायस दुमिंग | |
| ३५ | म्हात्रे सचिन केसरीनाथ | | | |
| ३६ | यादव मिरादेवी रामलाल | | | |
| ३७ | म्हात्रे मोहन गोपाळ | | | |
| ३८ | सोनार सुरेखा प्रकाश | | | |
| ३९ | भोईर विणा सुर्यकांत | | | |
| ४० | म्हात्रे परशुराम पदमाकर | | | |
| ४१ | मांजरेकर आनंद दत्ताराम | | | |
| ४२ | अरोरा दीपिका पंकज | | | |
| ४३ | बेलानी हेमा राजेश | | | |
| ४४ | दळवी प्रशांत ज्ञानदेव | | | |
| ४५ | गजरे दौलत तुकाराम | | | |
| ४६ | नाईक विविता विवेक | | | |
| ४७ | सोंस नीला बर्नाड | | | |
| ४८ | राय विजयकुमार सिस्थन नारायण | | | |
| ४९ | परमार हेतल रतिलाल | | | |
| ५० | कासोदारिया अश्विन शामजीभाई | | | |

| | | | |
|---|---|---|---|
| ५१ | जैन दिनेश तेजराज | | |
| ५२ | भावसार वंदना संजय | | |
| ५३ | शाह सीमाबेन कमलेश | | |
| ५४ | दुबे मनोज रामनारायण | | |
| ५५ | विराणी अनिल रावजीभाई | | |
| ५६ | भोईर जयेश भानुदास | | |
| ५७ | म्हात्रे नयना गजानन | | |
| ५८ | भानुशाली वर्षा गिरधर | | |
| ५९ | म्हात्रे विनोद काशिनाथ | | |

ठराव बहुमताने मंजूर

सही /-

महापौर

मिरा भाईंदर महानगरपालिका

**प्र. नगरसचिव :-**

**गटनेता जुबेर इनामदार आणि गटनेते श्री. हरिश्चंद्र आमगावकर यांनी दोन पत्र दिलेली आहेत. दोन वेगवेगळ्या विषयांवरती ती मी मा. महापौरांकडे सादर करतो.**

**मा. महापौर :-**

**यह विशेष सभा है। यह पत्र आप दुसरे सभा में दिजीएगा। विशेष सभा मैं यह पत्र नही लुंगी। सभा संपली असे मी जाहिर करते.**

**(सभा संपल्याची वेळ दु. ३.४५ वाजता)**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(वासुदेव शिरवळकर)
प्र. नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका